वृषभानुजानाटिका.

किंमत आठ आणे.

वृषभानुजा नाटिका.

ीमथुरादासकविकृत संस्कृतनाटिकेचें

हें

गद्यपद्यात्मक मराठी भाषांतर

विष्णु दाजी गद्रे,

'प्रियदर्शिका' नाटिकेचे भाषांतरकर्ते

ह्यांनीं केलें

तें

पुणें येथें

"ज्ञानप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

सन १८९७ शके १८१९.

किंमत आठ आणे.

प्रस्तावना.

मुंबई येथें ' निर्णयसागर ' छापखान्याचे मालक यांणीं विद्वान् लोकांच्या साह्यानें प्राचीन संस्कृत निवडक ग्रंथांचें ' काव्यमाला ' या नांवाचें मासिक पुस्तक प्रसिद्ध करण्याचा आज कितीएक वर्षें क्रम चालविला आहे ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. त्या मालेंतील कांहीं काव्यें व नाटकें वाचीत असतां, ' वृषभानुजा ' या नांवाची एक लहानशी सुंदर नाटिका माझ्या पहाण्यांत आली. ही नाटिका मथुरादासनामक कोणी एका विद्वान् कवीनें रचिलेली आहे. हा कवि कोणत्या काळीं विद्यमान होता हें समजण्यास तींत कोठें आधार मिळत नाहीं. सूत्रधाराच्या आरंभींच्या भाषणावरून हा कवि कायस्थ कुलांत जन्मला असून यमुनानदीच्या तीरस्थ प्रदेशांत सुवर्णशेखर या नांवाच्या नगरांत रहात होता एवढेंच काय तें समजतें. हें नगर सांप्रतकाळीं कोठें उपलब्ध नाहीं. कदाचित् तें नांव बदलून हल्लीं त्यास दुसरें कांहीं नांव पडलें असावें; पण तें कोणतें हेंही समजण्यास मार्ग नाहीं. एवढें मात्र अनुमान करितां येतें कीं, हा कवि फार प्राचीनकालीन असला पाहिजे.

मूळ नाटिका गद्यपद्यात्मक असून साहित्यशास्त्रानुसार तिचे चार अंक केलेले आहेत. संविधानक पाहिलें तर अगदीं सोपें व सरळ आहे. तें असें कीं, वृषभानुनामक गोपाची कन्या राधा व नंदकुमार श्रीकृष्ण या उभयतांचें प्रेम परस्परांवर निरनिराळ्या प्रसंगीं कसें जडत गेलें व तें वृद्धिंगत होऊन त्यांचा शेवटीं गांधर्व विवाह कसा झाला एवढीच गोष्ट या नाटिकेंत सांगितली आहे; तथापि तिचें वर्णन करीत असतांना, अर्थगांभीर्य, शब्दलालित्य, भाषाप्रौढी, इत्यादि नाट्यकलेला खुलविणारे गुण कवीनें इतक्या चटकदार व मार्मिक तऱ्हेनें दाखविले आहेत कीं, त्यांच्या योगानें कवीच्या अंगची विद्वता, बुद्धिमत्ता व कवित्वशक्ति ह्या चांगल्या

व्यक्त होऊन रसिक जनांच्या अंतःकरणास तिच्या वाचनानें आल्हाद झाल्यावांचून रहात नाहीं. या नाटिकेंत शृंगाररस प्रधान असून करुण, अथवा शोक व हास्य हे रस अंगभूत आहेत. लोकांमध्यें साधारण अशी समजूत आहे कीं, शृंगाररसप्रधान नाटकें म्हटलीं म्हणजे त्यांत बीभत्सपणा हा हटकून असावयाचाच; कारण त्यावांचून त्या रसाची परिपूर्तता कधीं व्हावयाचीच नाहीं. ही समजूत जरी कांहीं अंशीं खरी असली, तरी बीभत्सपणा आणिल्यावांचून शृंगाररस कसा वठवितां येतो याचें ही नाटिका एक अत्युत्तम उदाहरण आहे असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. या नाटिकेंत शृंगाररस जरी ओतप्रोत भरला आहे, तरी कवीनें आपल्या बुद्धिवैभवानें व चातुर्यानें त्याला सभ्यपणाचें इतकें सुंदर रूप दिलें आहे कीं, त्यांत बीभत्सपणा किंवा अश्लीलता हे दोष यत्किंचित्‌ही येऊं न देतां सभ्य व कुलीन स्त्रियांनींही ती वाचून तदंतर्गत रसाचा आस्वाद घेत असतां त्यांच्या मनास किळस न येतां मोठें कौतुक वाटेल, मग सुशिक्षित पुरुषांच्या आदरास ती पात्र होईल हें सांगावयास नकोच. सारांश, सत्हृदय वाचकांच्या मनाला आल्हाद आणि करमणूक होईल अशा तऱ्हेची या नाटिकेची रचना कवीनें केली आहे.

येथपर्यंत मूळनाटिकेचें स्वरूप कसें आहे तें सांगितलें. आतां तिच्या भाषांतराच्या स्वरूपाविषयीं थोडेंसें सांगतों. मीं जें हें भाषांतर केलें आहे तें मूळच्या संस्कृत नाटिकेप्रमाणें गद्यपद्यात्मक म्हणजे गद्यांच्या ठिकाणीं गद्यें व पद्यांच्या ठिकाणीं पद्यें घालून केलें आहे. पहिल्या अंकांत जो एक कटाव घातला आहे तो मात्र मूळांत नाहीं. त्यांत त्याच्या ठिकाणीं गद्य भाषणच आहे. कटाव रचण्याचें कारण, मूळांतील गद्यरूप भाषण फारच लांबलचक व संस्कृत लांबलांब सामासिक शब्दांनीं भरलेलें असल्यामुळे त्याचें मराठींत त्याच धर्तीवर गद्यरूप भाषांतर केलें असतां तें फारच घोटाळ्याचें, दुर्बोध व दूरान्वित होईल, व त्यामुळें तें वाचतांना कंटाळवाणेंही होइल असें मला वाटलें. या संबंधानें

माझ्या कांहीं विद्वान् मित्रांचें मत विचारतां त्यांनाही कटाक्षरचनेची योजना पसत पडली. मूळांतील बाकीच्या साऱ्या पद्यांच्या ठिकाणीं भाषांतरांत निरनिराळ्या वृत्तांचीं; श्लोक, आर्या, दिंडया, साक्या इत्यादि प्रचारांतील पद्यें रचिलीं आहेत. संस्कृत पद्याचें मराठी भाषेंत पद्य रचणें हें काम किती प्रयासाचें व दुर्घट आहे हें, ज्यांच्यावर तें काम करण्याचा प्रसंग आला असेल त्यांसच माहीत; इतरांस त्याचें काठिन्य समजावयाचें नाहीं. कविताशास्त्राच्या नियमांप्रमाणें पद्यरचना करतांना, अक्षरगण, मात्रागण, प्रासानुप्रास, यमकांची योजना, इत्यादि अनेक अडचणी पुढें येऊन उभ्या राहतात. त्यांतून पार पडून पद्यरचना सुबोध आणि कर्णमधुर उतरण्यास कविताशक्ति नैसर्गिक असून जोरदार असावी लागते. तशी शक्ति माझ्या अंगीं नाहीं हें मी प्रांजलपणें कबूल करितों. या अडचणीमुळें मूळांतील पद्यांप्रमाणें भाषांतरांतील पद्यें सरस व कर्णमधुर झालीं आहेत असें म्हणण्याचें धारिष्ट मी करीत नाहीं. तसेंच मूळांतील अर्थ भाषांतरांत ततोतंत उतरला आहे असेंही मी खातरीनें म्हणत नाहीं. मूळपद्यांतील एखाददुसरा शब्द सोडून त्याच्या ठिकाणीं पदरचा शब्द अर्थसंगतीस व पद्यरचनेस लागू पडेल असा भाषांतरांत योजिलेला कांहीं स्थळीं आढळेल. तसेंच, मूळांतील गद्यभाषणें संस्कृत नाटककारांच्या पद्धतीप्रमाणें तुटक शब्दांनीं जेथें थोडक्यांत दिलेलीं आहेत तेथें तीं भाषणें अर्थास न सोडितां भाषांतरांत पदरचे शब्द घालून कांहींशीं लांबविलीं आहेत असेंही आढळून येईल. मराठी भाषेच्या पद्धतीप्रमाणें तीं भाषणें चटकदार व पूर्णार्थबोधक एरवीं होणार नाहींत असें दिसून आल्यामुळें तसें करणें भाग पडलें. या फेरफाराच्यायोगानें मूळच्या गद्यभाषणांतील कवीचा हृद्गतार्थ चांगला व्यक्त होऊन भाषांतरास विशेष शोभा व चटकदारपणा आला आहे असें मार्मिक वाचकांच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं.

कांहीं वर्षांपूर्वीं श्रीहर्षदेवकृत ‘ प्रियदर्शिका ’ या नांवाच्या संस्कृत नाटिकेचें गद्यपद्यात्मक भाषांतर मीं केलें होतें,

तें सरकारी विद्याखात्याला पसंत पडल्यामुळें त्याच्या आजपर्यंत चार आवृत्ति छापून प्रसिद्ध झाल्या. यावरून ती माझी कृति रसिकजनांस बरीच आवडली असावी असें वाटल्यावरून ही ' वृषभानुजा ' मराठी वेषानें नटविण्याची मला उमेद येऊन तें काम यथामति मीं तडीसही नेलें. आतां या कृतीपासून सहृदय जनांचें मनोरंजन होऊन त्यांच्या आदरास ती कितपत पात्र होते हें पहाणें आहे. या भाषांतरांत दोष तर असतीलच. तथापि, हंसक्षीरन्यायानें गुणलेशाचें वाचकांनीं ग्रहण करावें अशी विनंति करून ही लहानशी प्रस्तावना पुरी करितों.

पुणें, तारीख १ माहे
एप्रिल सन १८९७.

भाषांतरकर्ता.

ह्या नाटिकेंतील एकंदर पात्रांचीं नांवें.

सूत्रधार.	.. .. ..	मुख्य नाटककार.
नटी.	.. .. ..	त्याची स्त्री.
श्रीकृष्ण.	.. .. ..	नायक. नंदाचा पुत्र.
प्रियालाप.	.. .. ..	त्याचा मित्र व खुषमस्कऱ्या.
राधा.	.. .. ..	नायिका. वृषभानुनामक गोपाची कन्या.
वृंदा.	.. .. ..	गोकुलांत राहणारी एक पोक्त बाई.
वनरक्षिका.	.. ..	वृंदावन राखणारी एक स्त्री.
चंपकलता, तमालिका, नागरिका, विद्रुमलता, मृणालिका, कदलिका, विहंगिका, वसुमतिका.		राधेच्या मैत्रिणी.
सुबल.	.. .. ..	एक गवळी.
श्रीदामा.	.. .. ..	गाई राखणारी बाई.

स्थळः—गोकुल, वृंदावन, यमुनातीर, व त्याजवळचें मदनोद्यान, पुष्पवाटिका, लतागृह, इत्यादि.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

वृषभानुजा[1]नाटिका.

अंक पहिला.

मंगलाचरण.

१ पद.

जगज्जनक हरि नरवररूपें गोकुलिं अवतरला ॥
वृषभानूच्या प्रियदुहितेनें[2] प्रेमांकित केला ॥ ध्रु० ॥
पुलँ[3]कित गालांवर राधेच्या पत्रावँ[4]लि लोभें ॥
रेखित असतां सुवँ[5]र्तिका यत्करकमलीं शोभे ॥ १ ॥
त्या आयासें कंपित होतां कर, विस्मित झाला ॥
पाहुनि तीच्या मुखकमलातें अंतरिं बहु धाला ॥ २ ॥
अभिनव ऐसें रूप तियेचें विजयातें पावो ॥
निजसामर्थ्यें सकल जनाला सुखशांतीही देवो ॥३॥ जग० ॥

२ श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

चंद्राची द्युँ[6]ति राधिके हरिशि तूं वक्त्रांँ[7]बुजाच्या गुणें ॥
म्लानत्वा धरि तो पहा किति तरी लाजोनि या कारणें ॥

---

१ (वृषभानु + जा.) वृषभानुनामक गोपाची मुलगी राधा. २ कन्येनें. ३ रोमांचित. ४ वेलबुट्टी. ५ रंग देण्याचें उत्तम कलम. ६ कांति. ७ मुखकमल.

ऐशी नाथ करी स्तुती परि मनीं जी शांत नोहे कदा ॥
होवो ती विरहार्त गोपतनया सर्वां तुम्हां शर्मदा ॥ १ ॥

३ साक्या.

वामस्कंधीं कुंडलकांती फांकुनि त्या योगानें ॥
भ्रांति होइ जणुं भरजरि शेला पांघरिला कीं हरिनें ॥
नर्तनलीला[3] ती ॥ किति तरि जनमन मोही ॥ १ ॥
मुरलीवादन करितां होई त्रिभंग[4] अंग जयाचें ॥
भ्रुकुटी चढवुनि तल्लास्याचें दावी कौतुक साचें ॥
वादनपटुता[6] ती ॥ किति तरि जनमन मोही ॥ २ ॥
करितां नर्तन अशापरी तच्छिरस्थ[7] मोरपिसांचा ॥
मुकुट सरकुनी कुरळ कचांचा कलाप विलसे साचा ॥
सुंदर मूर्तिच ती ॥ बघतां नयनें हीं धाती ॥ ३ ॥
सुवासलोभें त्यावरि वेगें भृंगसंघ[10] बसताती ॥
नीलकांति त्या योगें झळके किति वर्णूं शोभा ती ॥
सुंदर मूर्तिच ती ॥ बघतां नयनें हीं धाती ॥ ४ ॥
राधाप्रमुखव्रजललनावृत[11] ऐशा नंदकिशोरा[12] ॥
वंदन करुनी प्रार्थितसों कीं द्यावा आम्हां थारा ॥
पावुनि जगदीशा ॥ पुरवीं मनिंची आशा ॥ ५ ॥

४ श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

नीलांभोरुहकोशकोमलतनू[13] मंदस्मितानें[14] करी ॥

---

१ विरहानें व्याकुळ झालेली. २ सुख देणारी. ३ नृत्यसंबंधी लीला. ४ तीन ठिकाणीं वांकडें. ५ भ्रुकुटींच्या लास्याचें म्ह० नर्तनाचें अर्थात् चाळ्यांचें. ६ मुरली वाजविण्याचें कौशल्य. ७ त्याच्या डोक्यावरील. ८ केंसाचा. ९ समूह; झुबका. १० भ्रमरांचे थवे. ११ राधा आहे पुढारी ज्याची अशा गोकुलांतील स्त्रियांनीं वेष्टिलेला. १२ नंदाचा किशोर ह्मणजे मुलगा, कृष्ण. १३ नील कमलाच्या कळ्याप्रमाणें कोमल आहे शरीर ज्याचें तो. १४ मंद हास्य.

सुस्निग्धें[1] दुकुलें[2] शरीर विलसे आपाद[3] माला धरी ॥
भक्तांना स्तुतिपात्र होउनि सदा हृत्ताप त्यांचा हरी ॥
राधाकेलिकथानुरक्त[4] हरि तो ध्याऊं अम्ही अंतरीं ॥

(इतकें मंगलाचरण झाल्यावर सूत्रधार पुढें येतो.)

सूत्रधार—पुरे पुरे, यापेक्षां अधिक मंगलाचरण नको. अहाहा! किती तरी आनंदाचा हा दिवस! आज खरोखरच, मानससरोवरांतील कमलिनींना लुब्ध होणाऱ्या राजहंसांप्रमाणें ज्याचें अंतःकरण गोपांगनांच्या[5] प्रफुल्लित आणि सुवासिक मुखकमलांनीं आकर्षिलें आहे, ज्याच्या मस्तकावर वृषभानुनंदिनी जी राधिका, तिच्या पदकमलांतील परागांनीं रंगित झालेला मयूरपिच्छांचा मुकुट झळकत आहे, उन्मत्त कलहंसकामिनींच्या[6] कोलाहलरवानें पुंलिनप्रदेश[7] गजबजून गेल्यामुळें किणकिण शब्द करणाऱ्या मेखलेनेंच जणूं काय जिचा नितंबभाग[8] परिवेष्टित झाला आहे, अशा त्या भानुनंदिनी[9] श्रीकालिंदीच्या तीरावरील लतामंडपामध्यें नानाप्रकारच्या कंदर्पक्रीडा[10] ज्यानें आरंभिल्या आहेत, ज्याला पाहून नंदयशोदा यांच्या नयनांस अत्यंत आल्हाद होतो, अशा, त्रिभुवनालाही मोहित करणाऱ्या त्या राधामोहन श्रीबालकृष्णाला वृंदावनांतील विहारवनस्थलींना पाहून व त्यांत नानाप्रकारच्या क्रीडा करून जें सुख झालें तें अवलोकन करण्याकरितां अनेक देशांहून सज्जनांचा समुदाय आज या ठिकाणीं एकत्र झाला आहे, व त्यांनीं मला येथें बोलावून आणून आदरपूर्वक अशी विनंति केली आहे कीं, ' या आर्यावर्तांतील मध्यप्रदेशाला शोभविणाऱ्या यमुनातीरस्थ सुवर्णशेखरनामक नगरामध्यें निस्सीम आणि एकनिष्ठ अशा भगवद्भक्तीच्या योगानें अमूल्य जन्म पावून ज्यानें कायस्थ कुलाला भूषित केलें त्या आमच्या प्रियमित्र मथुरादासनामक कवीनें विद्वज्जनांच्या

१ अत्यंत मृदु. २ रेशमी वस्त्र. ३ पायांपर्यंत. ४ राधेच्या क्रीडासंबंधी गोष्टी ऐकण्याची ज्याला आवड आहे असा. ५ गवळ्यांच्या स्त्रिया. ६ हंसिणींच्या. ७ वाळवंट. ८ कंबरेखालचा भाग. ९ सूर्याची कन्या. १० मदनोद्दीपक खेळ.

हृदयरूप कुमुदांना प्रफुल्लित करून आनंद देणारी जणूं काय कौमुदीच[1] होय, अशी **वृषभानुजा** या नांवाची एक अपूर्व नाटिका रचिली आहे, तिचा तुम्ही प्रयोग करून दाखवावा.' यासाठीं पडद्यांतील सर्व गोष्टींची तयारी करून त्यांणीं सांगितल्याप्रमाणें प्रयोगास आरंभ करितों. (सभोंवार पाहून आनंदानें) अहो, काय चमत्कार हा! येथें जमलेल्या या सुहृज्जनांच्या समुदायांतील प्रत्येक सभासदाची चित्तवृत्ति कौतुकानें अगदीं गुंग होऊन गेली आहेशी दिसते! हा त्या कवीच्या अमृतरस स्रवणाऱ्या मधुर वाणीचाच परिणाम होय यांत संशय नाहीं. अशा प्रसंगीं नाट्यकलेचे नानाविध विलास दाखविण्याविषयीं आमच्या मनांत प्रेरणा व्हावी हेंही योग्यच आहे. (पुनः चोहोंकडे पाहून साशंक मुद्रेनें) बरें पण, या कविशिरोमणीचे गुण न जाणणारा असा एकादा अरसिक तर येथें कोणी नसेल ना? (विचार करून) असो बिचारा, असला तर आमचें काय गेलें? आमची एवढीच इच्छा आहे कीं,

५ आर्या.

भवबंधमुक्तिसाठीं, आत्मज्ञानांत जे सदा रमती ॥
देहाभिमाननाशक, मोक्षा मिळवोत ते उदारमती[2] ॥ १ ॥
वैकुंठवास ज्यांना, प्रिय ते पावोत त्या पदाला कीं ॥
हे तत्सुहृदरसिकजन, हरिभजनीं रत असोत या लोकीं ॥२॥

यासाठीं आतां घरीं जातों आणि प्रियेला बोलावून आणून रंगभूमिसंबंधी सर्व गोष्टींची सिद्धता करितों. (मागें फिरून पडद्याकडे तोंड करून) अरे, ही माझी प्रिया तर येथेंच आहे. जिवलगे, अशी इकडे ये.

(नटी प्रवेश करिते.)

नटी—प्राणनाथ, ही मी जवळच आहें. काय काम असेल तें करण्याविषयीं आज्ञा व्हावी.

१ चांदणें. २ उदार बुद्धीचे.

सूत्रधार—प्रिये, वृषभानुजानाटिकेचा साभिनय प्रयोग पाहण्याविषयीं हे सर्व सभाजन अत्यंत उत्सुक झाले आहेत. मला तर सहजगत्या मित्रस्थानापन्न झालेल्या या प्रेक्षकजनांनीं आपल्या प्रेमळ व आग्रहपूर्वक भाषणांनीं अगदीं भंडावून सोडिलें आहे. त्यांचें वारंवार असें म्हणणें आहे कीं,

६ साक्या.

क्षणप्रभे[1]सम गोपसुंदरी संगें घेउनि ज्याला ॥
वृंदारण्यीं क्रीडा करिती पाहूं त्या कृष्णाला ॥
मेघःश्याम हरी ॥ जो भवताप निवारी ॥ १ ॥
प्रेमोद्रे[2]कें गती खुंटली गात्रें पुलकित[3] झालीं ॥
तद्दर्शनसुख घेउनि केव्हां तोषवुं ही नयनाली[4] ॥
मेघःश्याम हरी ॥ जो भवताप निवारी ॥ २ ॥

यासाठीं तुला सांगतों, कांहीं तरी सुस्वर संगीतास लवकर आरंभ करून यांचा हेतु परिपूर्ण कर.

नटी—(आश्चर्ययुक्त मुद्रेनें) प्राणनाथ, दूरदेशाहून आलेल्या या अनोळखी प्रेक्षकजनांस आज पहिल्यानें पाहतांक्षणींच त्यांच्याविषयीं एवढें प्रेम आपल्या ठिकाणीं उत्पन्न झालें तरी कसें? याचें मला मोठें नवल वाटतें. कोण मेला हा नाद, आज जेवणखाण देखील त्यामुळें कांहीं सुचत नाहीं!

सूत्रधार—अग, तुला समजत नाहीं. एवढें प्रेम कसें उत्पन्न झालें अशी शंका कशाला घेतेस? सांगतों ऐक:—

७ आर्या.

प्रेमाला हेतु नको, नैसर्गिक[5] मानिती तयास कवी ॥
नातरि पुष्परसाची, गोडी मधुपांस[6] कोण गे शिकवी? ॥ १ ॥

---

१ विद्युल्लतेप्रमाणें. २ प्रेमातिशयानें. ३ रोमांचित. ४ नयनपंक्ति, अर्थात् सर्वांचे डोळे. ५ स्वाभाविक. ६ भ्रमरांना.

(इतक्यांत पडद्यापलीकडे शब्द होतो.)

अहो सूत्रधार, खासें बोललांत. तुम्ही म्हणतां हेंच निःसंशय खरें आहे. (' प्रेमाला हेतु नको, ' ही पूर्वोक्त आर्या ऐकूं येते.)

सूत्रधार—(नीट कान देऊन ऐकून व पडद्याकडे पाहून) प्रिये, आतां येथें राहून वेळ घालविण्यांत काय अर्थ आहे? हा पहा मधुरप्रिय नांवाचा माझा शिष्य वृंदेचा वेष घेऊन इकडे येत आहे; तसाच हा माझा मित्र रंगमंगल तिची सोबतीण जी वनरक्षिका तिचें रूप धारण करून त्याच्या समागमें चालत आहे; तस्मात् आपणही आतां जाऊन रंगभूमीवर येण्याची तयारी करूं. (असें म्हणून उभयतां निघून जातात.)

(ही प्रस्तावना झाली.)

(नंतर वर सांगितल्याप्रमाणें वृंदा आणि वनरक्षिका प्रवेश करितात.)

वृंदा—हेंच निःसंशय खरें आहे. (' प्रेमाला हेतु नको, ' ही पूर्वोक्त आर्या म्हणते.) नाहींपेक्षां कमलबंधु[1] जो चंद्र, त्याच्या आणि कमलिनीच्या अन्योन्यप्रेमाप्रमाणें राधाकृष्णांची परस्परांविषयीं[2] प्रीति कशी संभवेल? (क्षणभर विचार करून) गडे, वनरक्षिके, माझ्या हातूनही या नाजुक कामांत प्रसंगोचित अशी एक चांगली गोष्ट घडून आली हें बरेंच झालें.

वनरक्षिका—बाई, कोणती अशी गोष्ट घडून आली ती सांगाना बरें?

वृंदा—अग, सांगतें. नीट लक्ष्य लावून ऐक. आज किनई

---

१ चंद्राला कमलबंधु म्हणण्याचें कारण असें कीं, तो उदय पावला ह्मणजे कमळें प्रफुल्लित होतात, त्यांस चंद्रविकासी कमळें ह्मणतात. जणूं काय भावाच्या भेटीमुळें त्यांस आनंद होतो. २ परस्परांविषयींचें.

मी सहज आपली त्या वृषभानुगोपाच्या घरीं गेलें होतें. तेथें त्याच्या घरापुढील अंगण्यांत स्वच्छ कांतिमान् मण्यांनीं फरसबंदी केलेल्या जमिनीवर अल्लड स्वभावाला शोभणारे असे नानाप्रकारचे खेळ खेळत असतांना त्याची कन्या राधा इला मीं पाहिलें. तिच्या सभोंवतीं तिच्या बरोबरीच्या शेंकडों मुली जमून त्याही खेळत होत्या. तारकांमध्यें जशी चंद्रिका शोभते तशी ती दिसत होती. तिच्या सुकुमार तनूची कांति इतकी कांहीं झकाकत होती कीं, ती सभोंवार फांकून तो अंगणप्रदेश सुवर्णाच्या पत्र्यांनींच जणूं काय मढवून काढिला आहे असा दूर अंतरावरून मला भास झाला. मग मी आपल्या मनांत विचार करूं लागल्यें कीं,

वनरक्षिका—(तिला पुरें बोलूं न देतां मध्येंच) तो कोणता बरें विचार ?

वृंदा—सांगतें ऐक. मला असें वाटलें:—

८ **श्लोक.** (वसंततिलका.)

आत्मानुरूपरमणीयगुणस्वभावां[1] ॥
नंदात्मजासहित योग इचा घडावा ॥
सौदामिनी[2] नवघनीं[3] जशि लीन व्हावी ॥
युक्तिप्रयुक्ति तशि म्यां करुनी बघावी ॥ १ ॥

वनरक्षिका—बाई भगवति, तुम्ही मजवर लोभ करितां म्हणून मनांतली गोष्ट तुम्हाला कळविल्यावांचून मला चैन पडत नाहीं. खरेंच सांगतें, राधाकृष्णांच्या जोडप्याचा परस्परांविषयीं जो एकीभाव दिसून येतो तत्संबंधी तुमच्या मुखचंद्रापासून स्रवणारें कथामृत तृषित झालेल्या या श्रवणपुटांनीं मी केव्हां प्राशन करीन असें मला झालें आहे.

---

१ स्वतःला शोभण्यासारखे व आवडते असे आहेत गुण व स्वभाव ज्याचे. हें नंदात्मज कृष्णाचें विशेषण. २ विद्युल्लता. ३ जलानें भरलेला नवा ढग.

वृंदा—ऐक तर मग. मुळापासून सगळी हकीकत सांगतें.

९ साक्या.

आलें मी हें ऐकुनि मग तो वृषभानू त्या ठायां ॥
आला सत्वर हेतु मनींचा तिजलागीं कळवाया ॥ १ ॥
म्हणे ' मुली ही बाइ भगवती योग्य असे बहुमाना ॥
यास्तव करशिर लववुनि ईच्या वंदन कर चरणांना ' ॥
ऐकुनि वचनाला ॥ वदलें मग मी त्याला ॥ २ ॥

हें त्याचें भाषण ऐकून मी म्हणालें, अहो वृषभानु, या भाग्यशालिनीला उगाच कां बरें श्रम देतां? ही तुमची कन्या मोठी दैववान् आहे. कशी म्हणाल तर ऐका,

१० साक्या.

अतिललितांगी[१] तव तनया ही लावण्याची खाणी ॥
जयश्रीचें[२] कीं अपुली जाणुनि कुसुमायुधें[३] वाखाणी ॥ १ ॥
व्रजपतितनयप्रेमपात्र[४] ही होउन त्याच्या संगें ॥
रमतां तुमचे सफल मनोरथ होतिल सुदैवयोगें ॥
ऐकुनि वचनाला ॥ आनंदित तो बहु झाला ॥ २ ॥

वनरक्षिका—भगवति, एकूण असें तुम्ही बोललां! बरें, हें तुमचें भाषण ऐकिल्यावर त्या भाग्यशालिनी राधिकेची मुखचर्या कशी काय दिसली?

वृंदा—किती झालें तरी पोरवयच कीं नाहीं तिचें? तिच्या अल्लड वृत्तीला प्रेमरसाची अद्यापि ओळखही नाहीं; तथापि तिच्या बापाजवळ मी कांहीं बोलत आहें असें पाहून काय बोलतें आहे तें ऐकिण्याकरितां कान लावून वांकडया नजरेनें मजकडे ती वरचे-

---

१ जिचें अंग अति सुंदर आहे ती. २ जयरूप संपत्ति. ३ कामदेव. ४ व्रजपति जो नंद त्याचा पुत्र कृष्ण, त्याच्या प्रेमाला स्थानभूत.

वर पाहूं लागली व माझ्या भाषणांतील भावार्थ समजून लाजल्यासारखी झाली व लागलीच मान खालीं घालून उभी राहिली.

वनरक्षिका—बरें, त्या गोकुलेंद्रनंदन श्रीकृष्णाचेंही प्रेम त्या राधिकेवर जडविण्याविषयीं तुम्ही काय तजवीज केली ?

वृंदा—बरें विचारलेंस, ऐकून घे. मग मीं विचार केला कीं, या भाग्यशालिनीच्या अंतःकरणांत ज्या अर्थी लज्जादि भाव उत्पन्न झाले आहेत त्या अर्थीं मीं योजिलेलें काम बहुतेक तडीस गेल्यासारखेंच आहे. तेव्हां आतां गोकुळांत जाऊन कांहीं तरी निमित्तानें अत्यंत मधुर असें राधा हें नांव त्या नंदकिशोराच्या कानीं पडेल अशी युक्ति करावी असा मीं निश्चय केला.

वनरक्षिका—बरें, मग पुढें काय झालें ?

वृंदा—नंतर लवकरच गोकुळांत जाऊन तेथील उद्यानांतील एका आम्रवृक्षाच्या पारावर मी क्षणभर विसावा घेत बसलें. त्या वृक्षावरील परिपक्व आम्रमंजरींमध्यें सांचलेला मकरंद प्राशन करण्याविषयीं उतावीळ झालेल्या उन्मत्त मधुकरांचा सुस्वर गुंजारव ऐकून मला मोठी मौज वाटली. अहाहा! त्या रमणीय स्थलाची शोभा किती म्हणून वर्णन करावी! तेथें असा चमत्कार पाहिला कीं—

११ पद्य. (अंजनीगीताची चाल.)

उगवुनि कोठें कोमल शाद्वल ॥ हरितवर्ण तें झालें भूतल ॥
मरकतरत्नांची द्युति सोज्ज्वल ॥ वाटे जणुं हरि तें ॥ १ ॥
तरूलतांना नूतन कोमल ॥ तांबुस पल्लव फुटोनि विपुल ॥
विद्रुमकांती पसरे अतुल ॥ शोभा किति त्यांची ॥ २ ॥
कोठें जाई जुई मालती ॥ सित मुकुलांनीं भरुनि जाती ॥
कंठीं मुक्ताहार घालिती ॥ वाटे जणुं वघतां ॥ ३ ॥

---

१ कोंवळी हरळी. २ हिरव्या चार रंगाचें. ३ पाचनामक रत्नविशेष. ४ पोवळ्याचें तेज. ५ पांढऱ्या कळ्यांनीं.

आणखीही त्या गोकुळाची शोभा सांगतें ती ऐक.

१२ श्लोक. (मंदाक्रांता.)

तत्सान्निध्यीं तपनतनयातीरमार्गे क्रमीती ॥
स्वच्छंदानें सखगमृग गोवत्स टाकोनि भीती ॥
गोशालांचा परिधिं रचिला त्या स्थळीं उच्च मानें ॥
प्राकाराची अनुपम दिसे त्यास शोभा तयानें ॥ १ ॥

अशा त्या रमणीय गोकुलोपवनांत, ज्यांचीं अंतःकरणें प्रेमानें उचंबळलीं आहेत असे अनेक मुनिजन गवळ्यांचीं रूपें धारण करून दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा अभिलाष न करितां निरिच्छ होत्साते केवळ त्या आनंदकंद नंदनंदनाच्या मुखकमलाचें दर्शन होऊन नयनांची तृप्ति व्हावी या हेतूनें निरंतर वास करितात. खरोखरच ते धन्य होत.

वनरक्षिका—बरें, मग पुढें काय सांगतां?

वृंदा—मी त्या ठिकाणीं मनांत कांहीं विचार करीत बसलें आहें असें सेवकजनांच्या मुखानें श्रवण करून तो गोपाधिपति नंद मोठ्या त्वरेनें तेथें आला, आणि माझा बहुमान करून, सर्व सौख्यांचें केवळ उत्पत्तिस्थान असें जें त्याचें रमणीय मंदिर त्यांत मला घेऊन गेला. अहाहा! त्या गोकुलाची व विशेषेंकरून त्यांतील त्या राजमंदिराची शोभा किती तरी वर्णन करावी! तथापि थोडेंसें वर्णन करितें तें ऐक.

कटाव.

त्या नंदमंदिराची ॥ शोभा किति वर्णूं साची ॥ ध्रु० ॥ कुंदरदा अति सुंदर युवती ॥ नूपुररवयुत तेथें फिरती ॥ परो-

---

१ तपन म्हणजे सूर्य, त्याची तनया यमुना, तिच्या तीरावरील मार्ग. २ पक्षी आणि हरिण यांसहवर्तमान गाई व वासरें. ३ कडें, वर्तुल. ४ प्रमाणानें. ५ कोटाची. ६ कुंदाच्या कळ्यांप्रमाणें ज्यांचे दांत आहेत अशा. ७ ज्यांच्या पायांतील पैंजणांचा खुळखुळ आवाज होत आहे अशा.

परींच्या क्रीडा करिती ॥ तेथिल पुष्करणींच्या कांठीं ॥ सारसकलहंसांची दाटी ॥ तो रव ऐकुन होते मोठी ॥ त्यांच्या सुस्वर मंजु रवानें ॥ सकल जनांचीं हरती भानें ॥ स्फुरत्पताका उंच तेथल्या ॥ नानारंगीं चित्रित केल्या ॥ नभस्तला जणुं चुंबुं निघाल्या ॥ गोपमंदिरें उंच उंच तीं ॥ नानाकृतिंनीं फार शोभती ॥ कोण करिल हो त्यांची गणती ॥ स्तंभ कांचनी रत्नखचित ते ॥ पाहुनि मन हें विस्मित होतें ॥ सीमा ती ऐश्वर्याची ॥ त्या नंदमंदिराची ॥ शोभा० ॥ १ ॥

ठाइं ठाइं भूभाग मढविले ॥ मरकतखंडीं अति सजविले ॥ त्यांची फांकुनि कांति सभोंतीं ॥ हरिद्वर्ण[1] तीं स्थानें दिसती ॥ त्या योगानें नूतन कोमल ॥ शाद्वलभ्रांती[2] होउन निश्चल ॥ स्वच्छंदानें चरण्यासाठीं ॥ अल्लड गोवत्सांची दाटी ॥ होउनि गम्मत दिसते मोठी ॥ भवनांतरिंच्या भिंती साऱ्या ॥ कनकरत्नमय दिसति साजिऱ्या ॥ अरशापरि त्या पारदर्शना ॥ पाहुनि प्रेक्षक तुकाविति माना ॥ कोणी तेथें उभें राहुन ॥ आत्मप्रतिबिंबातें पाहुन ॥ प्रेमालिंगन देण्याकरितां ॥ निजबाहुद्वय पुढें पसरितां ॥ करकमलातें मुकुलित[3] करितां ॥ 'हें घे' ऐशी खूण दावितां ॥ घेतें ऐसा भासचि होतां ॥ उपहासानें कर आंखुडितां ॥ होई हो धांदल त्यांची ॥ त्या नंदमंदिराची ॥ शोभा० ॥ २ ॥

लहान पोरें उघडिंनागडीं ॥ संगें घेउन अती तांतडी ॥ येती तेथें गोपसंवगडी ॥ तोंडें करिती वेडिंवांकडीं ॥ किती-

१ हिरव्या रंगाचीं. २ कोंवळ्या हरळीचा भास. ३ कळ्यासारखा बोटांचा आकार.

एक ते काढुनि जिभल्या ॥ दाविति नानापरि वांकोल्या ॥ प्रतिबिंबेंही तशाच रीती ॥ हावभाव ते सारे करिती ॥ समजुनि ते ती अपुली थट्टा ॥ राग मनामधिं धरिती मोठा ॥ पाहुनि ऐशा उपमर्दातें ॥ सूड उगविण्याकरितां मग ते ॥ उगारिती वर निजहस्तांतें ॥ मारूं ठोकूं म्हणती त्यांतें ॥ कोणि कोणि निजकंठभूषणें ॥ चोरुनि नेलीं प्रतिबिंबानें ॥ चांचपती गळ[1] याच भ्रमानें ॥ कित्येकांच्या हरिणबालकें ॥ मागुन फिरती अती कौतुकें ॥ कोणी मुक्ताफल-शकलांचे[2] ॥ कवळ[3] करूनी लहान साचे ॥ कलहंसांच्या पिल्लांना ते ॥ चारुनि करिती क्षुच्छमनातें[4] ॥ ऐशी त्या गोपालांची ॥ लीला बहु आनंदाची ॥ त्या नंदमंदिराची ॥ शोभा० ॥ ३ ॥

पीनपयोधर[5] सुंदर युवती ॥ कंठीं मुक्ताहार घालिती ॥ स्तनप्रदेशावर ते लोळती ॥ भाग्य आपुलें मोठें म्हणती ॥ करकमलींचीं रत्नकंकणें ॥ झळकति अत्युज्ज्वल तेजानें ॥ त्यांतुनि किरणें बाहिर निघती ॥ नखचंद्रांची मिसळुनि कांती ॥ इंद्रचाप जणुं आकाशांतिल ॥ दिव्यकांतिनें जें कां उज्ज्वल ॥ खालीं उतरुन शोभवि भूतल ॥ पाहुनि ऐशी भ्रांति जनांना ॥ वंचित करितें तन्नयनांना ॥ हिंदोळ्यांवर बसोनि कोणी ॥ मंजुल सुस्वर गाती गाणीं ॥ सुरगायकही जीं वाखाणी ॥ झोंके घेतां अति वेगानें ॥ दमुनि जाति त्या आयासानें ॥ सर्वांगांतुनि स्वेदांबूचे[6] ॥ कण उद्भवुनी पाट तयांचे ॥ भूपृष्ठावर लोटति साचे ॥ जैसें दुर्दिन[7] प्रावृटकालीं[8]॥ तैसें भासे तेंहि अकालीं ॥ दधिमंथन त्या व्रजललनांचें ॥

---

१ कंठ, गळा. २ मोत्यांचे तुकडे ३ घांस. ४ भुकेचें शमन. ५ पीन ह्मणजे पुष्ट आहेत पयोधर ह्मणजे स्तन ज्यांचे अशा. ६ घामाचे. ७ आकाशांत ढग येऊन हवा कुंद होते तो दिवस. ८ पर्जन्यकालीं.

होतां वाटे कौतुक साचें ॥ चरवीमधिं त्या दधि भरवीती ॥ त्यांत करांनीं रवि फिरवीती ॥ अंगचलाखी बहु मिरवीती ॥ अशा परीनें करितां मंथन ॥ होत असे तज्जघनास्फालन ॥ कुचकुंभांचेंही आंदोलन ॥ कटीतटींच्या रत्नमेखला ॥ हालुनि करिती मंजु रवाला ॥ मंथनरव त्यामाजि मिसळतो ॥ कानाला अति गोड लागतो ॥ त्यांतचि मंजुल मंगल गानें ॥ गंभिर सप्तस्वरोन्नतीनें ॥ गातांना तीं आनंदानें ॥ भरतें अंबर त्या नादानें ॥ गम्मत ती संगीताची ॥ त्या नंदमंदिराची ॥ शोभा० ॥ ४ ॥

जलदसंपदा[2] नभीं विलोकुन ॥ उत्कंठित शितिकंठ[3] होउन ॥ मुक्तकंठ[4] उभविती पिसारे ॥ आनंदानें नाचति सारे ॥ मंजुवाक्[5] शुकशारि[6] मिळोन ॥ हरिचरिताचें करिती गायन ॥ जनमनमोहन करिती कां न ॥ नानापरिंचीं मधुर सुवासिक ॥ मद्यें असतीं जीं उन्मादक ॥ शारिरमानसश्रमविस्मारक ॥ लेहसरवतें पित्तविनाशक ॥ पेयें[7] ऐशीं परोपरींचीं ॥ बरोबरी ज्यां सुधारसाची ॥ कांचनकुंभीं भरोनि सारीं ॥ सांठविलीं त्या नंदमंदिरीं ॥ एका भागीं अमित भाजनें ॥ जीं परिपूरित गोदुग्धानें ॥ रांगांनीं तीं अग्नीवरती ॥ तापत असतां भ्रांति करीती ॥ कीं हे आकाशांतिल तारे ॥ उतरुनि खालीं आले सारे ॥ एका बाजुस क्रीडापर्वत ॥ कृत्रिम वस्तूंनीं जो निर्मित ॥ मिरवितसे श्री[9] नंदनवनिंची[10] ॥ शोभा अद्भुत पा-

---

१ मांडयांची ओढाताण. २ मेघांचें वैभव अर्थात् त्यांचें उदकानें ओथंबून जाणें. ३ मयूर पक्षी. ४ गळे मोकळे करून. ५ ज्यांची वाणी मधुर आहे अशा. ६ पोपट, मैना इत्यादि पक्षी. ७ पिण्याचे पदार्थ. ८ हातांनीं बनविलेल्या. ९ शोभा. १० हें इंद्राचें वन स्वर्गलोकीं असून अत्यंत रमणीय आहे असें पुराणांत वर्णन आहे.

हुनि त्याची ॥ फिटे पारणा जननयनांची ॥ ऐशी त्या नंद- गृहाची ॥ शोभा किति वर्णूं साची ॥ त्या नंद० ॥ ५ ॥

वनरक्षिका—(मनांत) ह्या वर्णनावरून त्या नंदगृहाची शोभा अनुपम तर खरीच. अथवा त्रिभुवनाला व्यापून राहिलेला श्रीभगवान् वासुदेव ज्या सदनांत स्वतः वास करितो तें असेंच शोभायमान आणि वैभवसंपन्न असावें यांत काय आश्चर्य ? (उ- घडपणें) बरें मग पुढें काय झालें ?

वृंदा—अशा त्या त्रिभुवनसुंदर आणि अत्यंत रमणीय रा- जवाड्यांतील चौकाच्या मध्यभागीं एक पारिजातकाचा वृक्ष असून त्याच्या तळच्या भागावर पद्मराग[१]शिलांची फरसबंदी केलेली आहे; तिजवर यशोदामाता वनांत जाण्याविषयीं तयार झालेल्या श्रीकृष्णाशीं हर्षनिर्भरानें प्रेमळ व मधुर भाषणें बोलत व मधून मधून पुत्रवात्सल्यानें त्याचें मुख कुरवाळीत बसली होती. त्या वेळीं तिच्या अंगावरील रत्नजडित अलंकारांची कांति सभोंवार फांकून तो सारा चौक तेजोमय झाला होता. तेथें ती यशोदा सद्गदित कंठानें श्रीकृष्णाला—(इतकें बोलते आहे तोंच)

वनरक्षिका—(प्रेमातिशयानें डोळे भरून येऊन व कंठ दाटून) काय, काय म्हणतां बाई तुम्ही ? त्या महाभागेचें प्रेमळ व मधुर भाषण श्रवण करण्याविषयीं माझे कान फार उतावीळ झाले आहेत; म्हणून ती काय बोलली तें लवकर सांगा.

वृंदा—अग, गाईंवरून ती असें म्हणाली—

१३ पद. (अंजनीगीताची चाल.)

क्षणभरि जरि हरि तव मुखकमलें । दर्शन मजला नाहीं दिधलें ।
उत्साहा मी तरि आंचवलें । वाटे गुणधामा ॥ १ ॥
अनुदिन मग रे बाळा तुजला । धाडूं कैसें सांग वनाला ।
धारण केवीं करूं प्राणाला । न सुचे मज कांहीं ॥ २ ॥

---

१ एका जातीचें रत्न, माणिक.

वनरक्षिका—(विस्मित होऊन आपल्या मनांत) अहाहा! किती तरी पुत्रवात्सल्य या भाषणांत दिसून येतें! केवढें तिचें हें प्रेम! (उघडपणें) मग पुढें काय झालें ?

वृंदा—(तिजकडे पाहून) नंतर मोठया पूज्यभावानें मीं तिला नमस्कार केला.

वनरक्षिका—बरें, मग नंदयशोदा समीप असतांना कोणत्या युक्तीनें तुम्ही राधाभिधानरूप पुष्पगुच्छ श्रीकृष्णाच्या कानावर ठेवून त्याचीं कर्णसंपटें अलंकृत केलीं?

वृंदा—सांगतें ऐक. नंतर त्या व्रजेश्वर नंदानें, अतिथींचा सत्कार करण्यास योग्य अशा अनेक वस्तू मला अर्पण करून माझें स्वागत केलें आणि मोठ्या आदरानें मला विचारलें, ' भगवती बाई, कोणता उद्देश मनांत धरून आज आपण येथें आगमन केलें बरें ? ' मग मीं त्याला नमस्कार करून असें उत्तर दिलें कीं, ' महाराज, या आपल्या वृंदावनांत सहज मौजेनें हिंडत असतां वृषभानुगोपाची कन्या राधा माझ्या दृष्टीस पडली. अहाहा! तिच्या स्वरूपाचें आणि गुणांचें किती म्हणून वर्णन करावें! उत्तम कुल, शील आणि रूप यांणीं संपन्न, तशीच सर्व सुलक्षणांनीं युक्त व स्वभावानें मोठी गंभीर असून आपल्या गुणांनीं साक्षात् लक्ष्मीलाही लाजविणारी अशी ती जेव्हां मीं पाहिली, तेव्हां रूपवयादि सर्व गुणांनीं तिची बरोबरी करणाऱ्या तुमच्या पुत्राचें मला स्मरण झालें, म्हणून त्याचें दर्शन घेऊन डोळ्यांचें पारणें फेडावें हा हेतु मनांत धरून मी येथें आलें आहें. '

वनरक्षिका—बरें, मग पुढें ?

वृंदा—त्यानंतर तेथें जवळच मोठा गलबला झाला तो कशाचा म्हणून पाहूं लागलें तों, हजारों शंखांपासून निघणाऱ्या नादांनीं व नगारे, चौघडे, मृदंग, इत्यादि वाद्यांच्या गंभीर आणि मांगलिक ध्वनींनीं दशदिशा कोंदाटून गेल्या आहेत, व त्याच गर्दींत, 'हें घ्या, तें आणा, इकडे या, तिकडे जा ' अशा प्रकारच्या गोपकुमारांच्या मोठ्या लगबगीच्या आरोळ्यांनीं सारे रस्ते गजबजून जाऊन एक-

च हलकल्लोळ माजला आहे असें माझ्या दृष्टीस पडलें, व त्यावरून श्रीकृष्णाची गाई घेऊन वनास जाण्याची तयारी झाली असावी असें मीं अनुमान केलें.

वनरक्षिका—पुढें काय झालें?

वृंदा—नंतर मागें वळून पाहातें तों ती स्वभावसुंदर कृष्णमूर्ति माझ्या दृष्टीस पडली; तेव्हां मला वाटलें,–

१४ श्लोक. (पृथ्वीछंद.)

स्फुरंद्वपुसुकांतिनें दिसतसे सदा सुंदर ॥
किती नटविती तया मणिविभूषणें पामर ॥
परी असति मंगलप्रद म्हणूनि तीं साधनें ॥
करी जननि सर्वदा, कधिं न दीप्तिच्या वृद्धिनें ॥ १ ॥

साकी.

असा हरी हा घेउन संगें गोपसंघ सारा या- ॥
वृंदाटविला पहा जातसे गोवत्सें चाराया ॥
सौभाग्यचि त्यांचें ॥ किति मी वर्णू या वाचें ॥१॥

(हें भाषण ऐकून वनरक्षिका मोठ्या प्रेमानें तिच्या पायां पडते.)

वृंदा—(पाय एकीकडे करून) गडे वनरक्षिके, चल आतां आपण येथून जाऊं आणि दुसरें एक काम करावयाचें आहे त्याकडे लक्ष्य देऊं.

(असें म्हणून दोघी निघून जातात.)

(हा *विष्कंभक झाला.)

---

१ चमकणाऱ्या अंगकांतीनें. २ शोभेच्या.

* कथानकांतील घडलेला व पुढें येणारा भाग यांचा संबंध जोडणारें भा.ण.

(नंतर श्रीकृष्ण आणि त्याचा मित्र प्रियालाप प्रवेश करितात.)

कृष्ण—(आपल्या मनांत) अरेरे! जिचें नुसतें नांव ऐकूनच उत्कंठित झालेलें हें माझें अंतःकरण इतकें वेडावून गेलें आहे तिचें दर्शन तर दुर्लभच होय. पण तें आतां व्हावें कसें? आणि या माझ्या हुरहुरलेल्या मनाला मीं करमणूक करावी कशी? येथें कांहीं अक्कल चालत नाहीं. असो. (उघडपणें) गड्या प्रियालापा,—(इतकेंच बोलून थांबतो.)

प्रियालाप—मित्रा, हा मी जवळच आहें. काय तुझें म्हणणें?

कृष्ण— दुसरें कांहीं नाहीं, अरे—

१५ श्लोक. (स्रग्धरा.)

आनंदें गोपवृंदें निजजन अवघे घेउनी या वनाला ॥
आले नाहींत तों हें स्थल सकल बघूं तोषवूं मानसाला ॥
वृक्षस्कंधीं पहा ते बसुनि शिखि कसे नृत्यलीला करीती ॥
सांद्रा गुंजारवांनीं मधुकरिहि तशा फार आनंद देती ॥ १ ॥

प्रियालाप—प्रियमित्रा, फार चांगलें भाषण केलेंस. शिवाय या वृंदावनामध्यें विशेष कौतुकाची व मोठ्या गमतीची मनाला करमणूक करण्यासारखी आणखीही एक गोष्ट पहावयास सांपडेल.

कृष्ण—(साभिलाष मुद्रेनें) गड्या, ती कोणती बरें?

प्रियालाप—माझ्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं, या वसंतऋतूच्या दिवसांत मदनमहोत्सव करण्याकरितां यमुनेमध्यें स्नान करण्याच्या निमित्तानें दररोज प्रातःकाळीं साऱ्या गोपकुमारिका बरोबर घेऊन ती वृषभानुनंदिनी राधिका वृंदारण्यांतील लतामंडपाच्या मार्गानें जात असते.

कृष्ण—(उत्सुकतेनें)जात असेल. मग पुढें काय म्हणतोस?

प्रियालाप—मित्रा, सांगतों ऐक. तेथें एका लहानशा तमालतरूच्या मूळाशीं स्थापन केलेल्या कामदेवाची साऱ्या जणी मोठ्या

---

१ गवळ्यांचे समुदाय. २ मधुर अशा.

सत्कारानें पूजा करितात आणि मग नानाप्रकारच्या सुकुमार आणि सुवासिक पुष्पांच्या हारगजऱ्यांनीं आपले देह श्रृंगारून यथेच्छ क्रीडा करीत व गोष्टी बोलत आपापल्या घरीं परत जातात.

कृष्ण—(हर्ष रोमांचित होऊन मनांत म्हणतो) खरेंच, हा म्हणतो त्याप्रमाणें ह्या त्यांच्या खेळांतील रहस्य काय आहे तें भगवती वृंदाबाईनें आईजवळ आणि बाबांजवळ जी गोष्ट सांगितली तिजवरून उघड होत आहे खरें. या वेळीं माझा उजवा बाहूही किंचित् स्फुरण पावतो आहे, यावरून कांहीं तरी लाभाचें हें सुचिन्ह आहे यांत संशय नाहीं. तर मग आतां उशीर न करितां आपणही त्याच मार्गानें जावें हें बरें.

प्रियालाप—(कृष्णाची चित्तवृत्ति कांहींशी चंचल झालेली पाहून आपल्या मनांत) याच्या मनाला मोठी हुरहूर लागली आहे असें दिसतें. लागो बिचारी. आतां याच्याशीं असेंच बोललें पाहिजे. (उघडपणें) मित्रा, असा भांबावल्यासारखा होऊन उगाच कां बसला आहेस? माझ्याकडे पहात देखील नाहींस?

कृष्ण—वेड्या, भांबावलों कसचा? मनांत कांहीं विचार करीत होतों त्या नादांत तुझ्याकडे माझें लक्ष्य गेलें नाहीं इतकेंच.

प्रियालाप—(हांसून) हं हं असें काय? खरेंच कोणी म्हणेल! अरे लबाडा, कर्णद्वारानें ती वृषभानु गवळ्याची पोरगी राधा तुझ्या हृदयांत घुसली तिचें चिंतन करीत होतों असें कां म्हणत नाहींस?

कृष्ण—(मनांत) या धूर्त ब्राह्मणानें माझ्या मनांतली गोष्ट ताडली खरी, मग आतां ती चोरून तरी कशाला ठेवा? (हांसून मोठ्यानें) हो हो! तसेंच कां होईना. मग विलंब न करितां वृंदारण्याची वाट दाखवीनास परता?

प्रियालाप—(मागें फिरून) राजश्री, असे शुद्धीवर येऊन नीट बोला. अशी थापाथापी येथें चालावयाची नाहीं. चला तर मग या वाटेनें. अत्यंत रमणीय असें तें वृंदावन येथून जवळच आहे.

कृष्ण—(चालूं लागतो व मोठ्या हर्षानें पुढें पाहून ह्मणतो.)

अहाहा! या वृंदावनाची रमणीयता किती म्हणून वर्णावी! गड्या प्रियालापा, पहा पहा केवढी मौज येथें दृष्टीस पडत आहे ती!

१६ श्लोक. (पृथ्वीछंद.)

चमत्कृति पहा किती! मधुकरांगनागायनें[1] ॥
तसेंच पिककूजनें[2], सुललितें[3] शिखीनर्तनें[4] ॥
लतानववधूलसत्किसलयानुरक्तीं[5] करीं ॥
गमे विपिन[6] हें ममागमनमंगलोत्सें[7] करी ॥ १ ॥

आणखीही एक चमत्कार पहा.

१७ श्लोक. (स्रग्धरा.)

भृंगालीरूप नेत्रें[8] उघडुनि मजला पाहतांना दुरून ॥
मोदाश्रू[9] गाळिती हे तरु, मधु नच तें जें गळे त्यांवरून ॥
शाखाग्रें मंदवातें तरलितकरशीं[10] शोभती, त्या करांनीं ॥
प्रेमें बोलाविती हे मज फलनिकरें[11] नम्र[12] होऊनि रानीं ॥ १ ॥

तर मग येथें निवास करणाऱ्या तरूलतादिकांचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां आपण लवकर त्यांच्याजवळ जावें हें बरें.

प्रियालाप—(हांसून) कृष्णा, किती तरी रे लबाड आहेस तूं! अरे, तुझ्या बोलण्यांतले हे डावपेंच मला का समजत नाहींत? काय म्हणे, त्या झाडांचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां! या पेक्षां 'आपला मनोरथ सिद्ध व्हावा ह्मणून' असें स्पष्ट कां सांगत नाहींस?

---

१ मधुकर म्हणजे भ्रमर, त्यांच्या अंगना ह्मणजे भ्रमरी, त्यांच्या गायनानें म्हणजे गुंजारवानें. २ कोकिलांचें गाणें. ३ अत्यंत सुंदर. ४ मोरांचें नाचणें. ५ लता ह्याच कोणी तरुण स्त्रिया त्यांच्या ताबूस पल्लवरूप हातांनीं, जे हात वाऱ्याच्या झुळकेनें हालत आहेत. ६ अरण्य. ७ माझ्या आगमनाचा उत्साह. ८ भ्रमरांच्या पंक्ति हेच डोळे. ९ आनंदाश्रु. १० हालणाऱ्या हातांसारखीं. येथें शाखाग्रांवर हातांची उत्प्रेक्षा केली आहे. ११ फळांच्या भारानें. १२ या शब्दांत श्लेष आहे. नम्र ह्मणजे वाकलेले व दुसरा अर्थ विनीत.

कृष्ण—(हांसून) पुरे बुवा आतां ही थट्टा. चल पुढें हो लवकर.

(प्रियालाप पुढें चालूं लागतो.)

कृष्ण—(त्याच्या मागून चालतांना सभोंवार पाहून) गड्या प्रियालापा, मी अगदीं थकून गेलों आहें; यासाठीं या शीतल छायेच्या लतामंडपांत घटकाभर विश्रांति घेऊन श्रमपरिहार करूं चल. अहाहा ! याचा रमणीय देखावा पाहून मनाला किती तरी आनंद होतो ! वसंतऋतूमध्यें फुलणाऱ्या अनेक जातींच्या सुवासिक पुष्पांतील मकरंदरसाचें पान करून उन्मत्त झालेल्या मधुकरांच्या मधुर गुंजारवानें हा पहा कसा नादित होऊन गेला आहे ! जवळच यमुना नदी वाहात आहे. तिच्या जलांत स्नान करणाऱ्या तरुणींच्या डोळ्यांतील काजळ धुपून जाऊन मिसळल्यामुळें तें अधिक श्यामवर्ण झालें आहें; त्याप्रमाणेंच त्यांच्या भांगांतील शेंदूर जलसंपर्कानें धुऊन जाऊन त्याच्या मिश्रणानें कांहीं ठिकाणीं त्याचा वर्ण तांबडाही झाला आहे. त्यांतच स्तनतटांवर चर्चिलेल्या केशरकस्तूर्यादि सुवासिक द्रव्यांच्या उटया धुपून जाऊन त्यांचें संमीलन झाल्यामुळें त्यांत नानाविध रंगांच्या छटा उत्पन्न झाल्या आहेत. अशा त्या यमुनाजलाच्या इतस्ततः हेलकावे खात असलेल्या रंगीबेरंगी लाटांमध्यें, आकाशांतील चित्रविचित्र रंगांनीं चमकणाऱ्या शेंकडों इंद्रधनुष्यांचीं प्रतिबिंबेंच जणूं काय पडलीं आहेत असा भास होतो. तसाच हा दक्षिणेकडून वहात येणारा वायु श्रांत झालेल्या गात्रांस किती तरी सुखावह वाटत आहे ! त्याच्या झुळुका लागून नीलोत्पलें व शुभ्र कमलें यांत सांचलेल्या मकरंदबिंदूंचे थंडगार तुषार पहा कसे चोहोंकडे पसरत आहेत ! आणखी पहा कशी या वनांत गंमत दिसते आहे ती ! हा दक्षिणवायु तरुलतांच्या पल्लवरूप कोमल अंगुलींना डोलवून नृत्यलीला कशा कराव्या याविषयीं शिक्षण देण्याच्या कामांत आपली दक्षताच जणूं काय व्यक्त करीत आहे असा भास होतो.

प्रियालाप—(एकीकडे तोंड फिरवून मनांत) ज्या मोहिनीवर

तुझें मन आसक्त झालें आहे तिच्या प्राप्तीवांचून तुझ्या श्रमाचा परिहार होण्याची आशाच करावयास नको. (उघडपणें) बरें बुवा, तूं म्हणतोस तसेंच कां होईना ?

(दोघे लतामंडपांत जाऊन बसतात.)

(इतक्यांत पडद्यापलीकडून, ' चंपकलते, अग तीं फुलें घेऊन ये, ' असें कोणी बोललेलें ऐकूं येतें.)

प्रियालाप—(कांहींशी मान फिरवून व कान देऊन हलक्या शब्दानें) मित्रा, ऊठ ऊठ जलदी कर. या मधुमालतीच्या मंडपांतून तरुण मुलींचा कोमल शब्द ऐकूं येत आहे.

(कृष्ण सहर्षकौतुकानें पुढें सरतो व लतारंध्रांतून बारीक नजरेनें पाहतो.)

(इतक्यांत सखीजनासहवर्तमान राधा प्रवेश करिते.)

राधा—अग तमालिके, माझी ती प्रियसखी चंपकलता फुलें तोडण्याकरितां म्हणून गेली ती अजून कां बरें परत येत नाहीं ?

(इतक्यांत फुलांनीं भरलेला पानांचा द्रोण हातांत घेऊन हांसत हांसत चंपकलता तेथें येते.)

चंपकलता—प्रियसखे राधे, तुझें नशीब बाई फार चांगलें आहे, हें पाहून मला किती तरी आनंद होतो म्हणून सांगूं! गडे, आमच्या सर्वांच्या मनोरथलतेला आज फुलें आलीं बरें !

राधा—(भिवया वर चढवून) असला कसला ग तो मनोरथ तरी ?

चंपकलता—तुला त्याचें कौतुक वाटत असेल तर नीट लक्ष्य लावून ऐकून घे. अग, आज पाहांटेच्या प्रहरीं मला किनई एक स्वप्न पडलें; पण गडे, जागी झाल्यावर मेलें मी तें सगळें विसरून गेलें.

राधा—बरें झालें. पिडा टळली ! मग त्याचें काय आतां ?

चंपकलता—अग, पुरें ऐकून तर घे. आतां इतक्यांत मी फुलें वेंचीत इकडे तिकडे फिरत असतां एका पिंवळ्या जुईनें आ-

पले कोमल वेल पुढें सरसावून त्यांनीं एका तमालवृक्षाला घट्ट कंव-टाळून धरिलें आहे असें मीं पाहिलें.

(राधा लज्जित होत्साती हांसत मोठ्या प्रेमानें तमालिकेच्या तोंडाकडे पाहाते.)

तमालिका—(चंपकलतेच्या मनांतील भाव जाणून तिला म्हणते.) बरें मग? काय मेली बोलते त्याचा अर्थच कांहीं कळत नाहीं.

चंपकलता—अग, अर्थ तो काय कळायाचा. गोष्टीसारखी गोष्ट पाहिल्यामुळें मला त्या स्वप्नाची एकाएकीं आठवण झाली.

प्रियालाप—(मनांत) त्या राधेच्या रूपलावण्याची कीर्ति ऐकून ही स्वारी अगदीं वेडावून गेली आहे. जावो. आतां याची अशीच समजूत केली पाहिजे. (कृष्णाच्या जवळ जाऊन व त्याच्या तोंडाशीं तोंड लावून साभिप्राय) मित्रा, तुला येथें बसून पुष्कळ वेळ झाला. इतक्या विश्रांतीनें या तुझ्या कमलाप्रमाणें नाजुक डोळ्यांवरची सुस्ती जर नाहींशी होत नाहीं तर आणखी येथें विरंगुळत राहून काय लाभ व्हावयाचा आहे?

कृष्ण—(तोंड थोडें मागें फिरवून हळूच) गड्या, खरें विचार-शील तर मी तुला आपल्या मनांतली एक गुप्त गोष्ट सांगतों.—

१८ आर्या.

ईच्या सुंदर रूपा, पाहुनि नयनें न तृप्त कधिं व्हावीं ॥
हीच सफलता यांची, नेत्रसुखाची सदैव रुचि घ्यावी ॥१॥

प्रियालाप—(कृष्णाचें तोंड कांहींसें उतरलेलें पाहून दयार्द्र मनानें आपणाशीं) अरेरे! त्या कुसुमायुधानें सवड साधून आप-ल्या राधारूप अमोघ शस्त्राचा या सुकुमार नंदकिशोरावर नेम धर-ला तर खरा. आतां तो चुकविण्यासाठीं काय उपाय करावा बरें! (उघडपणें) मित्रा, या तरुण मुलींच्या काय काय गोष्टी चालल्या आहेत त्या साऱ्या ऐकिल्यास का?

कृष्ण–ऐकिल्या बुवा. किती तरी त्या गोड आहेत! तथापि आणखी पुढें त्या काय बोलतात तें ऐकण्याची माझी इच्छा आहे.

राधा–(चंपकलतेचें पूर्वोक्त स्वप्नस्मरणाचें भाषण ऐकून आपल्या मनांत) भगवती वृंदाबाईनें प्रसंग पाहून त्या दिवशीं बाबांजवळ ज्या दुर्लभ पुरुषाविषयीं माझ्यासंबंधानें गोष्ट काढिली होती त्याजविषयींच तर ही कांहीं बोलत नसेलना? (डावा डोळा लवूं लागल्यामुळें हा शुभशकुनच आहे असें मानून आशेनें) असेंच कदाचित् कांहीं असेल. आपण हिला विचारून पहावें तर खरें. (उघडपणें) चंपकलते, अग कशी काय तुला आठवण झाली?

चंपकलता–(मुखचर्येवरून तिच्या मनांतील भाव जाणून साभिप्राय.) सखे राधिके, तुझ्या मनोरथलतेला फूल आलें म्हणून मी सांगितलेंच आहे. आतां फळ धरण्याचाच काय तो अवकाश. तें आलें म्हणजे आपोआपच तुला सारें कळून येईल. उगीच बोलून तरी काय करावयाचें आहे? (विचार करून) अथवा हवें असेल तर सांगतें काय तें. नीट ऐकून घे. अग, याच माधवीलता-मंडपाच्या शेजारीं, ज्याचें रूपलावण्य थेट तुझ्यासारखें आहे अशा कोणा एका सुंदर पुरुषाबरोबर, विद्युल्लता जशी सजल मेघावर चमकते अथवा पिंवळ्या जुईची वेल तमालवृक्षाला बिलगल्यामुळें जशी शोभायमान दिसते तशी खरोखरीच तूं यथेच्छ क्रीडा करण्यांत दंग झाली आहेस असें मीं स्वप्नांत पाहिलें!

कृष्ण–(आपल्या मनांत) अरेरे, आतां बरीक काय तो सोक्षमोक्ष होण्याची वेळ जवळ येऊन ठेपली आहे. यावर आतां ही काय म्हणते तें पहावें. माझें मन तर या वेळेस मोठ्या संशयांत पडलें आहे. कां तर—

१९–२०. आर्या.

सख्युक्त[1] स्वप्नींचें, ऐकुनि कानांस फार मानवतें ॥

---

१ सखीचें भाषण.

उत्कंठित मन माझें, आशापाशांत गुंतुनी रमतें ॥ १ ॥
तरि ही नामोच्चारें, धन्य कुणाला करील हें नकळे ॥
ऐसा संशय मानासिं, येउनि तेणें मदीय धैर्य गळे ॥ २ ॥

प्रियालाप–(हर्षोद्वेगानें आपल्या मनांत) माझ्या या प्रियमित्राचेंच स्वरूप अलौकिक असल्यामुळें ही ज्या पुरुषाविषयीं बोलली तो हाच असला पाहिजे; तथापि इणें त्याचें नांव स्पष्ट घेतलें असतें तर बरें झालें असतें. (कृष्णाजवळ जाऊन मोठ्यानें) राजश्री, तुमचें नशीब खचित फळफळलें बरें. ती काय बोलली तें ऐकिलेंत ना ? तिणें स्वप्नांत पाहिलेले गृहस्थ दुसरे कोण असणार ? आपणच ते, असें मला खास वाटतें.

कृष्ण–(मोठ्यानें श्वास सोडून हळूच)—

२१. श्लोक. (शिखरिणी.)

गडचा तूं ज्या तर्का करुनि रिझवूं पाहशि मला ॥
खरा वाटे तो कीं मधुरतम भावार्थ गमला ॥
तरी लावण्यें हें मम वपु न सादृश्य करितें–॥
तिच्याशीं, या योगें मन बहु विषादास धरितें ॥ १ ॥

प्रियालाप—(हांसून) मित्रा, खरोखरच तूं आतां हा भलताच संशय मनांत आणीत आहेस.

राधा—(स्वप्न ऐकून रागावल्यासारखें करून) कोण मेला हा चावटपणा. मला नाहीं असलें आवडावयाचें. अग, स्वप्नामध्यें जी लता तूं तशी पाहिलीस ती चंपकलताच असेल, जुईची वेल नव्हे बरें. म्हणतात ना ‘ मनीं वसे तें स्वप्नीं दिसे. ’ खरोखरच तुझ्या मनांत जें होतें तेंच तुला स्वप्नांत दिसलें. मग उगीच दुसऱ्याचीं भलभलतीं छिद्रें काढून थट्टा करण्यांत काय अर्थ आहे ? चल जा लवकर, त्या तमालवृक्षाच्या तळीं पूजासाहित्य नेऊन ठेव.

(इतक्यांत पडद्यापलीकडे शब्द होतो.)

---

१ तूंच असशील असा भावार्थ.

'आईसाहेबांनीं मला आज्ञा केली आहे कीं, अग वसुमतिके, माझ्या त्या लाडक्या राधेला लवकर जाऊन येथें घेऊन ये. तर त्या धाकट्या यजमानिणीला कोठें बाई आतां शोधायला जाऊं. त्या आतां कोठें असतील कोण जाणे.'

राधा—(नीट कान देऊन ऐकून व पडद्याकडे पाहून) अग चंपकलते, ही ती विघ्नसंतोषी वसुमतिका इकडेसच येत आहे पहा. ऊठ तर बाई, आईकडे जाऊन कामदेवाची पूजा करण्याकरितां लवकर परत येऊं. (असें म्हणून सर्व सख्यांसहवर्तमान जाऊं लागते.)

कृष्ण—(दुःखातिशयानें) गड्या प्रियालापा, ह्या साऱ्या जणी चालल्या. तर आपणही जाऊन गोकुळाकडून आलेल्या गाईंना रानांत नेऊन चरावयास लावूं.

प्रियालाप—हो तर काय. चल जाऊं.

कृष्ण—(लतारंध्रांतून पाहून व दुःखोच्छ्वास टाकून.):—

२२ साकी.

मनसिजभवनप्रदीपिकेसमं, सुंदरि निजभवनातें ॥
जातां हरिते मदीय मानस, शरदीं जशि हंसांतें ॥ १ ॥
आतां काय करूं ॥ कैसें दुःख निवारूं ॥

(सर्व निघून जातात.)

पहिला अंक समाप्त.

---

१ मनसिज म्हणजे मदन, त्याच्या भवनाची म्हणजे मंदिराची वाट दाखविणारी प्रदीपिका म्हणजे मशाल. २ पर्जन्यकाळ. ह्या दिवसांत हंसपक्षी मानससरोवरावर वास करितात.

अंक दुसरा.

(तदनंतर वनरक्षिकेसह वृंदा प्रवेश करिते.)

वृंदा—(सभोंवार पाहून मनांत) अहाहा! किती तरी आल्हादकारक हा प्रभातसमय आहे बरें! या वेळीं,—

१ श्लोक (मालिनी.)

करि सुमनसुगंधाकृष्ट भृंगालि[2] तुष्टा ॥
ललित नवलतांचा लास्यलीलोपदेष्टा[3] ॥
हलवि कमलिनी जो शीकरासीं वाहे ॥
मलयज सुविभातीं वायु हा वाहताहे ॥ १ ॥

(वर पाहून)—

२ श्लोक (स्रग्धरा.)

तेजस्वी ताम्रवर्णी करीं पसरुनि जो अंधकारा निवारी ॥
मांगल्यें गायनें ज्या स्तविति मधुकरी कोकिलाल्हादकारी
प्रीतीनें पंकजींचें विकसन करि जो पाडुनी स्वप्रभा ती ॥
आला गोलाकृती हा रवि उदयगिरीशेखरीं सुप्रभातीं ॥२॥

(क्षणभर सूर्योदयाची मौज पहात उभी राहून मोठ्यानें) गडे वनरक्षिके, पाहिलास का हा सहस्ररश्मि सूर्यनारायण क्षितिजावर नुकताच आला आहे. गोकुलेंद्र[9]नंदन श्रीकृष्णाची गाई चारण्या-

---

१ पुष्पांच्या सुवासानें आकर्षिलेली. २ भ्रमरपंक्ति. ३ नृत्यलीला कशा कराव्या तें शिकविणारा. ४ थंड पाण्याचे तुषार. ५ मलयपर्वताकडून येणारा. ६ प्रातःकाळीं. ७ किरण. ८ शुभसूचक. ९ गोकुलाचा स्वामी नंद, त्याचा नंदन म्हणजे पुत्र.

करितां येथें येण्याची वेळ टळून गेली तरी अजून कां बरें तो येत नाहीं?

वनरक्षिका—भगवति, येथें जवळच कोणाचें कुजबुजणें मला बाई ऐकूं येतें, यावरून तो नंदकिशोर येथेंच कोठें तरी असावा, असें मला वाटतें. मी तर आतां आपलें वन राखण्याचें काम करण्यासाठीं चाललें.

वृंदा—मीही पण जातें. (दोघी दोहोंकडे जातात.)

(हा प्रवेशक झाला.)

(नंतर प्रियालापाला बरोबर घेऊन कृष्ण येतो.)

प्रियालाप—मित्रा, अरे मित्रा, या मधुमालतीच्या मंडपाकडून मंजुळ शब्द पुनः बेटा ऐकूं येतो आहे. हा कोणाचा बरें असावा? मला वाटतें, ती राधिका कामदेवाची पूजा करण्यासाठीं तेथें खचित आली असावी. चल तर मग या मंडपाच्याच मार्गानें लवकर जाऊन, तो तमालवृक्ष दिसतो आहे तो, त्याच्या बुंध्याच्या आड दडून बसूं व कोण काय बोलतें आहे तें हळूच ऐकूं.

कृष्ण—बरें मग तें ऐकून पुढें काय करावयाचें?

प्रियालाप—काय करावयाचें? अहो! हजारों कामदेवांनाही सौंदर्यानें जिंकणारे आपण तिच्या दृष्टीस पडलां म्हणजे मग त्या बेट्या यःकश्चित् एका कामदेवाला हो कोण विचारतें? त्याची तेथें थोडीच डाळ शिजणार आहे! म्हणून म्हणतों, राजश्री, सहस्रमदनाचे पुतळे आपणच पुढें होऊन त्या चटसाऱ्या पूजासाहित्यावर आणि गोड गोड नैवेद्यावर एकदम डल्ला मारा म्हणजे झालें; पण तो मारतांना माझी गरीब ब्राह्मणाची एक विनंति आहे एवढी मात्र ध्यानांत घट्ट धरून ठेवा बरें, नाहीं तर त्या गडबडींत ती बेटी कदाचित् निसटून जाईल.

कृष्ण—(किंचित् हांसून) काय बाबा तुझी विनंति आहे? ती अगोदर ऐकूं दे तर खरी.

प्रियालाप—त्या गोवर्धन पर्वतावर गोपांगनांनीं तुझी पूजा केली होती तिची आठवण आहे का? त्या वेळीं साऱ्या नैवेद्याचा तूंच एकटयानें चट्टामट्टा करून टाकिलास तसा मात्र येथें करूं नको. या बुभुक्षित ब्राह्मणाची कांहीं आठवण राहूं दे.

कृष्ण—(हांसून) गड्या, विनोद करण्याचा हा समय नव्हे. चल हो पुढें लवकर.

(प्रियालाप पुढें जातो व एकाएकीं दचकून मागें परतून कृष्णाच्या गळ्याला घट्ट मिठी मारितो.)

कृष्ण—भटजीबुवा, अहो इतके घाबरलां कां?

प्रियालाप—मित्रा, काय सांगूं रे, खरोखरच या लतामंडपाच्या मार्गांत मला जिकडेतिकडे दाट अंधकारच दिसतो आहे. माझ्याच्यानें बुवा एक पाऊल देखील पुढें टाकवत नाहीं. अनेक सूर्यांच्या प्रभेप्रमाणें ही तुझी अंगकांति चोहोंकडे फांकत आहे, तेव्हां पाहिजे असेल तर माझ्यासारखी धिटाई करून तूंच होईनास पुढें?

कृष्ण—(हांसून) हा मूर्खा, भेकडा, धिक्कार असो तुला. अरे, तुझ्या उरांत जी एवढी मोठी धडकी भरली ती कां? याचा तरी बेटया शोध करायाचा होतास. भागूबाई खरीच. (असें म्हणून स्वतः पुढें जाऊन पाहूं लागतो आणि म्हणतो.) हाच तो तमालवृक्ष. अरेरे! काय याची अवस्था झाली आहे ही!

३ दिंडी.

दृढालिंगन नवलता यास देती ॥
विकच[१] सुमनें हे स्पष्ट पुलक[२] येती ॥
मधुस्रावें वाटतो स्वेद[३] वाहे ॥
खरा कामीजनभाव[४] दाविताहे ॥ १ ॥

तर मग आतां याच्या बुडापाशीं जाऊन मुकाटयानें त्या सुंदरीच्या आगमनाची वाट पहात बसूं.

---

१ प्रफुल्लित. २ रोमांच. ३ घाम. ४ कामीपुरुषाला होणारे विकार.

(उभयतां तसें करितात.)

कृष्ण—(खिन्न होऊन) गड्या प्रियालापा, काय रे तुला सांगूं ?

४ साकी.

वसंतमंडप तोच पहा हा आहे समीप भागीं ॥
नकळे कां ती अजुनि वल्लभा येइनाच या जागीं ॥
वाट किती पाहूं ॥ विरह कसा हा साहूं ॥ १ ॥

प्रियालाप—तर मग मित्रा, मीच अंमळ पुढें जाऊन काय वर्तमान आहे तें पाहतों.

कृष्ण—बरें बुवा तुला ठीक दिसेल तसें कर.

(प्रियालाप थोडा पुढें जाऊन माघारा येतो आणि बळेंच तोंड हिरमुसलें करून कांहीं न बोलतां खालीं मान करून उभा राहतो.)

कृष्ण—(साशंक होऊन) भटजीबुवा, अहो अशी मान खालीं घालून मुकाटयानें कां उभे राहिलां ? बोलत कां नाहीं ? कुणी मुसकुटांत लगाविली तर नाहीं ना ?

प्रियालाप—मित्रा, अरे बोलूं काय तुझें कपाळ ! तुला प्रत्युत्तर देण्याला माझी ही जीभच बेटी पुढें सरसावत नाहीं.

कृष्ण—(दुःखोच्छ्वास सोडून) हा दुर्दैवा !—

५ आर्या.

मदिरायतेक्षणेचें[1], दर्शन जेव्हां घडेल सुखकारी ॥
तेव्हांच हृदय माझें, सोडिल मदनेषुभीति[2] चटसारी ॥ १ ॥

(असें म्हणून मदनपीडा व्यक्त करितो.)

प्रियालाप—(दुःखित होऊन मनांत) खरोखर या राजश्रींच्या मनांत त्या राधेविषयीं अत्यंत अभिलाष उत्पन्न होऊन तिची

---

१ मद्यप्राशनानें जिचे डोळे प्रफुल्ल झाले आहेत अशी. हें राधेचें विशेषण.

२ मदनाच्या बाणांची भीति.

भेट न झाल्यामुळें मदनपीडेनें हा फार व्याकुल झाला आहेसा दिसतो; तेंव्हां आतां याची आणखी थट्टा करून उपयोग नाहीं. (हांसून) मित्रा, उगीच दुःखी कां होतोस ? दे झुगारून तें सारें दुःख एकदांचें. ती पहा तुझी प्रियकरा लतामंडपांतून बाहेर पडून इकडेसच येत आहे. आतां पुढें ती काय करिते तें बघण्यासाठीं आणखी एकवार मी पुढें जाऊन येतों.

कृष्ण—(दूर अंतरावरून आलेला कोणाचा मधुर शब्द ऐकून कांहीं तर्क करितो आणि मनांत म्हणतो.)

६ श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

वाटे कीं मधुपानमत्त अलिंच्या गुंजारवा ऐकतों ॥
किंवा हंसकदंबकूजितचिं[1] हें भासे, परी तर्क तो ॥
नूपूरध्वनि हा उठे समजलों प्राणप्रियेचा खरा ॥
कीं तीचें वपुतेज फांकुनि दिसे हेमांबुसिक्ता[2] धरा ॥ १ ॥

(इकडे प्रियालाप कृष्णाच्या मुखाकडे पाहून बोलल्याप्रमाणें करावयास जातो.)

(तदनंतर मैत्रिणींसह राधा प्रवेश करिते.)

राधा—अग चंपकलते, तूं जो तमालवृक्ष मला सांगितलास तो अजून नाहीं कुठें दृष्टीस पडत ?

चंपकलता—अग, तो हा पहा पुढेंच आहे. अजून कसा नाहीं बाई तुला दिसला ?

(राधा त्याच्याकडे पाहून त्याच्या आळ्याशेजारीं जाऊन बसते.)

प्रियालाप—(त्या सर्वांची दृष्टि चुकवून कृष्णाजवळ येतो आणि त्याला हालवून म्हणतो) अहो राजश्री, तुमच्या मनांत जें होतें तेंच सुदैवानें घडून आलें बरें. आतां तुमची चैन आहे. (बोटानें दाखवून) ती पाहिलीत का कोण आहे ती ?

१ हंसांच्या समुदायाचा किलबिल शब्द. २ सोन्याच्या पाण्यानें शिंपडलेली.

(दोघेही ओणवे होऊन पाहतात.)

चंपकलता--(तमालाकडे व राधेकडे पाहून साभिप्राय) गडे राधे, खरेंच विचारतें, या तमालाच्या बुंध्याचा आश्रय करून बसलेली, पिवळ्या जुईच्या वेलीसारखी कोण बरें आतां शोभत आहे ?

कृष्ण—(मनांत) चंपकलतेनें जो हा प्रश्न केला तो मोठा खुबीचा आहे. पाहूं बरें आतां याचें ही काय उत्तर देते तें. (तमालाकडे सस्पृह पाहून)—

७ दिंडी.

तमाला रे धन्य तूं जाहलास ॥
लतावदनें कोमलें चुंबिलास ॥
स्थावरांमधिं[1] बा जरी जन्मलास ॥
जंगमाधिक[2] भोगिशी सुखविलास ॥ १ ॥

राधा–(रागानें भिंवया वर चढवून) अग, खरोखरीची तूं चंपकलता धडधडीत त्याला खेटून उभी राहिली आहेस, मग उगीच माझ्याविषयीं खोट्यानाट्या उपमा देऊन माझी थट्टा करतांना तुला लाज कशी वाटत नाहीं ?

चंपकलता–गडे, रागावूं नको. जें मनुष्य त्या स्थानाला योग्य त्यालाच ती उपमा साजते, समजलीस ?

प्रियालाप–(ऐकून हर्षानें) प्रियमित्रा, तुझें नशीब मोठें जोरावर आहे बुवा. तुला हवें तेंच उत्तर तिणें दिलें. आतां झालेंच तुझें काम फत्ते. पण अजून तुझ्या मनांत कांहीं संशयच आहेसें वाटतें. काय ह्या वेडाला म्हणावें !

कृष्ण–गड्या, तुझें भाषण ऐकून मला फार आनंद होतो व मनाला हुशारीही वाटते; तथापि तुला सांगतों, तिची प्राप्ति होणें फार कठिण आहे. हें मनांत येऊन या माझ्या अधीर व संशयखोर मनाला खात्रीसारखा अजून कांहीं प्रत्यय येत नाहीं; कारण—

---

१ वृक्ष आदिकरून जागा न सोडणारे सृष्ट पदार्थ. २ त्याच्या उलट म्हणजे जागा सोडणारे. प्रस्तुत स्थळीं या शब्दानें मनुष्यप्राणी समजावयाचा.

८ आर्या.

दुष्प्राप्यं[1] विषयवस्तू, हस्तगता जाहली जरी वाटे ॥
आश्वासिली[2] तरीही, संशय तत्प्राप्तिचा कधीं न फिटे ॥ १ ॥

प्रियालाप–(रागावल्यासारखें करून) जा माझ्याशीं तूं बोलूंच नको. ह्मणतातना, ' उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग, ' बेट्या, काळा कीं गोरा अजून तुला तिणें पाहिलें देखील नाहीं तोंच इतका हुरळून जातोस. तुला वाटतें तिणें काय धांवत येऊन तुझ्या बिछान्यावर बसावें आणि तुझ्या गळ्याला एकदम मिठी मारावी? पुरे आतां हें रडगाणें. जसें तूं तिला पाहिलें आहेस तसें तिणेंही तुला एकवार पाहिलें म्हणजे—(मध्येंच थांबतो.)

कृष्ण–(हांसून) अरे, म्हणजे काय? बोल पुढें काय बोलतोस तें.

प्रियालाप–अरे बोलायचें काय? म्हणजे मग तुझ्या मनासारखें होऊन मीं केलेलें अनुमान खरें आहे असें तूंच म्हणशील.

कृष्ण–(हांसून) म्हणूनच भटा तुला प्रियालाप[3] म्हणतात. हें तुझें भाषण गोड तर खरेंच.

चंपकलता–अग राधे, आतां कां उगीच राहिलीस? मी म्हटलें याचें कांहीं उत्तर देशील कीं नाहीं?

(राधा ऐकलें न ऐकलेंसें करून सख्यांनीं आणिलेल्या गंधपुष्पादि पूजासाहित्यानें कामदेवाची पूजा करिते.)

सार्‍या मैत्रिणी–(सप्रणाम हात जोडून) हे भगवंता कुसुमायुधा, आमच्या या प्रियसखीला प्रसन्न होऊन लवकर योग्य वर[4] दे.

---

१ दुर्लभ पदार्थ. २ मिळेल असें खात्रीनें सांगितलें तरी. ३ प्रिय भाषण करणारा. ४ या शब्दांत श्लेष आहे. एका अर्थीं वर म्हणजे नवरा व दुसऱ्या अर्थीं प्रासादिक देणगी.

कृष्ण–गड्या प्रियालापा, आतां पहा कशी मी एक गंमत करितों ती. मी पुढें जाऊन यांच्या पुढें उभा राहतों, इतक्यांत तूंही माझ्या मागून ये. (त्यांच्या जवळ जाऊन) अग सुंदरींनो, येथें इतक्यांत कोण बरें वर मागत होतें ?

साऱ्या मैत्रिणी–(कृष्णाला पाहून घाबरून) आर्या, कोणी कांहीं मागत नव्हतें. ही आमची प्रियमैत्रीण (हांसत राधेकडे बोट करून) भगवान् कामदेवाची पूजा करीत होती एवढेंच.

राधा–(हांसणाऱ्या मैत्रिणींवर रागावल्यासारखें करून वांकड्या नजरेनें कृष्णाकडे पहात मनांत म्हणते.) अग बाई, हा काय चमत्कार ! या पुरुषाला पाहून ज्या अर्थी माझें मन माझ्या स्वाधीन राहात नाहीं त्या अर्थी हाच तो दुर्लभ पुरुष असावा असें मला वाटतें.

कृष्ण—(राधेजवळ जाऊन) हे सुंदरी, कोणता वर तुला मनापासून आवडतो बरें ? बोल, लाजूं नको.

(राधा लज्जेनें मुरका मारून व घाबरल्यासारखें करून अधोमुख उभी राहाते.)

चंपकलता—(तिला तशी पाहून मैत्रिणीजवळ) अग तमालिके, हा कोण बाई मयूरपिच्छांचा मुकुट मस्तकावर धारण करून येथें उभा आहे ! याच्या रत्नखचित कर्णभूषणांतून तेजस्वी किरण याच्या गालांवर पहा कसे फांकत आहेत, व त्यांमध्यें कानांवर ठेविलेल्या विविध पुष्पांच्या सपल्लव गुच्छांची छाया कशी मिसळली आहे ! याचे विशाल नेत्र प्रफुल्लित कमलाच्या कांतीलाही लाजवितात. जन्मतःच ज्याचा वर्ण तांबडा आहे अशा याच्या कांतिमान् अधरोष्ठापुढें याच्या गळ्यांतील पोंवळ्यांची माळ अगदीं फिक्की पडून बिचारी लज्जार्णवांत[1] बुडत आहे असें पाहून दयार्द्र दृष्टीनेंच जणूं काय हा तिला पोटाशीं सांवरून धरीत आहे व तिच्याकडे

---

१ लज्जारूप समुद्रांत.

पाहून मधुर हास्य करीत आहे. मोठमोठ्या सुढाळ मोत्यांचा हार याच्या उरस्थळावर रुळत असल्यामुळें व सुवर्णकांति पिंवळा धमक पीतांबर परिधान केल्यामुळें किती तरी बाई हा तेजःपुंज दिसत आहे! उजव्या हातांत सहज लीलेनें कमल धारण केलें असल्यामुळें मी आज धन्य झालों असें त्याला वाटतें. रूपसंपत्ति पाहिली तर शेंकडों मदनांना मोहित करणारा. भाषण तरी किती मर्यादशील आणि गोड. जणूं काय मुखचंद्रापासून स्रवणारें केवळ अमृतच! याच्या शरीरलावण्याची नीलवर्ण प्रभा चोहोंकडे फांकत असल्यामुळें कालिंदीजल[1]च येथें पसरलें आहे. कीं काय असा भास होतो! आणि तें या आपल्या प्रियसखीचा मनोमीन[2] जणूं काय बलात्कारानें आपल्या उदरांत ओढून नेत आहे असें वांटतें[3]. एकंदरीनें पहातां हाच तो दिव्याकृति सुकुमार नंदकिशोर गोपाळकृष्ण असावा हेंच खचित. नाहींपेक्षां इच्या मनाचें हरण करण्याविषयीं दुसरा कोण समर्थ असणार? या श्यामसुंदराला पहातांक्षणींच बिचारीची काय अवस्था झाली आहे पहा! इच्या मुखांतून जो सीत्कार[4] बाहेर पडत आहे तो कामदेवाच्या प्राथमिक शरप्रहारजन्य पीडेचाच परिणाम होय. त्याच्या त्या प्रखर शरांचे एकसारखे तडाखे बसत असल्यामुळें इच्या कोमल तनूवर रोमांचांचें जणूं काय जाळेंच पसरून गेलें आहे! सर्वांग घामाघूम होऊन गेल्यामुळें असें वाटतें कीं, या इंदुमुखीच्या सुंदर तनूंतून हा अमृतस्रावच होत आहे. मदनबाधेनें विव्हल होऊन ही एकसारखा श्वासोच्छ्वास सोडीत असल्यामुळें तज्जन्य वायु लागून इच्या उरस्थलावरील पदर वारंवार एकीकडे सरकत आहे. भीतीनें हातपाय लटलट कांपत आहेत. लज्जेनें तोंडांतून एक शब्ददेखील निघत नाहीं. बरें इकडे या सुंदर पुरुषाची अवस्था

---

१ यमुनेचें पाणी. याचा रंग काळसर असतो. हें प्रसिद्ध आहे. २ मन हाच कोणी एक मासा. ३ पाण्याच्या ओढीसरसे मासे आंत जातात या वस्तुस्थितीस अनुलक्षून हें वर्णन आहे. ४ दुःखावेगानें श्वास आंत ओढून घेतांना जो शब्द होतो तो.

पाहिली तर हाही अगदीं वेडावून गेल्याच्यागत दिसतो. पहा हा कसा पापणीस पापणी न लावितां या प्रियसखीकडे टक लावून एकसारखा पहात आहे. कोणी म्हणेल हें एक चित्रच येथें उभें केलें आहे!

तमालिका–गडे चंपकलते, खरें विचारशील तर तुझ्यासारखें मलाही पण वाटतें.

चंपकलता–(कृष्णाजवळ जाऊन) आर्या, तुमच्या दर्शनानेंच या आमच्या प्रियसखीला इष्ट वर मिळाला असें आम्ही समजतों. याशिवाय दुसरा आणखी कोणता उत्तम वर इला मिळणार ?[1]

राधा–(रागावल्यासारखें करून) चंपकलते, हें तुझें दुटप्पी बोलणें मला समजतें बरें का. मी कांहीं बोळ्यानें दूध पीत नाहीं. बोल बाई हवें तसें. तुझ्या तोंडाला हात कुणी लावावा ? मी आपली इथून निघूनच जातें म्हणजे झालें. (असें म्हणून जाऊं लागते.)

(पडद्यापलीकडून मोठा गोंगाट ऐकूं येतो.)

गडयांनो, काय चमत्कार हा! आज गोपालकृष्णाचें दर्शन घेण्याविषयीं उत्सुक झालेलें हें गाईंचें खिल्लार उच्चस्वरानें वारंवार हंबरडे फोडून जणूं काय त्याला हांका मारीत आहे असें वाटतें. वाटेनें चालतां चालतां मध्येंच थबकून दीनासारखें वरचेवर मागें पाहातें. तिकडे तो दृष्टीस पडत नाहीं म्हणून पुढें पाहूं लागतें. या भोगाला काय करावें ? जणूं काय आमची या गाईंना अगदीं ओळखच नाहीं! यांना आवरतां आवरतां आज आमची फारच त्रेधा उडून गेली आहे. या वेळीं तो आमचा संवगडी येथें असता तर बरें झालें असतें. कदाचित् या लतामंडपामध्यें प्रियालापासहवर्तमान

---

१ आपणच इला योग्य वर आहां अशी मोठ्या मार्मिकतेची ही सूचना आहे.

तो बसला असेल. यासाठीं तिकडे जाऊन त्याचा अगोदर शोध करूं चला.

(गोंगाट ऐकून सगळ्याजणी घाबरतात.)

कृष्ण–(मनांत) अरेरे! हे बिचारे गोपाळ खरोखरच माझा शोध काढण्यासाठीं इकडे येत आहेत. आतां कसें करावें? (मोठ्यानें) प्रियालापा, गड्या पुढें होऊन त्यांना माघारे घालवून देईनास?

प्रियालाप–ठीक आहे. हा चाललों पहा. (असें म्हणून निघून जातो.)

चंपकलता–आर्या, या गोंगाटानें आमच्या सर्वांच्या मनांत भीति उत्पन्न झाली आहे, म्हणून आम्हाला घरीं जाण्याविषयीं आपली आज्ञा असावी.

कृष्ण–(उसासा टाकून) बरें आहे. जर तुमच्या मनांत कांहीं निमित्त करून येथून जायचेंच असेल तर खुशाल जा; पण पुनः येथें येण्याचें स्मरणांत असूं द्या.

(सगळ्याजणी जाऊं लागतात.)

राधा–(मध्येंच अडखळल्यासारखें करून मागें पहाते व उभी राहून म्हणते) अग चंपकलते, माझ्या गळ्यांतील मुक्ताहारांतला महानीलमणि इतक्यांत इथें कुठें तुटून पडला. शोध कर बाई कुठें सांपडला तर.

कृष्ण–(मनांत म्हणतो)–

९ साक्या.

उपकाराचे हा हारलते तव झाला मजवरि फार ॥
आयताक्षि[1] त्या योगें दावी आत्मभाव अनिवार ॥
सुंदर लीला ही ॥ किति तरि मानस मोही ॥ १ ॥

---

१ जिचे डोळे मोठे आहेत ती. हें राधेचें विशेषण.

स्मितवदना सुस्निग्ध[१] दृष्टिनें मार्ग क्रमितां मातें ॥
हळूच मागें वळूनि निरखी व्यक्त करी कामातें ॥
सुंदर लीला ही ॥ किति तरि मानस मोही ॥ २ ॥

चंपकलता—(कृष्णाकडे व राधेकडे पाहून मणी शोधीत असतां साभिप्राय) गडे राधे, चल बाई आपण घरीं जाऊं. तो नीलमणि आतां कसचा हातीं लागतो[२] (असें म्हणून पुन: कृष्णाकडे पाहून हंसते.)

(राधा तिकडे लक्ष्य न देतां हिरमुसलें तोंड करून उभी राहाते.)

चंपकलता—(हाराकडे पाहून) अग, तुझा नीलमणि[३] हरवला म्हणून म्हणतेस, पण या वेळीं तुझें मन ठिकाणीं असेल तर ना तो तुला दिसेल? अग, हा सगळा तुझ्याच हृदयाचा दोष आहे बरें.

राधा—कसा ग बाई माझ्या हृदयाचा दोष ?

चंपकलता—अग वेडे, तुझ्या मनाला या वेळीं कसलीशी हुरहूर लागल्यामुळें तो नीलमणि हृदयस्थानीं विराजमान असूनही तुझें त्याच्याकडे लक्ष्य जात नाहीं म्हणून.

राधा—कशाची ग हुरहूर ? आणि कोणत्या ग नीलमण्याकडे माझें लक्ष्य जात नाहीं ? ही तुझी भलतीच कांहीं तरी वटवट आहे. मला नाहीं बाई असला चावटपणा खपायचा.

चंपकलता—(उपरोधिक शब्दांनीं) अग, घरीं जाण्याची हुरहूर, आणि इतका जवळ असून तुला न दिसणारा तो नीलमणि, दुसरें काय ?

---

१ प्रेमयुक्त. २ वर्णसादृश्यावरून कृष्ण हा एक उत्तम नीलमणिच आहे, तो तुला कसचा मिळतो असा अभिप्राय मोठ्या खुबीनें येथें व्यक्त केला आहे. ३ नीलमणि म्हणजे कृष्ण अशा अभिप्रायानें वरील भाषणाप्रमाणेंच हें भाषण श्लिष्ट आहे व पुढील संवादही तसाच आहे हें मार्मिक वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल.

राधा–(भिवया वर चढवून रागानें) जा चावट कोठली. हे तुझें घालून पाडून बोलणें मला का समजत नाहीं? दुसऱ्याचीं वर्मे बाहेर काढायला बरीच शिकली आहेस. पुरे बाई आतां इथें राहाणें. मी आपली घरीं जातें. (असें म्हणून जातांना सस्पृह मनानें कृष्णाला स्पर्श करून व दुःखोच्छ्वास सोडून सख्यांसहवर्तमान निघून जाते.)

कृष्ण–(वियोगदुःखानें मनांत म्हणतो)—

१० श्लोक. (हरिणिवृत्त.)

सकलभुवनश्रीनें जी कां दिसे अति शोभनो ॥
पुनरपि वनीं जेव्हां म्यां ती विलोकिलि अंगना ॥
हृदयिं धरुनी लज्जात्यागें न ती कंवटाळिली ॥
प्रलपनेंचि हें सारें आतां! सुसंधिहि टाळिली ॥ १ ॥

(दुःखोच्छ्वास टाकून) अरेरे! ती गेलीच शेवटीं. आतां काय करावें! कांहीं थट्टामस्करी करून माझ्या मनाला करमणूक करणारा काय तो एक प्रियालाप उरला आहे, पण तोही बेटा त्या गोपालांच्या पाठीमागून गेला तो अजून येत नाहीं. त्याला इतका उशीर कां लागला न कळे.

(नंतर प्रियालाप प्रवेश करितो.)

प्रियालाप–(आनंदानें टाळ्या पिटीत) बस्स. आतां सर्व ठीक झालें. प्रियमित्राच्या आज्ञेप्रमाणें त्या बटकीच्या गवळ्यांना कसें तरी मीं पिटाळून लाविलेंच. आतां लवकर जाऊन ते राजश्री कोठें आहेत याचा शोध करितों. (इकडे तिकडे फिरून हर्षानें) केवढी माझ्या नशिबाची सद्दी ही! ही पहा स्वारी इकडेसच येत आहे. आतां आपणच पुढें होऊन याला गांठावें. (दुरून त्याला पाहून मनांत म्हणतो) अरेरे! काय याची ही

१ शोभा. २ सुंदर. ३ व्यर्थ बडबड.

अवस्था झाली आहे. पहांटेच्या चंद्राप्रमाणें याची मुखश्री निस्तेज झाली आहे. तोंडावर कळा म्हणून कांहींच दिसत नाहीं. खालीं पहात चालला आहे. डोळे भरून आलेले दिसतात. अंगांत जडत्व येऊन पाय देखील भराभर उचलत नाहीं. इतकेंही असून भ्रमिष्टासारखा आपल्याशींच कांहीं बडबड करीत चालला आहे. ही या स्वारीची स्थिति पाहून मला फार दुःख होतें; पण एका प्रकारें पहातां बेटा हर्षही होतो. मला खचित वाटतें याचें मनोरत्न त्या वृषभानु गवळ्याच्या पोरीनें चोरून नेलें म्हणूनच हा शुद्धीवर नसून असा भटकतो आहे. (कृष्णाच्या जवळ जाऊन) प्रियमित्रा, तुझा विजय असो. कसें काय, ठीक आहे ना ?

कृष्ण–(वर पाहून) कोण तो? प्रियालाप ! गड्या ये लवकर. मला एकवार घट्ट मिठी मार. तुला जाऊन फार वेळ झाल्यामुळें मला एकट्याला अगदीं करमेनासें झालें.

प्रियालाप—मारतों बाबा. तूं म्हणतोस तसेंच कां होईना. (त्याच्या गळ्याला घट्ट मिठी मारितो व दचकून लागलाच मागें सरतो) गड्या, खरेंच सांग, एक नाहीं, हजारो चंद्रांप्रमाणें तुझें अंग शीतल असून तें या वेळेस जें इतकें कढत लागतें आहे तें माझ्याच विरहानें किंवा दुसऱ्या कोणाच्या? अथवा तूंच कशाला सांगायला पाहिजेस? मला समजत नाहीं काय कीं, लीलाविलासांनीं साक्षात् रतीवरही तान करणारी ती वृषभानुकन्यका राधा तुझ्या डोळ्यांत भरली असें पाहून व तुझ्या रूपसौंदर्यानें लज्जित होऊन तिचा पति जो कामदेव त्याला अत्यंत राग आला; म्हणून तुझा सूड उगविण्याकरितां तोच तुझ्या शरीराचा असा दाह करीत आहे.

(कृष्ण कांहीं न बोलतां खालीं मान करून उभा राहतो.)

प्रियालाप—वेड्या, पुरे झाली आतां ही लाज. चल ह्या तांबड्या अशोक वृक्षाच्या पारावर घटकाभर जाऊन बसूं, म्हणजे तुझ्या श्रमाचा परिहार होईल. मीही तेथें बसून तुला थंडगार करण्याचा कांहीं उपाय सुचला तर पाहतों. अहाहा ! तें स्थळ किती तरी रमणीय आहे! छाया कशी शीतल आणि दाट पडली

आहे ! शिवाय कालिंदींतील जलाचे थंडगार तुषार आणि जवळच्या पुष्पवाटिकेंतील सुमनांचा सुगंध वायूच्या मंद झुळुकांबरोबर वहात येत असल्यामुळें तें स्थान तुला फारच आल्हादकारक होईल.

(उभयतां पारावर जाऊन बसतात. प्रियालाप हातावर डोकें टेंकून व डोळे झांकून कांहीं विचार करीत बसतो.)

(इतक्यांत पडद्यापलीकडून गोंगाट ऐकूं येतो.)

प्रियालाप–(कान देऊन) मित्रा, अरे मित्रा, ते पहा बटकीचे गोपाळ पुनः इकडे धांवत येत आहेत. ऊठ ऊठ लवकर. आपल्या शुभदर्शनानें आणि अमृतासारख्या गोड वाणीनें त्यांच्या श्रमाचा परिहार कर.

कृष्ण–(मोठ्या लगबगीनें उभा राहून) काय, गोपाळ आले म्हणतोस ? कोठें, कोठें आहेत ते ?

(इतक्यांत गाईंचें खिल्लार पुढें घालून त्याच्या मागून त्याला राखणारे गोपाळ तेथें येऊन पोहोंचतात. सगळेजण कृष्णाच्या नांवाचा जयघोष करून घाईघाईनें त्याच्याजवळ जाऊन एकामागून एक त्याला प्रेमालिंगन देतात. गाईही त्याचा अमृतासारखा मधुर शब्द ऐकून मोठ्यानें हंबरूं लागतात, व त्यांच्या त्या प्रेमळ हंबारवानें तो सारा वनप्रदेश गजबजून जातो. श्रीकृष्णाचें दर्शन होतांच त्यांच्या स्तनांतून दुग्धधारा निघून त्यांचा प्रवाह भूमितलावर वाहूं लागतो, व त्या हर्षभरित होत्सात्या आपले कान उभारून उत्फुल्ल नेत्रांनीं त्याच्याकडे पहात व आनंदाश्रु गाळीत उभ्या राहतात.)

कृष्ण–(त्यांची ती दीन स्थिति पाहून दुःखित होत्साता क्षणभर उभा राहातो व प्रेमानें गोपालांचें स्वागत करून त्यांस म्हणतो) गड्यांनो, तुम्ही फार दमलां आहां, यासाठीं या रमणीय स्थलीं कांहीं वेळ बसून यथेच्छ विश्रांति घ्या, म्हणजे तुम्हाला बरें वाटे-

कृ. इतक्यांत मीही त्या मधुमालतीच्या मंडपाजवळ मला कांहीं काम आहे तें करून येतों. (असें म्हणून प्रियालपाच्या तोंडाकडे पहात जाऊं लागतो.)

प्रियालाप–(एकीकडे तोंड फिरवून त्याला ऐकूं न जाईल अशा शब्दानें) राधेच्या प्राप्तीविषयीं उत्कंठित झाल्यामुळें तुझें चित्त बेटया ठिकाणीं आहे कुठें? त्या मंडपाजवळच्या एकांतस्थळीं जाऊन तुला काय रे करावयाचें आहे? ती कोठें दृष्टीस पडत नाहीं म्हणून रडत बसावयाचें हेंच कीं नाहीं? (मोठ्यानें) मित्रा, या गाईगोपालांना टाकून तूं आतां चाललास तरी कोठें! आणि कशा करितां?

कृष्ण–गडया सांगतों ऐक. त्या प्राणवल्लभेच्या संचारानें अत्यंत पवित्र झालेल्या वनप्रदेशांत फिरून तिच्या पावलांची उमटलेलीं चिन्हें पाहून या डोळ्यांचें कांहीं पारणें फिटलें तर पहातों. दुसरें काय? (पुढें जाऊन खालीं वांकून पहातो व रोमांचित होऊन म्हणतो.) गडया, बघ बघ, येथें जमिनीवर काय दिसतें आहे तें.—

११ श्लोक. (मालिनी वृत्त.)

सहचरिंसह[1] जातां या पथें सुंदरी ती ॥
उमटलि पदपंक्ती[2] लोचनां लोभवीती[3] ॥
बघुनि उलटलेलीं पाउलें तींत तीचीं ॥
अभिलषित[4] मनीषा[5] व्यक्त होते प्रियेची ॥ १ ॥

प्रियालाप–मित्रा, थट्टामस्करी केल्यानें तुझें मन यापूर्वीं जसें खुष होत असे तसें आतां कांहीं होत नाहीं; यावरून खचित मला वाटतें, त्या वृषभानूच्या मुलीवर तुझें अत्यंत प्रेम जडून तुला तिणें अगदीं वेडा करून सोडिलें आहे. धन्य बुवा या बायकांची!

---

१ सोबतिणी. २ पावलांची ओळ. ३ लोभविणारी. ४ अत्यंत आवडीची. ५ इच्छा.

कृष्ण–(दुःखोच्छ्वास सोडून) अरे, कशाचें प्रेम घेऊन बसला आहेस ?

१२ आर्या.

या मम खलहृदयीं रे प्रेमाचा लेशही कुठें न वसे ॥
कीं दृष्टिआड झाली सुंदरि तरि मी सजीव केविं असें ॥ १ ॥

प्रियालाप—अरे, तूं त्या हृदयाला खल कसें म्हणतोस ? तें खरोखरच फार सुंदर व खोल असलें पाहिजे, नाहीं तर उगीच का तुला भुलून ती इतकी तुझ्या नादीं लागली असती व त्याच्या तळाशीं खुशाल दडी देऊन बसली असती ?

(दोघे खालीं बसतात.)

कृष्ण—(उत्कंठेनें) गड्या प्रियालापा, तूं म्हणतोस तें मला कांहीं खरें वाटत नाहीं. असो; पण माझ्या दुःखाचें निरसन करण्याचा तूं कांहीं उपाय योजणार होतास त्याचें काय झालें ?

प्रियालाप—(अंगीं आढ्यता आणून कानांत सांगतो) अरे, काय झालें म्हणून काय विचारितोस ? असा छानदार उपाय शोधून काढिला आहे कीं ज्याचें नांव तें. तो लागू पडला कीं तुझें काम फत्ते झालेंच असें समज. पण बुवा, कांहीं दक्षिणा मिळाल्यावांचून या ब्राह्मणाच्या तोंडांतून तो बाहेर निघावयाचा नाहीं.

कृष्ण—(हांसून बोटांतली अंगठी काढून द्यावयास लागतो.) ब्राह्मणा, ही घे दक्षिणा. आतां तर सांगशीलना काय उपाय तो?

प्रियालाप—(हांसून) ठीक आहे. नीट ऐकून घे. अरे, त्रिभुवनांतील साऱ्या सुंदर स्त्रियांचें हृदय हरण करणारा तूं तिच्या डोळ्यांत ज्या अर्थीं पूर्णपणें भरून राहिला आहेस त्या अर्थीं तुझ्या विरहानें विव्हल झालेल्या त्या बिचारीला तुझ्यावांचून घटकाभर तरी चैन पडेल काय ? कधीं पडणार नाहीं. तेव्हां अर्थातच तिच्या सुखदुःखाच्या वांटेकरी मैत्रिणी तिला ज्या उपायानें सुख होईल तो उपाय योजतीलच. मग उगीच कां तूं इतका घायकु-

तीस येऊन रडत बसला आहेस? अरे, या वेळेस तो कामदेवच तुझा साह्यकारी आहे, तो सगळें जुळवून देईल. काळजी कां करतोस?

कृष्ण—(हांसून प्रियालापाला आलिंगन देतो) गड्या, तुझें नांव प्रियालाप आणि तूं जें हें बोललास तोही खरोखरच प्रियालाप आहे यांत संशय नाहीं. नांवाप्रमाणें कृति खरीच!

प्रियालाप—मित्रा, अरे यांत प्रियालापता ती कसली? मी बोलतों एवढेंच नव्हे, तर आणखीही माझ्या कानांवर असें आलें आहे कीं,—

कृष्ण—(उतावीळा होऊन हांसून) सांग सांग काय कानांवर आलें आहे तें.

प्रियालाप—अरे, मीं असें ऐकिलें आहे कीं, तुला पाहून घरीं गेल्यानंतर कामबाधेनें ती फारच तळमळ करूं लागली. सांग, यांतलें इंगित काय बरें असावें?

कृष्ण—(दुःखित होऊन मनांत)—

१३ श्लोक. (मंदाक्रांता.)

हा हा! देवी! सुमनमृदु तें त्वद्वपू होय साचें ॥
कैसे वज्रप्रखर शर गे सोसिशी मन्मथाचे ॥
येतां दीनस्थिति तव अशी सुंदरी मानसांत ॥
दूरस्थायी असुनिहि मला दुःख होतें नितांत ॥ १ ॥

(मोठ्यानें) बरें मग पुढें काय म्हणतोस?

प्रियालाप—नंतर तुझ्या ठिकाणीं तिची आशा गुंतून राहिली आहे असें जाणून तुझ्याकडे पाठविण्याकरितां तिच्या चतुर मैत्रिणींनीं एक कामपत्रिका तयार केली म्हणून ऐकितों.

कृष्ण—(आशा उत्पन्न होऊन) बरें मग पुढें?

---

१ गोड भाषण. २ फुलासारखें मऊ. ३ तुझें शरीर. ४ वज्रासारखे तीक्ष्ण. ५ अत्यंत. ६ जींत मदनापासून होत असलेली बाधा व्यक्त केली आहे अशी.

प्रियालाप—पुढें काय कपाळ तुझें. उगीच आतां रडत बसूं नको. लवकरच ती तुझी हृदयंगमा[1] येथें येईल, यासाठीं या तांबड्या अशोकवृक्षाच्या खोडाआड कोणाच्या दृष्टीस न पडतां हळूच लपून बसूं चल.

(नंतर गाईंच्या कळपाकडून सुबल या नांवाचा एक गोपाल येतो.)

सुबल—अरे गोपालकृष्णा, या गाईंची तुला कांहीं तरी दया येऊं दे. अरे, तुझ्यावांचून त्या पाणी देखील पीत नाहींत. मग चारा खाण्याची गोष्ट कशाला पाहिजे? त्यांना गोठ्यांत नेऊन घालण्याचीही वेळ होत चालली. तर आतां तरी तूं आमच्या बरोबर येतोस का?

कृष्ण–(उसासा टाकून प्रियालापाला एकीकडे नेऊन म्हणतो)–

१४ साक्या.

सौंदर्याब्धिचें[2] केवळ किंवा दैवत तें तेजाचें ॥
विलासमंदिर मदनाचें वा सारचि माधुर्याचें ॥
न कळे काय म्हणूं ॥ तद्गुण किति रे वाखाणूं ॥१॥
अशा प्रियेनें जातां नेलें ओढुनि मम चित्ताला ॥
निराश होती सकल इंद्रियें पावुनि परवशतेला ॥
न कळे काय म्हणूं ॥ तद्गुण किति रे वाखाणूं ॥२॥

प्रियालाप—कांहीं असो, पण जिकडे पाहावें तिकडे सारी मनाच मजा दिसते!

(असें म्हणून सर्व निघून जातात.)

दुसरा अंक समाप्त.

---

१ हृदयांत भरलेली, अर्थात् आवडती. २ सौंदर्याचा सागर.

अंक तिसरा.

(तदनंतर सख्यांसहवर्तमान राधा प्रवेश करिते.)

(राधा असह्य कामविकारानें विव्हल झाली असून मोठ्या कष्टानें तसें न दाखवितां चालण्यानें थकल्यासारखें करून खालीं बसते.)

चंपकलता—(तिच्या तोंडावर आलेले घर्मबिंदु आपल्या पदरानें पुसून व विनोदानें हांसून) गडे राधे, तूं जी इतकी थकून गेली आहेस हा किनई तुझ्या नितंबभाराचाच अपराध आहे बरें. हा तुझा थकवा आतां लवकरच नाहींसा होईल, कांहीं काळजी करूं नको; कारण ज्याच्या आश्रयाखालीं तुझ्या जिवाला आराम वाटावयाचा तो नीलतमाल हा पहा जवळच आहे. येथें-च नाहीं का तो त्रिभुवनमोहन तुझ्या दृष्टीस पडला ?

राधा–(भिवया वर चढवून रागानें) अग, कोणता ग तो त्रिभुवनमोहन ?

चंपकलता–अग कोपिष्टे, अशी भलतीच शंका मनांत कां आणितेस ! त्रिभुवनाला मोहित करणारा एका कामदेवावांचून दुसरा कोण असणार? त्याची नाहीं का तूं नुकतीच येथें पूजा केलीस ?

राधा–(आपल्या मनांत) अग बाई ! माझी खरी स्थिति इच्या लक्ष्यांत आली वाटतें. (मोठ्यानें) अग, तुझें हें चावटपणाचें दुटप्पी बोलणें मी कधीं ऐकून घ्यावयाची नाहीं बरं का ! मी आपली इथून निघूनच जातें कशी. मग बैस बाई खुशाल हवी तितकी वडबडत. (असें म्हणून जाऊं लागते.)

---

१ ढुंगणाचा भार. २ या शद्बांत श्लेष आहे. तमालाप्रमाणें नीलवर्ण ज्याचा असा श्रीकृष्ण या शब्दानें ध्वनित होतो.

चंपकलता–(कांहींशी पुढें जाते व समोर तमालवृक्ष पाहून राधेला म्हणते.) अग घायकुत्ये, जराशी थांबशील तर खरी. येथें जवळच श्रीकृष्णाची दाट व शीतल छायेची पुष्पवाटिका आहे तेथें घटकाभर बसून विश्रांति घे म्हणजे हुरहुर लागलेल्या तुझ्या मनाला कांहीं बरें वाटेल.

(राधा सख्यांसहवर्तमान पुष्पवाटिकेंत जाऊन बसते.)

(कृष्णही प्रियालापाला बरोबर घेऊन मोठ्या त्वरेनें तेथें येतो.)

(सर्वजणी भयचकित मुद्रेनें पाहतात.)

राधा–(चोरट्या नजरेनें हळूच कृष्णाकडे निरखून पाहून मनांत) वेड्या मना, उगीच उतावीळ कां होतेंस ? स्वस्थ रहा. आतां बरीक तुझे मनोरथ तुला पाहिजे आहे त्याहीपेक्षां अधिक फलद्रूप होण्याची वेळ जवळ आली आहे.

प्रियालाप–अग चंपकलते, भली सांपडलीस माझ्या तावडींत! तुम्ही रोज रोज या बागेंतील फुलें व या पुष्करणींतलीं कमलें चोरून आपल्याला नटवितां तें काय म्हणून ग ?

कृष्ण–(हांसून) गड्या, असा फाजीलपणा करण्यांत काय अर्थ आहे ? कारण, या तरण्याताठ्या मुलींची रीतच अशी आहे. त्यांची पुंष्पवती होण्याची हौस कोणाच्यानेंही निवारण होणार नाहीं.

चंपकलता–(कृष्णाचें हें छद्मी भाषण ऐकून प्रियालापास म्हणते) बाबारे, जसें या तुझ्या प्रियमित्रानें गोकुलांत गोपांगनांच्या–(इतकें अर्धवटच बोलून लाजून स्तब्ध राहते.)

प्रियालाप–अग दांडगे पोरी, या माझ्या प्रियमित्रानें त्या गवळिणींचा काय ग अपराध केला?

चंपकलता–(हांसून) अपराध काय केला ? भटजीबुवा, तुम्हालाच बरोबर घेऊन गोपींच्या घरोघर फिरून दहींदूध चोरिलें व आणखीही दुसऱ्या त्यांच्या कांहीं खोड्या केल्या त्या साऱ्या विसरलांत वाटतें ?

---

१ या शब्दांत श्लेष आहे. एक अर्थ पुष्पांचे अलंकार घालून नटण्याची व दुसरा अर्थ ऋतुमती होण्याची.

कृष्ण–(आश्चर्य पावून मनांत) या धूर्त सखीनें माझ्या मनांतील अभिप्राय जाणून युक्तीनें माझ्या तंगड्या पहा कशा माझ्याच गळ्यांत अडकविल्या!

प्रियालाप—तें कांहीं असो, पण पोरी, या तुझ्या प्रियमैत्रिणीनें माझ्या मिताचें सुमनपंकज[1] आपल्याजवळ लपवून ठेविलेलें मीं आतांच्या आतां बाहेर काढून दाखविलें तर कसें होईल?

चंपकलता–(साभिप्राय) काय व्हावयाचें आहे? आणि या माझ्या प्रियसखीचेंही सुमन कांहीं चमत्कारिक रीतीनें कोणीं चोरून नेलें असलें तर?

प्रियालाप–मग नेलें असलें म्हणून काय झालें?

चंपकलता–काय झालें! आणि हिणें तरी चोरी केली म्हणून काय झालें? फिटासफीट झाली. फार तर चोर ठरली म्हणून ही खालीं मान घालून बसेल एवढेंच कीं नाहीं?

(राधा रागानें कपाळास आंठ्या घालून चंपकलतेकडे पाहते.)

कृष्ण–हे सुंदरी, तुला चोर म्हटलें म्हणून रागावतेस कां? खरोखरच हे तुझे सारे अवयव तुझें चौर्य उघड करून दाखवीत आहेत. कसें म्हणशील तर पहा.—

१. श्लोक (पृथ्वीछंद.)

प्रफुल्ल सरसीरुहा[2] हरितसे तवास्य[3] प्रिये ॥
जपाकुसुमही[4] तवाधर लुबाडितो निश्चयें ॥
तुझें नयनयुग्म गे विकचपद्मशोभा[5] हरी ॥
तसेंच इतरांगही सुमनसंचयातें करी ॥ १ ॥

---

१ या शब्दांत मोठा खुबीचा श्लेष आहे हें मार्मिक वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल. सुमनपंकज याचा उत्तानार्थ पुष्प आणि कमल, व सुमन म्हणजे उत्तम मन हेंच कोणी एक कमल हा श्लिष्टार्थ. चंपकलतेच्या पुढील भाषणांतील सुमन हा शब्द अशाच अर्थानें योजिलेला आहे. २ कमलास. ३ तुझें मुख. ४ जास्वंदीचें फूल. ५ प्रफुल्लित कमलाची शोभा.

(राधा भीतीनें खालीं तोंड करून बसते.)

कृष्ण–(मनांत) अहाहा! ही घाबरली आहे तरी या वेळेस इच्या अंगीं आलेली शोभा कांहीं अलौकिक दिसते. स्वभावसुंदरींना त्यांची भयशीलताच प्रायशः भूषणास्पद होते असें जें ह्मणतात तें कांहीं खोटें नव्हे. हिची मुखश्री पाहून अशी कांहीं मौज दिसते कीं,

२. श्लोक (मालिनीवृत्त.)

बघुनि मृगदृशेच्या[1] चंचलां विभ्रमांनां[2] ॥
कुवलयदललक्ष्मी[3] टाकिते स्वाभिमाना ॥
सुतनु निजमुखाब्जीं स्वेदलेशोपरक्तीं[4] ॥
अमृतकरकलंकां[5] दाविते स्पष्ट रीती ॥ १ ॥

(पडद्यापलीकडून कोणी बोललेलें ऐकूं येतें.)

अग प्रियदर्शने, ती आपली प्रियसखी राधिका कोठें आहे ती तुला ठाऊक आहे का? आईसाहेब जेवण्याकरितां तिची वाट पहात खोळंबून बसल्या आहेत. (वर आकाशाकडे कान देऊन) काय म्हणतेस? मैत्रिणींसहवर्तमान पुष्पवाटिकेकडे गेली म्हणून? तर मग बाई आतां तिचा शोध कोठें बरें करावा?

चंपकलता–(पूर्वोक्त भाषण ऐकून सख्यांकडे वळून) गडे तमालिके, ही नागरिका राधेचा शोध करीत इकडे येत आहे असें मला वाटतें.

तमालिका–हो खरेंच, मलाही बाई असेंच वाटतें.

कृष्ण–(पूर्वोक्त संभाषण ऐकून उद्विग्न होऊन जवळच्या तमालवृक्षाच्या आड उभा राहतो, व कामातुर होत्साता जिकडून भाषण ऐकूं आलें त्याच दिशेकडे पहात प्रियालापास म्हणतो.)

---

१ जिचे डोळे हरिणासारखे आहेत अशी. २ डोळ्यांचे चाळे. ३ कमलपत्राची शोभा. ४ घर्मबिंदूंनीं भरलेलें. हें मुखाब्जाचें विशेषण. ५ चंद्रावरील ठिपके.

३. श्लोक (शार्दूलविक्रीडित.)

जों मी बोलुन गोडगोड वचनें ही आळवीं सुंदरी ॥
तद्भावा अणि तत्सखीजनमनां जाणोनि अभ्यंतरीं ॥
तों ही नागरिका अवग्रह[1] जसा हो वृष्टिला रोधक ॥
येऊनी करि विघ्न, दुर्विधि[2] कसा झाला मला बाधक! ॥१॥

प्रियालाप—मित्रा, भगवान् सहस्ररश्मि सूर्यनारायण या समयीं फारच तापप्रद झाला आहे; यासाठीं या तमालवृक्षांच्या राईंत घटकाभर बसून विश्रांति घेऊं चल.

कृष्ण—(वर आकाशाकडे पाहून) खरोखरच माध्यान्हसमय झाला, या वेळेस—

४. श्लोक (शार्दूलविक्रीडित).

तप्तोरंगम[3] हा पहा शिखितलच्छायाश्रयातें[4] करी ॥
तोंही[5] सोडुन वैरभाव दडतो वृक्षाचिया कोटरीं[6] ॥
तोयेच्छा[7] करिती निकुंजभवनीं[8] तृष्णातुरा[9] सारिकां[10] ॥
सोडोनी अलिसंघ[11] तप्त कमलें व्यापी लतावाटिकां[12] ॥ १ ॥

(दोघे तमालवृक्षाच्या दाट सावलींत जाऊन बसतात.)

कृष्ण—गड्या, ती नयनाभिरामा[13] राधिका तर सरते शेवटीं गेलीच. आतां कोणत्या उद्योगांत हा कंटाळवाणा दिवस घालवावा बरें?

प्रियालाप—(हांसून) मित्रा, अरे कसा घालवावा म्हणून

---

१ वाईट ग्रह. २ दुर्दैव. ३ तप्त झालेला उरंगम म्हणजे सर्प. ४ मोराच्या पोटाखालीं सावलीचा आश्रय करून, मोराचें आणि सर्पाचें स्वाभाविक वैर असूनही, असा भावार्थ. ५ मोर. ६ ढोलींत, जेथें सर्प असण्याचा संभव असतो तेथें. ७ पाणी पिण्याची इच्छा. ८ लतागृहांत. ९ तृषेनें व्याकुल झालेल्या. १० पक्षिविशेष, साळुंक्या. ११ भ्रमरांचा समुदाय. १२ पुष्पलतांची बाग. १३ डोळ्यांना आनंद देणारी.

काय विचारितोस ? डोळे झांकून एकाग्रचित्तानें तिचें ध्यान करीत बसावें, अथवा तिची तसवीर काढून दर्शनसुख घेत बसावें, दुसरें काय ?

कृष्ण—गड्या, नुसतें ध्यान करीत बसल्यानें काय होणार आहे ? तिचें चित्र काढावें म्हणून म्हणतोस हें बरीक खरें; पण तें काढण्याचीं येथें साधनें कोठें आहेत ?

प्रियालाप—हात् तिच्या ! याचीच का तुला एवढी काळजी ? अरे, ह्या तमालवृक्षाचें पान घेऊन त्यावर केसरकुसुमांतील रसानें चित्र काढ म्हणजे झालें. (असें म्हणून दोन्ही साधनें आणून देतो.)

कृष्ण—वाहवा ! गड्या, हें तूं मला खासें सुचविलेंस. (लेखनसामुग्री हातांत घेऊन राधेचें चित्र काढूं लागतो.) गड्या, हें काम करतांना माझा हात कांपतो आहे, तरी कशी तरी मी त्या सुंदरीची तसबीर काढतोंच. (चित्रलेखन कसें तरी पुरें करून त्याकडे अश्रुपूर्ण नयनांनीं पाहतो आणि ह्मणतो.)—

५. श्लोक (पृथ्वीछंद).

सुचित्र दयिते तुझें बघ कसें इथें रेखिलें ॥
हुबेहुबचि रूप हें स्वनयनीं जसें देखिलें ॥
परंतु वपुकांति गे अभिनवांगचेष्टां तशा ॥
सदृष्टिसुविलासें त्या मज कळे न दावूं कशा ॥ १ ॥

प्रियालाप—(कृष्णाचे डोळे भरून आलेले पाहून) मित्रा, तूं तिची तसबीर एवढ्या खटपटीनें कशी तरी काढलीस, मग आतां अश्रुजलानें उगीच ती नासून कां बरें टाकीत आहेत ? (त्याच्या हातांतून ती हिसकावून घेऊन आपल्या बगलेंत ठेवितो.)

कृष्ण—(सभोंवार पाहून) अरे ! सूर्यास्त होण्याची वेळ तर जवळ येऊन ठेपली; कारण या वेळीं—

१ शरीराचे सुंदर हावभाव. २ डोळ्यांच्या मोहक चाळ्यांसह.

६. श्लोक (शार्दूलविक्रीडित.)

आवासोत्सुक[1] पक्षि हे कलरवें[2] वृक्षालयीं धांवती ॥
कांताभाविवियोगभीति[3] धरुनी चक्राह्व[4] आक्रंदती ॥
आनंदें उडती उलूक[5], अलिही विश्रांति पद्मोदरीं- ॥
घेती; हा रवि रक्तवर्ण उतरे अस्ताचलीं सत्वरीं ॥ १ ॥

प्रियालाप–अहो राजश्री, तुम्हीच एक कविता करणारे, दुसरें कोणी नाहीं अशी शेखी मिरवूं नका. अस्मादिक त्या कामांत कांहीं कमी विद्वान् नाहींत. मीही पूर्वदिग्वधूंच्या[6] मंदिरांतून नुकत्याच बाहेर पडलेल्या त्या चैनी द्विजराजाचें[7] पहा कसें छान वर्णन करितों तें!

कृष्ण–(हांसून) कर बुवा तुझी इच्छा असेल तर. तुला नको कोण म्हणतें आहे.

प्रियालाप–ऐक तर मग. या वेळेस—

७. श्लोक (मालिनी.)

स्वकर पसरुनी जो अंधकारा निवारी ॥
स्त्रवुनि अमृतधारा ओलवी भूमि सारी ॥
कमलिनी अलिनींच्या[8] तोषवी मंजु गानें ॥
अरुणमुख[9] विधू हा शोभतो स्वोदयानें ॥ १ ॥

कृष्ण–(हांसून) वाहवा! वाहवा! खूप मजेदार वर्णन केलें-

---

१ वसती करण्याविषयीं उत्सुक. २ मधुर शब्दानें. ३ पुढें लवकरच होणाऱ्या कांतीच्या वियोगाची भीति. चक्रवाकपक्ष्यांचीं जोडपीं दिवसा एकत्र असून रात्र झाली म्हणजे वियुक्त होतात असें सांगतात. ४ चक्रवाकपक्षी. ५ घुबडें हीं दिवसा झाडांच्या फांद्यांवर आंधळ्यास उलटीं टांगून राहात असतात म्हणून त्यांस दिवाभीत असें नांव पडलें आहे. रात्र झाली म्हणजे तीं उडून जातात. ६ पूर्व दिशा हीच कोणी एक वधू ह्म० तरुण स्त्री. ७ चंद्राचें. ८ भ्रमरी. ९ तांबुस वर्ण.

स. चल आतां सगळ्या गाई एकट्या करून त्यांना गोठ्यांत नेऊन घालूं. (असें म्हणून दोघे निघून जातात.)

(तदनंतर नागरिका प्रवेश करिते.)

नागरिका--(राधेच्या तोंडाकडे पाहून सख्यांस म्हणते.) गडे चंपकलते, खरेंच सांग, या आपल्या प्रियसखीची वृत्ति आज इतकी चंचल झालेली कां बरें दिसते ?

चंपकलता--(मनांत) अग बाई ! या मैत्रिणीनें देखील हिच्या अंतःकरणाची स्थिति अगदीं बिनचूक ताडली. मोठी चतुर खरी. पण बाई हिला आतां काय बरें सांगावें ? बरें असें सांगून तर पाहूं. (नागरिकेला एकीकडे नेऊन मोठ्यानें,)

८ साक्या.

सहचरि जेव्हां बोलत बसती सुरतकेलिंच्या[1] गोष्टी ॥
हळूच देउनि कान सकल त्या ऐके ही बिंबोष्ठी[2] ॥
बाधा मदनाची ॥ व्यक्त करी ही साची ॥ १ ॥
बरोबरीच्या मिळूनि युवती परोपरींच्या लीला-॥
रंगीं होतां दंग विलोकी कुतूहलें[3] ही बाला ॥
बाधा मदनाची ॥ व्यक्त करी ही साची ॥ २ ॥

नागरिका--गडे चंपकलते, मला वाटतें, खरोखरच भगवान् कुसुमायुधानें हिच्या हृदयांत आपलें ठाणें बसविलें, आणि म्हणूनच द्वितीयेच्या चंद्रलेखेप्रमाणें ही कृश झाली आहे; तथापि हिच्या अंगचें लावण्य यत्किंचित्‌ही ढळलेलें दिसत नाहीं. गालांवर रोमांच उभे राहिल्यामुळें ते जरी कंटकित केतकीपत्राप्रमाणें पांढरे फटफटित झाले आहेत, तोंड जरी कोमेजलेल्या पांढऱ्या कमलाप्रमाणें निस्तेज दिसतें आहे, आणि अधरोष्ठ वारंवार स्फुरण पावत आहे, तरी पण या साऱ्या लक्षणांनीं हिचें स्वरूप विलक्षण सुंदर

---

१ विषयसुखाच्या. २ जिचे ओंठ पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें लाल आहेत ती. ३ कौतुकानें.

आणि अत्यंत मोहक दिसतें आहे. (राधेजवळ जाऊन मोठ्यानें) गडे राधे, तुझें मन आज कांहींसें खट्टू झालेलें पाहून माझ्या हृदयाचा बाई थरकांप होतो, तर गडे, खरेंच सांग, असें होण्याचें काय बरें कारण?

चंपकलता—अग नागरिके, ही किनई कामदेवाची पूजा करीत मदनोद्यानांत बसली होती, त्या वेळीं तेथें आश्चर्यकारक आणि अत्यंत सुंदर असा एक—(इतकेंच बोलून थांबते.)

राधा—(मनांत) खरोखरच ही आतां त्या मनोहर हृदयवल्लभाचें नांव घेते कीं काय नकळे. (तिला हळूच चिमटा घेऊन पुढें बोलूं नको म्हणून सुचविते.)

चंपकलता—नील तमाल[1] हिच्या दृष्टीस पडला, तेव्हांपासून हिचें बाई मन अगदीं ठिकाणीं नाहींसें झालें आहे.

राधा—(आनंदानें आपल्या मनांत) खासें झालें. हिणें आपल्या भाषणाची संपादणी कशी तरी करून शिताफीनें वेळ तर मारून नेली. खरेंच बाई ही मोठी चतुर आहे.

नागरिका—खरेंच का? असा कोणता तरी तो तमाल, ज्याला पाहून ही इतकी वेडी झाली? त्याचें कांहीं वर्णन करून मला सांगशील का?

चंपकलता—सांगतें ऐक—

९ साक्यां.

विकसित कमलाधिष्ठित[2] ज्यावरि भृंगसंघ[3] विलसे तो ॥

---

१ या वाक्यांत नीलतमालतरूच्या मिषानें चंपकलतेनें कृष्णाचें नांव मोठ्या खुबीनें सूचित केलें आहे हें मार्मिक वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल. पाद हा शब्द चरणवाचक असून तरुमूलवाचकही आहे. तसेंच सुमनें या शब्दाचा एक अर्थ फुलें व दुसरा अर्थ ज्यांचीं मनें निर्मल आहेत असे साधुसंत असा होतो. माला या शब्दाचा पुष्पपक्षीं हार व साधुसंतपक्षीं समुदाय असा अर्थ घ्यावा. २ फुललेल्या कमलांवर बसलेला. ३ भ्रमरांचा समुदाय.

अर्धोन्मीलितें [1] कुमुदांनींही [2] शोभमान बहु होतो ॥ १ ॥
यत्पादांतें सेवी विविधाद्भुत सुमनांची माला ॥
झाली ही त्या पाहुनि चकिता सुंदर नील तमाला ॥ २ ॥

राधा—(दुःखित होऊन मनांत ह्मणते.) हिला सुचविलें असूनही तमालाच्या मिषानें हिणें शेवटीं आपल्या मनांतील अभिप्राय तिला कळविलाच. आणखी ही नागरिका तरी कांहीं कमी का धूर्त आहे ! ही तर सुतानें स्वर्गास जाणारी. हिणें सगळें ताडलें असेलच.

नागरिका—(मनांत) हिची ही कामातुर अवस्था पाहून खरोखरच मला वाटतें कीं, ज्याची अंगकांति तमालाप्रमाणें श्यामवर्ण असून ज्याचें सुंदर व प्रफुल्लित मुखकमल हास्यामृतानें सदा भरलेलें आहे, नानाविध कुसुमांनीं गुंफलेली माळ पायांपर्यंत धारण केली असल्यामुळें कनकशृंखलेनें अलंकृत केलेल्या मदनरूप गजेंद्राप्रमाणें जो शोभायमान दिसतो, तसाच भ्रमरांच्या चलनवलनांनीं कंपायमान होणाऱ्या कोमल कमलदलांसारख्या चंचल नेत्रांच्या विलासांनीं अत्यंत मनोहर दिसणारा असा एकादा मदनाचा पुतळा इच्या दृष्टीस पडला असावा; अथवा या सर्व गुणांनीं संपन्न असा तो एक नंदकुमार श्रीकृष्ण आहे असें लोकांच्या तोंडून मीं ऐकिलें आहे, तोच तर कदाचित् येथें हिच्या पहाण्यांत आला नसेल ना ? काय असेल तें असो. (मोठ्यानें) गडे चंपकलते, कोणता तमाल तूं ह्मणतेस तो मला दाखविशील का ?

(चंपकलता हांसत हांसत राधेच्या तोंडाकडे पाहते.)

राधा—(विचार करून आपल्या मनांत) तो दुर्लभ पुरुष येथें जवळच कोठें तरी बसला असेल, आणि या चंपकलतेचा स्वभाव तर बाई मोठा थट्टेखोर आहे, तेव्हां कदाचित् ही त्याची आणि नागरिकेची गांठ घालून देण्यासही चुकणार नाहीं. (मग नागरिकेचा हात धरून म्हणते.) गडे नागरिके, माझ्यावांचून

१ अर्धवट फुललेलीं. २ कमलांनीं.

आईला बाई चैन पडावयाचें नाहीं. चल तर आपण आतां घरीं जाऊं. (असें म्हणून सख्यांसहवर्तमान निघून जाते.)

(तदनंतर घाईघाईनें विद्रुमलता प्रवेश करिते.)

विद्रुमलता–(इकडे तिकडे फिरून वर पहाते व कोणाशीं बोलल्यासारखें दाखवून) अग मृणालिके, आज बाई त्या राधिके-ची प्रकृति फारच बिघडली आहे. तिच्याकरितां पुष्करणींतून क-मलपत्रें आणण्यासाठीं प्रियसखी कदलिका गेली ती तुला भेटली का? (ऐकिल्यासारखें करून) काय म्हणतेस? कमलपत्रें घेऊन गे-ल्याला तिला पुष्कळ वेळ झाला? ठीक झालें. भगवती वृंदाबाईनें मलाही सांगितलें आहे कीं, ' वत्से विद्रुमलते, लवकर जा आणि गोकुलांतू-न श्रीकृष्णाच्या गाईंच्या पायांला लागलेले धुळीचे कण, तसेंच केशितीर्थांतलें पवित्र उदक आणि वाळा आदिकरून शीतोपचारा-चे थंड पदार्थ घेऊन ये. ' म्हणून मी आतां तिकडेसच जातें. तूंही पण कापूर आणि थंडगार उटीचें सामान घेऊन चालली आहेस हें ठीकच आहे. जा जा तर लवकर. ती बिचारी सुकुमार राधा कशी अगदीं तळमळ करीत पडली आहे. (असें म्हणून दोघी निघून जातात.)

(तदनंतर विरहानें व्याकुल झालेला कृष्ण प्रवेश करितो.)

कृष्ण–गड्या प्रियालापा,—

१०. श्लोक (शार्दूलविक्रीडित.)

त्या तीच्या स्मितयुक्त[1] वक्त्रकमला चंद्रद्युतीनिंदका[2] ॥
किंवा नेत्रयुगा कटाक्षचतुरा[3] भ्रूविभ्रमां मोदका[4] ॥
कीं स्निग्धेक्षण[5] तें करी स्वसखिच्या जें देखतां प्रेयसीं[6] ॥
हा हा! आठवुं कोणते गुण तिचे कामातुरीं मानसीं ॥ १ ॥

---

१ हास्ययुक्त. २ चंद्राच्या कांतीला तुच्छ मानणारें. ३ कटाक्ष फेंकण्यांत कुशल. हें नेत्रयुगानें विशेषण. ४ आनंदकारक. हें भ्रूविभ्रमांचें विशेषण. ५ प्रे-मयुक्त पहाण्याची ढब. ६ प्रियतमा.

आणखी तुला काय सांगूं ?

११. श्लोक (वसंततिलका.)

ती हेमचंपकनिभा[1] मृगशावनेत्रा[2] ॥
मागें पुढें चहुंकडे दिसते सुगात्रा[3] ॥
व्यापूनि ती सुतनु सर्व दिशांस राही ॥
सारीच तन्मय मला दिसते धरा ही ॥ १ ॥

प्रियालाप—मित्रा, मला मोठें आश्चर्य वाटतें. अरे, जिला पाहून तूं इतका वेडा होऊन गेला आहेस तिच्यासारखी साऱ्या चतुर्दश भुवनांत देव, गंधर्व, किन्नर अथवा नाग यांच्या कन्यकांमध्यें कोणीच नाहीं असें मी समजावें कीं काय ? काय तिचा एवढा मोठा बडेजाव मांडला आहेस कोण जाणे.

कृष्ण—गड्या, असेंच खरें. ती ब्रह्मदेवाच्या हातून खचित निर्माण झालेली नाहीं. तिचे अवयव खरोखरच अमृतांतून उत्पन्न झाले आहेत. ते इतर स्त्रियांच्या देहांप्रमाणें पंचमहाभूतांपासून खचित बनलेले नाहींत, कारण—

१२ आर्या.

अधरीं विलोकनींही, तैसें तद्भाषणींहि अमृत वसे ॥
कुचकुंभही अमृतमय, सत्य सुधेचीच सृष्टि ती विलसे ॥१॥

(मदनबाधा व्यक्त करून व दीर्घ आणि उष्ण सुस्कारा सोडून)

१३ आर्या.

अद्यापि मन्मथा रे, हरनयनानल[4] तवांगिं जळताहे ॥
नातरि तत्कणसम तव, शर दाहक होति केविं मजला हे ॥१॥

---

१ सोनचाफ्यासारखी. २ हरिणबालकाप्रमाणें जिचे डोळे पाणीदार आहेत अशी ३ जिचे अवयव सुंदर आहेत अशी. ४ शंकराच्या तिसऱ्या नयनांत अग्नि असून त्याच्या योगानें त्यानें मदनाला जाळिलें होतें अशी पुराणप्रसिद्ध कथा आहे. (कुमारसंभव सर्ग ३, श्लोक ७२ पहा).

प्रियालाप—प्रियमित्रा, धीर धर, धीर धर; असा घाबरून जाऊं नकोस. (हातांत वेताची छडी घेऊन तमालवृक्षाच्या मुळाशीं स्थापित केलेल्या कामदेवाला मारण्याकरितां रागानें पुढें सरसावतो, आणि म्हणतो,) रे नीचा कुसुमायुधा! तूंच माझ्या या प्रियमित्राच्या हृदयाचा इतका संताप करीत आहेस. सोस तर मग आतां हा माझ्या हातांतील छडीचा फरमाशी मार.

कृष्ण—(हांसून त्याचा हात मागें ओढून) बेटया, हें तूं काय मांडिलें आहेस ? कामदेवाची प्रतिमा करून ती येथें पुजली आहे. तो कांहीं खरोखरीचा कामदेव नव्हे. नीट डोळे उघडून पहा.

प्रियालाप—(मागें सरून) असें काय ? तर मग आतां बोलावयासच नको. चल तर आतां या मधुमालतीच्या मांडवांत घटकाभर बसून संतप्त झालेल्या आपल्या मनाला थंडगार कर.

कृष्ण—चल बुवा, तूं ह्मणतोस तसेंच कां होईना ? (उभयतां लतामंडपांत जाऊन बसतात.)

(इतक्यांत श्रीदामा घाईघाईनें तेथें येते.)

श्रीदामा—गड्या नंदकुमारा, आज दोनप्रहरीं गोवर्धन पर्वताच्या शिखरावर गाई चरत असतां खालच्या मैदानांत वासरांचा कळप त्यांच्या दृष्टीस पडला. मग काय विचारतोस ? साऱ्या गाई मोठयानें हंभा हंभा करीत एकसारख्या त्यांच्याकडे धांवत सुटल्या, त्या इतक्या झपाटयानें कीं, आमच्या गुराख्यांना त्यांना मागें फिरवितां फिरवितां पुरेवाट झाली. यासाठीं चल बाबा लवकर, आणि आपल्या मुरलीच्या सुस्वर नादानें तरी त्यांना आंवरून धर.

(कृष्ण लगबगीनें मुरली घेऊन जाण्यास तयार होतो.)

प्रियालाप—(पुढें पाहून कौतुकानें कृष्णाच्या कानांशीं लागतो.) प्रियमित्रा, अरे, भ्रमरांनीं चुंबिल्यामुळें कोमेजून गेलेलें हें नीलकमल पाहिलेंस का ? तुझ्या त्या प्रियकरेच्या कानावरून हें येथें पडलें असावें असें मला वाटतें. (कमल भुईवरून उचलून त्याच्या हातांत देतो.)

कृष्ण—(क्षणभर तें हृदयाशीं धरून व दुःखोच्छ्वास टाकून मनांत) मला वाटतें,—

१४ साक्या.

नीलोत्पल हें स्वस्थानस्थित पाहुन नयनांतानें[1] ॥
मत्सरभावें झुगारिलें जणुं वाटे अति वेगानें ॥
पाहुनि कुदशेतें ॥ दयार्द्र मन हें बहु होतें ॥ १ ॥
स्थानभ्रंशें[2] म्लान जाहलें, योग्यचि ती स्थिति होय ॥
कीं स्वपदाच्या प्राप्तीसाठीं, शुष्क करी निजकाय ॥
पाहुनि तप याचें ॥ मन हें अंतरिं बहु कांचे[3] ॥ २ ॥

(असें म्हणून सर्व निघून जातात.)

तिसरा अंक समाप्त.

---

१ नयनांत म्हणजे डोळ्याचा कानाच्या बाजूकडील कोंपरा. याचा विस्तार कानापर्यंत असणें हें एक स्त्रियांचें (पुरुषांचेंही) सौंदर्यलक्षण मानिलें आहे. प्रस्तुत प्रसंगीं कानाचा चांपा हें त्या कोंपऱ्याचें सीमास्थान असून त्या ठिकाणीं नीलोत्पल येऊन बसलें म्हणून मत्सरभावाची कल्पना केली आहे. २ आपलें ठिकाण नाहींसें झाल्यामुळें. ३ कचरतें, भितें.

अंक चवथा.

(तदनंतर खिन्नवदन होत्साती चंपककलता प्रवेश करिते.)

चंपककलता--ती माझी प्रियसखी तमालिका या वेळेस कोठें असेल बरें! (पुढें पाहून) बरें झालें बाई, देव पावला, ही पहा इकडेसच येत आहे.

(नंतर तमालिका प्रवेश करिते.)

तमालिका–(चंपकलतेच्या तोंडाकडे पाहून खिन्न मुद्रेनें) सखे—

१. साक्या.

सरसीरुहसम वदन तुझें गे पाहुनि हिरमुसलेलें ॥
विषादभारें मन हें माझें फारचि दडपुन गेलें ॥
प्रसंग सांग मला ॥ जो तुज हेतूसा गमला ॥ १ ॥
खरें जाणुनी कारण याचें समदुःखी व्हायास ॥
सिद्ध असें मी, झाले जरि गे जिवापाड आयास ॥
प्रसंग सांग मला ॥ जो तुज हेतूसा गमला ॥ २ ॥

चंपकलता–गडे, माझें मन या वेळेस गोंधळून गेलें आहे हें तूं बरोबर ताडलेंस खरें. सांगतें तर मग काय झालें तें. नीट लक्ष्य देऊन सारें ऐक.

तमालिका–चांगलें लक्ष्य देतें. बोल काय बोलतेस तें.

चंपकलता–अग, ज्याच्यावरून सहस्त्र मन्मथ ओंवाळून टाकावे असें ज्याचें स्वरूपवैभव तो नंदकुमार जेव्हां त्या प्रियसखी राधिकेच्या दृष्टीस पडला, तेव्हांपासून क्षुब्ध झालेल्या मदनाच्या झपाट्यांतच जणूं काय ती सांपडली आहे अशी दिसते. बिचा-

रीच्या जिवाला सुख म्हणून कशानेंच वाटत नाहीं. मन कोठेंच रमत नाहीं. मी पुष्कळ विनवण्या करकरून दमलें, पण ती कांहींच थांग लागूं देत नाहीं. वेणीफणी करणें, आंग धुणें, जेवणें, खाणें हीं नित्याचीं कामें देखील बाई तिला आवडतनाशीं झालीं आहेत. तुझ्याही ध्यानांत या गोष्टी आल्या असतीलच, नाहींत असें नाहीं.

तमालिका–(मनांत) हे सारे प्रकार माझ्याही लक्ष्यांत येऊन चुकले आहेत खरे; पण काय करायचें ? माझ्या हृदयांत देखील ते कांट्याप्रमाणें सलत आहेत. (उघडपणें.) बरें मग पुढें काय म्हणतेस ?

चंपकलता–विशेषेंकरून काल रात्रीं तर बाई तिची अवस्था फारच कठिण दिसली. साऱ्या रात्रींत तिचा डोळा म्हणून एक क्षणभर देखील कसा तो लागला नाहीं. मधून मधून दचके आणि डोळे अर्धवट मिटून कांहीं भलभलतेंच बडबडत सुटे.

तमालिका–(घाबरून) काय, काय बरें तें मला ऐकूं दे तर खरें.

चंपकलता–ऐक सांगतें. काय ती बडबडे तें—

२. साक्या.

कांहिं नसे जरि कार्य[1] मला त्या कमलोत्तंसांशीं[2] गे ॥
रडतां पाहुनि मज गरिबाच्या उगीच पाठिस लागे ॥
जैसा वर काळा ॥ तसाच अंतरिंही काळा[3] ॥ १ ॥
धूर्त खरा तो निजकरकमला मच्छिरिं ठेवुनि हंसतो ॥
मुकुटाग्रानें स्पर्शुनि पादां कृतार्थ झालों म्हणतो ॥
जैसा वर काळा ॥ तसाच अंतरिंहो काळा ॥ २ ॥

तमालिका–(आश्चर्यानें आपल्या मनांत) यावरून तिचा

---

१ कर्तव्य, करावयाची गोष्ट. २ कमल आहे उतंस म्हणजे भूषण ज्याचें तो श्रीहरि. ३ कपटी.

प्रेमावेश सगळ्या लोकांच्या पहाण्यांत येऊन चुकला असावा यांत संशय नाहीं, (उघडपणें) बरें मग पुढें काय झालें ?

चंपकलता—मग तिच्या आईनें मला विचारलें, ' अग चंपकलते, ही अशी बडबडते व नाहीं नाहीं ते चाळे करिते याचें कारण तुला तरी बाई कांहीं ठाऊक आहे का ! '

तमालिका—मग तूं काय सांगितलेंस ?

चंपकलता—अग वेडे, सांगू काय कपाळ, तुझें कीं माझें. कृष्णाच्या विरहानें तिची तशी अवस्था झाली आहे हें मला पक्कें ठाऊक आहे; पण बाई माझ्याच्यानें तिला तसें स्पष्ट सांगवेना. मग मीं तिला इतकेंच सांगितलें कीं,—

तमालिका—(तिचें भाषण पुरतें न ऐकतां) शाबास ! मोठी बाई सावध तूं. काय बरें सांगितलेंस ?

चंपकलता—ऐक काय तें. मी म्हणाल्यें—

३. श्लोक (शार्दूलविक्रीडित.)

गेली ही यमुनातटीं दिनमुखीं[1] स्नानार्थ जैं सुंदरी ॥
तैं तेथें निजचित्तहारक असें पाहूनि कांहीं तरी ॥
तेंव्हांपासुनि ही सबाधहृदया[2] झाली असे बापुडी ॥
वाटे दैविक[3] टाळणें मज बरें वाहूनि नाडापुडी[4] ॥ १ ॥

तमालिका—(हांसून व आनंदित होऊन)—

४. साकी.

कोण दुजी तुजवांचुनि दावी बुद्धिसंपदा ऐशी ॥
कीं जी दैविक उपाय करण्या मातेला उपदेशी ॥
ही तव चतुराई ॥ पाहुनि वाटे नवलाई ॥ १ ॥

---

१ सूर्योदयीं. २ जिच्या हृदयाला कांहीं बाधा झाली आहे अशी. ३ बाहेरची बाधा. ४ अंगारे, धुपारे इत्यादि उपचार.

बरें मग यावर ती काय म्हणाली ?

चंपकलता—ती म्हणाली, ' ही माझी लाडकी ज्या अर्थी मला जिवापेक्षांही अधिक प्रिय आहे त्या अर्थी जेणेंकरून ही आपल्या मूळच्या स्थितीवर येईल असा कांहीं तरी उपाय कर. '

तमालिका—गडे, तूं तसें सांगितलेंस हें फार चांगलें झालें. तर आतां तिला लवकर आईकडे घेऊन जाऊं चल.

(असें म्हणून दोघी निघून जातात.)

(नंतर दोघीजणी राधेकडे जाऊन व तिची ती मदनाकुल स्थिति पाहून विस्मयसूचक दृष्टीनें एकमेकींकडे पहातात. कांहीं वेळ तिच्याजवळ बसून एकसारखे चाललेले तिचे चाळे पाहिल्या-नंतर तमालिका चंपकलतेला म्हणते.)

तमालिका—अग, पाहिलीस का इची काय अवस्था झाली आहे ती ?

५. श्लोक (शार्दूलविक्रीडित.)

ईर्ष्येनें बघते नभीं जलधरा सौदामिनी संगता ॥
केकारांवहि ऐकुनी तनु इची होते सुरोमांचिता ॥
कांपे कोमल चंपकोपम वपु स्वेदार्द्रही होतसे ॥
वाटे मन्मथकोटिसुंदरतनु श्रीकृष्ण ही ध्यातसे ॥ १ ॥

चंपकलता—(अगोदर तिच्या तोंडाला व मग नाकाच्या शेंड्याला आपल्या बोटानें स्पर्श करून, साभिप्राय) गडे राधे—

६. श्लोक (स्रग्धरा.)

उष्णोच्छ्वासें तुझ्या गे उघडचि कळते गाढ संतापपीडा ॥
नेणोनी कारणातें चुकुरचि बसतों आम्हि चिंताविमूढा ॥

---

१ मयूरवाणी. २ चाफ्याच्या नाजुक फुलाप्रमाणें. ३ घामानें भिजलेली. ४ कोटि मन्मथांप्रमाणें सुंदर आहे शरीर ज्याचें तो. ५ चिंतेनें भांबावून गेलेल्या.

जैशी बाह्यातपानें विकसित नलिनी शुष्क होऊनि जाते ॥
तैशी पुष्पाहुनीही मृदुल तनु तुझी कां वये म्लान होते ? ॥

(राधा कांहीं न बोलतां असह्य अशा अंतस्थ कामवेदनांनीं विव्हल होऊन मूर्च्छित पडते.)

सख्या–(दयार्द्र अंतःकरणानें) गडे राधे, असें काय बरें करतेस ! डोळे तरी उघड. अशी मुखस्तंभ होऊन कां पडली आहेस ! आमच्याशीं बोलत कां नाहींस ? (याप्रमाणें वारंवार धीर देत ताडपत्रानें वारा घालून व दुसरे कांहीं शीतोपचार करून तिला कशी तरी शुद्धीवर आणितात.)

चंपकलता–(साभिप्राय) अग, कशी तरी बाई ऊठ एकदांची. तुझी ही संतापपीडा नाहींशी करण्याला त्या लताकुंजाशिवाय दुसरा उपायच नाहीं हें मी पक्कें जाणून आहें. चल तर ऊठ. चालूं लाग लवकर.

(नंतर चंपकलतेनें बळेंच हातांत धरलेली व तिच्याच खांद्यावर मान टाकून मोठ्या कष्टानें पावलें टाकीत असलेली राधा सख्यांसहवर्तमान प्रवेश करिते.)

राधा–(दुःखोच्छ्वास टाकून) अग आई, माझ्या पोटांत एकाएकीं कशानें बाई एवढी मोठी कळ निघाली ही ! मला नाहीं ही सोसवत.

सख्या–(दुःखित मनानें) अग लाजरे, तुझ्या या हृदयवेदनेचें कारण आह्मांला कांहीं समजत नाहीं. तें तुझें तुला ठाऊक. कदाचित् तो नंदकुमार तुझ्या दृष्टीस पडला, यामुळें तर असें होत नसेल ना ?

राधा–(तें नांव ऐकतांच मूर्च्छित होते, व सख्यांनीं वारा घातल्यानंतर व जलसेचनादि दुसरे शीतोपचार केल्यानंतर कांहींशी

१ बाहेरच्या उन्हानें. २ कमलांची वेल. ३ पाणी शिंपडणें.

शुद्धीवर येऊन बावचळल्याच्यागत होऊन म्हणते.) अग सख्यांनो, मी आहें कुठें आणि करितें आहें तरी काय? कांहींच बाई मला समजत नाहीं.

७. श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

जागी कीं, निजल्यें, निशासमय हा, किंवा असे वासर[1] ॥
मोहस्था[2] मजला मुळींच नकळे यांतील गे अंतर ॥
यन्नामश्रवणें[3] मम स्थिति अशी झाली, दुरापा[4] तया- ॥
वांछी हें मन फार फार सकल व्यापार टाकूनियां ॥ १ ॥

बरें, जरा डोळा लागला तर त्या वेळीं देखील किती तरी मेली माझी विटंबना होत असते म्हणून सांगूं—

८. साक्या.

स्वप्नामध्यें मम शय्येवर नित्य धूर्त तो येतो ॥
मम वदनावर निजमुख टेंकुनि थापा किति तरि देतो ॥
पाहुनि चेष्टा या ॥ होते संतप्तचि काया ॥ १ ॥
अलित्याचा मग पादतलांना लावी स्वकरें रंग ॥
शिरीषकुसुमाहि खोंची कर्णीं हळूच तो श्रीरंग[5] ॥
पाहुनि चेष्टा या ॥ होते संतप्तचि काया ॥ २ ॥

(साऱ्या मैत्रिणी आश्चर्यानें एकमेकींकडे पाहतात.)

चंपकलता–(तमालिकेला एकीकडे नेऊन) गडे तमालिके, मदनबाधेनें ही फारच व्यथित झाली आहेशी दिसते. आतां इची उपेक्षा करणें चांगलें नव्हे. केली तर मोठा अनर्थ होईल. मला वाटतें इच्या हातून प्रेमव्यंजक[6] असा एक कामलेख लवकर तयार करवावा. तुला कसें काय वाटतें?

---

१ दिवस. २ बुद्धिभ्रंश झालेल्या. ३ ज्याचें नांव ऐकून. ४ दुर्लभ. ५ श्रीकृष्ण. ६ प्रेम दाखविणारा.

तमालिका—या वेळेस तूं मसलत सांगितलीस ती फारच चांगली आहे. मलाही बाई तसेंच वाटतें.

चंपकलता—(राधेला म्हणते.) अग राधे, हा त्या कृष्णाविषयींचा तुझा अभिलाष खरोखरच वाखाणण्यासारखा आहे. आणि खरेंच तुझ्यासारख्या त्रिभुवनसुंदरीच्या मनाचा ओढा त्या लोकाभिराम नंदनंदनाला टाकून दुसऱ्या कोणाकडे लागणार ! म्हणून म्हणतें, उगीच आतां कष्टी होऊन बसूं नको. तुझ्या मनोव्यथेचें कारण आम्हाला समजलें हें बरें झालें. आतां तुझ्या या चिंताज्वराचा उपशम होण्याचा आम्ही उपाय शोधून काढतों. तूं स्वस्थ रहा, कांहीं काळजी करूं नको.

(साऱ्या जणी चालूं लागतात, व पुष्पवाटिकेंतील एका बकुलवृक्षाच्या शीतल छायेंत जाऊन बसतात.)

चंपकलता—(पदरानें राधेला हळू हळू वारा घालते व तिच्या गळ्यांतील मुक्ताहारांतला मध्यमणि बोटांनीं वर उचलून धरून म्हणते.) अग तमालिके, अशा स्थितींत या वेळीं या कृशांगीला या हाराचा भार देखील बाई सोसेनासा झाला आहे, म्हणून मी हा आपल्या पदरांत बांधून ठेवितें.

तमालिका—खरेंच बाई, तूं म्हणतेस तसेंच कर.

चंपकलता—(पदरामध्यें हार बांधून ठेविते आणि कामलेख लिहिण्याकरितां एक भूर्जपत्र[1] राधेच्या हातांत देऊन तिला म्हणते.) प्रियसखे राधे, प्रेमभरित असून ज्यांत शब्दलालित्य[2] चांगलें आहे असा कांहीं खुबीदार कामलेख मनांत अल्पून तुझ्या प्रियतमाकडे पाठविण्याकरितां तो या पत्रावर लिहून दे.

राधा—(क्षणभर विचार करून घामाघूम होत्साती धातुरसानें लेख लिहिते.)—

---

१ भूर्जनामक वृक्ष. याच्या पानावर लिहितां येतें. २ शब्दांचा मधुरपणा.

९. आर्या.

अवलोकिलें तुझें मुख, त्रिभुवनसुंदर तसेंच सुकुमार ॥
तेव्हांपासुनि मन्मथ, निजबाणीं पीडितो मला फार ॥ १॥

दोघी सख्या—(तो लेख लक्ष्यपूर्वक वाचून विस्मयानें) वाहवा ! किती तरी बाई हिचें चातुर्य हें !

चंपकलता—(आश्चर्य पावून म्हणते.)—

१०. श्लोक (शार्दूलविक्रीडित.)

बाल्यापासुनि मैत्रिणींसह गृहक्रीडासुखीं रंगली ॥
खेळे प्रत्यहिं बाहुल्या घरकुलें तैशीच भातूकली ॥
वात्सल्यें[1] प्रियतात घेउन जिला मांडीवरी खेळवी ॥
ती लेखें चतुरस्त्रियांमधिं पहा श्रेष्ठत्व कीं मेळवी ॥ १ ॥

तमालिका—गडे चंपकलते, तो नंदकुमार श्रीकृष्ण या वेळेस कोठें असेल हें तुला ठाऊक आहे का ?

चंपकलता—खरेंच बाई, कोठें असेल कोण जाणे. मला नाहीं ठाऊक.

(तदनंतर कृष्ण आणि प्रियालाप प्रवेश करितात.)

प्रियालाप—प्रियमित्रा, अरे, येथें जवळच कोठें कुमारिका बोलत आहेत असें मला वाटतें, तर मग या मधुमालतीच्या मांडवाखालीं बसून त्या काय बोलतात तें ऐकेनास ?

(कृष्ण लतामंडपांत उभा राहून ओंठांशीं मुरली धरून तिचे सूर काढितो, ते ऐकून साऱ्या जणी चपापतात.)

राधा—(त्या सुस्वर नादब्रह्मांत तल्लीन होऊन देहभान विसरते व बऱ्याच वेळानें सावध होऊन मोठ्यानें सुस्कारा टाकून म्हणते.) अरे देवा ! हा सुस्वर नाद कामदेवाचा साक्षात् मोहनरूप

---

१ पितृप्रेमानें.

मंत्रच होय. कोण काय बरें हें वाजवीत आहे? या नादानें तर मी बाई अगदीं मोहित होऊन माझें देहभानही नष्ट झालें!

चंपकलता—(खोंचून बोलते) अग राधे, हा किनई त्या तमालनील श्रीकृष्णाच्या मुरलीचा नाद बरें का. हा ऐकून तरी तुझ्या कानांना कांहीं सुख होतें का?

राधा—(मनांत) काय? ज्याणें माझें हृदय चोरून नेलें त्या चोराच्याच मुरलीचा हा नाद! (दीर्घ आणि उष्ण निःश्वास सोडून मोठ्यानें) प्रिये चंपकलते, तूं खोंचून बोलतेस तर खुशाल बोल; पण तसाच या नादाचा प्रभाव आहे खरा, कसा म्हणशील तर—

११. दिंडी.

संगतीनें अमृतसा गोड लागे ॥
वियोगानें विषतुल्य हा मला गे ॥
जीविता वा मरणास हाच हेतू ॥
असे माझ्या, प्रियसखे जाण हें तूं ॥ १ ॥

(सख्यांचे डोळे भरून येऊन त्या तिचें शांतवन करितात.)

चंपकलता—गडे तमालिके, ज्या अर्थीं हे हरिणांचे कळप आणि पक्ष्यांचे थवे आपलें खाणेंपिणें सर्व कांहीं टाकून अमृतापेक्षांही अधिक गोड असा हा मुरलीरव ऐकण्यासाठीं एकसारखे कान देऊन या माधवीलतामंडपाकडे पहात राहिले आहेत, त्या अर्थीं तो मुरलीधर श्रीकृष्ण त्याच ठिकाणीं असावा असें मला खचित वाटतें. तर मग आतां विलंब न लावितां हा कामलेख त्याच्या हातीं पडेल अशी तजवीज करावी हें बरें. (कामलेख हातांत धरून बावरल्याच्यापरी चोहोंकडे पाहते व हळूच वेलींच्या एका फटींतून तो कृष्णाकडे झुगारून मागें फिरते.)

प्रियालाप--(तो लेख पाहून वर उचलतो आणि कौतुकानें कृष्णाला दाखवून म्हणतो.) प्रियमित्रा, हें पाहिलेंस का काय आहे तें ?

कृष्ण—(त्याच्या हातांतून तो लेख झटकन् हिसकावून घेऊन वाचतो, आणि दुःखोच्छ्वास टाकून म्हणतो.) गड्या प्रियालापा, त्या कामविव्हल झालेल्या माझ्या प्राणवल्लभेनेंच हा कामलेख पाठविला आहे यांत संशय नाहीं.

प्रियालाप--(मोठ्या नम्रतेनें) मित्रा, त्यांत काय लिहिलें आहे तें मला वाचून दाखवशील का !

कृष्ण--गड्या, काय रे करूं ? प्रियेची दुःखावस्था व्यक्त करणारी ही पत्रिका पुनः वाचण्याविषयीं माझें मन घेत नाहीं; तथापि तूं म्हणतोसच म्हणून कशी तरी वाचून दाखवितों. लक्ष्य लावून ऐक.

प्रियालाप–मित्रा, वाचच ती एकदां. कर माझ्यावर एवढी कृपा.

कृष्ण–(मोठ्या कष्टानें वाचूं लागतो, ती अशी–)

१२. आर्या (पूर्वोक्त.)

अवलोकिलें तुझें मुख, त्रिभुवनसुंदर तसेंच सुकुमार ॥
तेंव्हांपासुनि मन्मथ, निजबाणीं पीडितो मला फार ॥ १ ॥

प्रियालाप–(मनांत) अरेरे ! त्या बिचारीची निर्दय मदनानें तर फारच बुवा गाळण करून सोडिली. (मोठ्यानें) मित्रा, अरे मीं तुला पूर्वीं सांगितलें होतें कीं, कामदेवच तुझा साह्यकारी होईल व तो तुझें काम फत्ते करीलच करील. आणखी असेंही पण मी भाकीत सांगून ठेविलें होतें कीं, तिच्या मैत्रिणीच तिच्या दुःखाचा प्रतिकार करण्याचा कांहीं तरी उपाय योजतील. आहे का त्याची आठवण ?

कृष्ण–(हांसत हांसत तो कामलेख प्रथम डोळ्यांपुढें व नंतर हृदयाशीं घट्ट धरून क्षणभर तिच्या स्पर्शजन्य सुखाचाच जणूं काय अनुभव घेत आहे असें दाखवितो, आणि मग मोठ्यानें सुस्कारा टाकून म्हणतो.)

१३. श्लोक (शार्दूलविक्रीडित.)

आलेख स्वकराक्षरीं सुललितीं जो पाठवी सुंदरी ॥
तो तत्संगमकांक्षि या मम मना आनंद देतो जरी ॥
कामें पीडित मी तथापि, धरितों चित्तीं जरी धीरता ॥
होतों व्याकुल फार जाणुनि तिला दुःखैकपात्रीकृता॥१॥

यासाठीं आतां मुरली वाजवीत बसून त्रस्त झालेल्या मनाला घटकाभर करमणूक करावी हेंच बरें. (मुरली वाजवितो.)

राधा–(तो मुरलीरव ऐकून आपल्या मनांत) अग बाई! माझें मन मोहित करण्याविषयींचा कामदेवाचा वशीकरणमंत्र पुनः तो म्हणूं लागला! आतां बरीक माझी धडगत दिसत नाहीं. (असें म्हणून डोळे झांकते व दुःसह मदनज्वरानें संतप्त होत्साती मूर्च्छित पडते.)

चंपकलता–(मोठ्या गडबडीनें उठून समयोचित निरनिराळे उपाय करण्याकरितां अडखळत अडखळत बोलून मैत्रिणींना सांगते.) अग तमालिके, ऊठ बसलीस काय, तमालपत्रानें या प्रियसखीला वारा घाल. मृणालिके, पहातेस काय, धांव लवकर, आणि कमलिनीचीं कोंवळीं कोंवळीं पानें व देंठ आणून ते इच्या वक्षस्थळावर पसर. आणि विद्रुमलते, तूं किनइ बाई, चंदन व कापूर मिसळलेलें थंडगार पाणी इच्या अंगावर शिंपड. आणि कदलिके, तूं असें कर, केळीचीं पानें घेऊन ये, आणि त्यांवर कमलें आणि

१ कामपत्रिका. २ सुंदर. हें स्वकराक्षरांचें विशेषण. ३ तिच्या समागमाची इच्छा करणारें. हें मनाचें विशेषण. ४ केवळ दुःखाला पात्र झालेली.

पळसाचीं मऊ मऊ फुलें पसरून इला निजविण्याकरितां शय्या तयार कर. जा लवकर कशी.

प्रियालाप–(कानोसा घेऊन) अहो राजश्री, तुमच्या या मुरलीच्या रडगाण्याला येथें कोण विचारतें आहे? असल्या अरण्यरुदितानें काय व्हावयाचें आहे? त्या पुष्पवाटिकेकडून कोणी सुंदर मुलींचा करूणस्वर ऐकूं येत आहे तिकडे जाऊं चल.

कृष्ण–चल, तूं म्हणतोस तसेंच कां होईना? (असें म्हणून घाईघाईनें पुष्पवाटिकेंत जातो आणि तेथील एका बकुळीच्या झाडाआड उभा राहून ऐकतो.)

राधा–(डोळे उघडून) काय बाई, या सख्यांना म्हणावें तरी काय? मला असेंच होतें, तसेंच होतें, ही असेंच करते, तसेंच करिते, अशा नाहीं नाहीं त्या माझ्या उखाळ्यापाखाळ्या काढून मला बरें वाटण्याकरितां उगीच मेल्या आपल्या जिवाचा आटापिटा करीत आहेत. मला होतें आहे काय? कांहीं नाहीं. पण बाई, या वेळेस मी पुष्पशय्येवर निजलेली असून असें काय बरें मला होऊं लागलें!—

१४. साक्या.

खदिरंगारीं[1] शय्या रचिली वाटे मम चित्ताला ॥
चंदनचर्चेन[2] चंद्रकांतिही[3] पोळितसे शरिराला ॥
आतां काय करूं ॥ कैसा ताप निवारूं ॥ १ ॥
मोहजतिमिरें[4] दृग्पथ[5] माझा कोंदाटुन बहु जातो ॥
विकारबाहुल्यें[6] मज मन्मथ पीडा फारचि देतो ॥
आतां काय करूं ॥ कैसा ताप निवारूं ॥ २ ॥

(असें म्हणून पुनः मूर्च्छित होते.)

---

१ खैराच्या निखाऱ्यांनीं. २ चंदनाची उटी. ३ चांदणें. ४ मूर्च्छेपासून उत्पन्न झालेलें तिमिर म्ह० अंधार. ५ पहाण्याचा मार्ग. ६ नानाप्रकारच्या विकारांनीं.

कृष्ण—(मनांत म्हणतो.)—

१५. दिंडी.

मनोजन्मा[1] जाळितो तुझा काय ॥
नसे संशय यांत गे तिळप्राय ॥
धरुनि बसशी मम हृदयमंदिरा गे ॥
म्हणुनि देतो ताप तो तुला रागें ॥ १ ॥

चंपकलता—(दुःखातिशयानें) अरे देवा! काय हिची दशा झाली ही! कांहींसा श्वास चालला आहे एवढ्यावरूनच काय-ती ही जिवंत आहे असें वाटतें. (डोळे भरून येऊन तमालिकेला म्हणते.) अग तमालिके, खरेंच बाई त्या नंदकुमारावर हिचें अत्यंत प्रेम जडलें आहे. त्याच्यासाठीं ही प्राण सोडील कीं काय न कळे. पण तो दुर्लभ पुरुष हिला प्राप्त व्हावा तरी कसा! हिला शुद्धीवर आणण्याला आतां कोणता बाई उपाय करावा!

तमालिका—मला खचित वाटतें, या प्रियसखीविषयीं त्याच्या देखील हृदयांत प्रेम उत्पन्न होऊन तोही इच्यासाठीं वेडा होऊन गेला असेल.

चंपकलता—अग, याविषयीं तर संशयच नको. इला पाहिल्यापासून तो देखील दुःसह कामवेदनांनीं व्याकुल झाला आहे, आणि सगळे कामधंदे व आवडीचे खेळ सोडून देऊन या प्रिय-सखीच्या तसबिरीकडे पहात आपल्या मनाला करमणूक करीत सारा वेळ बसत असतो अशी लोकवार्ता माझ्या कानावर आली आहे.

कृष्ण–(मनांत) खरेंच बुवा. अशी माझी अवस्था झाली आहे तर खरी.

तमालिका—(हर्षातिशयानें टाळ्या वाजवीत) खरेंच का!

---

१ मदन.

असें असेल तर वरीक आतां आपल्याला कांहीं काळजी करायाला नको. या हृद्रोगांतून आम्ही वांचलों खऱ्या. त्या कामदेवाचीच ही कृपा म्हणावयाची. अथवा या प्रियसखीच्या रूप, लावण्य, यौवन, इत्यादि गुणांनींच हा आम्हांवर मोठा उपकार केला यांत संशय नाहीं. गडे चंपकलते, आपण आतां असें करूं. त्या दुर्लभ पुरुषाशीं इचा समागम होई तोंपर्यंत इच्या प्राणरक्षणासाठीं त्याचें चित्र काढून आपण हिला देऊं, म्हणजे त्याकडे पाहून तरी हिच्या जिवाला कांहीं बरें वाटेल.

चंपकलता—खरेंच बाई, तूं म्हणतेस हाच उपाय चांगला.

(तमालिका चित्र काढण्याचीं साधनें घेऊन येते व लागलीच कृष्णाची तसबीर काढून तयार करिते.)

चंपकलता—(ती पाहून आनंदानें) गडे तमालिके, खरेंच बाई, चित्रें काढण्याच्या कामांत तूं मोठी कुशल आहेस. आतां ही तसबीर प्रियसखीला नेऊन दाखव आणि तिची मुखचर्या कशी काय पालटते ती लक्ष्य लावून पहा.

तमालिका—(राधा डोळे झांकून पडली होती तेथें जाऊन तिच्यापुढें ती तसबीर धरिते व तिला धीर येण्यासाठीं आपल्या नाजुक हातानें तिला हालवून म्हणते.) गडे राधे, असें काय बरें करितेस ? हा पहा तुला मनापासून आवडणारा तुझा प्रियतम येथें उभा आहे, त्याच्याकडे पाहून विरहानें व्याकुल झालेल्या आपल्या मनाला अगोदर करमणूक तर करून घे.

राधा—(मोठ्या कष्टानें डोळे उघडते व घामाघूम होत्साती दीर्घोच्छ्वास सोडून म्हणते.)

१६. श्लोक (पृथ्वीछंद.)

अनेकविधसुंदरीहृदयमंदिरीं जो करी॰ ॥
निवेश, मजला गमे अति दुराप तो श्रीहरी॥

पटस्थ अथवा दुज्या जनुरुपें विलोकीन मी॥
तयास, मन हें बुडे प्रियसखे निराशातमीं॥ १॥

कृष्ण–(हे निराशेचे उद्गार ऐकून)—

१७. साकी.

शरीर माझें तवावलंबी तसेंच जीवित हें गे॥
मत्संबंधें निराश चित्तीं होउं नको तूं सुभगे॥
पाहुनि दुःख तुझें॥ काय करूं मज नुमजे॥ १॥

प्रियालाप–(प्रणयकोपानें) मित्रा, कसें करूं, काय करूं हा अष्टाक्षर मंत्र जपत बसल्यानें काय होणार आहे? अरे, किती तरी दगडासारखें कठिण हें तुझें हृदय! पुरे कर हें रडगाणें आणि हो पुढें. आतां उशीर कां करतोस? कोठवर त्या बिचारीचा अंत पहावयाचा? (असें म्हणून आरक्त कमलाप्रमाणें त्याचा नाजुक हात आपल्या हातांत धरून त्याला ओढतो.)

(कृष्ण हांसत हांसत राधेजवळ जाऊन उभा राहतो. त्याच्याकडे पाहून साऱ्या मैत्रिणी हर्षानें विस्मित होतात.)

प्रियालाप–अग चंपकलते, तुला एकवार ताकीद केली असून तूं पुनः या वाटिकेंतील फुलें चोरून आणिलींस वाटतें?

चंपकलता–(कांहीं उत्तर न देतां आपल्या पदरांत बांधून ठेविलेल्या मौक्तिकहारांतील नीलमणि तोडून काढून तो प्रियालापाच्या धोतरांत त्याला न कळतां हळूच टाकून देते आणि कृष्णाला म्हणते.) आर्या, या आमच्या प्रियसखीच्या हारांतून तुटून पडलेला नीलमणि कोठें सांपडत नाहीं. तो या तुझ्या मित्राच्या हातीं खचित लागला आहे, यासाठीं याच्या वस्त्रांचा मला अगोदर झाडा घेउं दे.

कृष्ण–(हांसून) गड्या प्रियालापा, ती म्हणते आहे तर

---

१ चित्रपटावर. २ जन्म. ३ निराशारूप अंधकारांत.

देईनास कां परता झाडा! ज्याला कर नाहीं त्याला डर तरी कशाला पाहिजे?

(प्रियालाप झाडा देऊं लागतो तों विद्युल्लतेप्रमाणें चमकणारा मणि त्याच्या धोतरांतून सटकन् भुईवर पडतो. तो पाहून साऱ्याजणी खदखदां हांसून टाळ्या पिटतात. प्रियालाप मनांत खजिल होऊन असें कसें झालें म्हणून अचंबा करितो.)

तमालिका–(कृष्णाला म्हणते.) आर्या, या तुझ्या मित्राला एवढें वाईट वाटायला नको. हा मणि या आमच्या थट्टेखोर चंपकलतेनें विनोदानें त्याच्या धोतरांत लपवून ठेविला होता. तो बिचारा कशाला चोरील?

प्रियालाप–(क्रोधानें लाल होऊन) लवांडिचे चंपकलते, कांहीं चिंता नाहीं. पाहून घेईन तुला. या तुझ्या कर्माचें फळ तुला लवकरच मिळेल, समजलीस?

चंपकलता–(हांसून व कांहींशी लज्जित होऊन मणि उचलून घेते, व खालीं मान घालून बसलेल्या राधेजवळ भीत भीत जाऊन तिच्या मनाला लागेल असें खोचून बोलते.)—

१८. श्लोक. (स्रग्धरा.)

ज्याच्यासाठीं तुझी ही कुसुमसम तनू पोळते निर्विकारे[1] ॥
टाकोनी रासलीला विषयरसाहि ते मानिशी रोग सारे ॥
लावण्यें जो त्रिलोकीं निरुपम न कधीं प्राप्त झाला कुणाला॥
दैवें तो लाभला गे प्रियतम तुजला भाळुनी रत्नगुणांला ॥१॥

(राधा रागानें तिच्याकडे पहाते.)

चंपकलता–अग, अशी रागावतेस कां. एवढें तरी आतां कर.

१ विकाररहित. हें राधेचें संबोधन.

१९. श्लोक. (मंदाक्रांता.)

सांभाळीं या निरुपम[1] मण्या[2] नीलरूपा सुजाता[3] ॥
शून्याकारीं[4] हृदयिं धरुनी रंजवीं गे स्वचित्ता ॥
क्रीडोत्साहा करिं सुनयने त्यागुनी मूकतेला[5] ॥
होवो आम्हां नयनसुख गे पाहुनी त्वत्सुखाला ॥ १ ॥

(असें म्हणून तो नीलमणि तिच्यापुढें करिते.)

राधा—अग वाचाळे, कुणाला उद्देशून तूं हें बोलत आहेस तें मला समजलें बरें का. उगीच शहाणपणाचा टेंभा मिरवूं नको. मोठी आली मेली मला उपदेश करायला! (कृष्णाकडे उत्कंठेनें निरखून पाहते, व लागलेंच लज्जेनें तोंड खालीं करून मनांत म्हणते.) अरे दुर्बळा हृदया, तुझा संशय फिटण्याजोगा अजून देखील कांहीं प्रत्यय येत नाहीं; तथापि—

२०. साकी.

समाधि लावुनि नित्य चिंतिती मनांत ज्या पुरुषाला ॥
दुर्लभ असुनी या क्षणिं तुजला प्रत्यक्षहि तो झाला ॥
त्याचें मन वळलें ॥ दैवचि हें तव फळफळलें ॥ १ ॥

तर मग आतां असें कां बरें करीत नाहींस ?

२१. साकी.

विलासपटु[6] हा सुदैवयोगें स्वयेंच करगत[7] झाला ॥
टाकुनि लज्जा धैर्यानें मग कां न लगटसी त्याला ? ॥
त्याचें मन वळलें ॥ दैवचि हें तव फळफळलें ॥ २ ॥

१, २, ३, हे तीन शब्द योजण्यांत चमत्कृतीनें मोठें चातुर्य दाखविलें आहे हें कारण कृष्णाकडे व हारांतील नीलमण्याकडेही लागू पडतें हें मार्मिक वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल. सुजात म्हणजे कृष्णपक्षीं उत्तम वंशांत जन्मलेला, व मणिपक्षीं उत्तम खाणींत सांपडलेला. ४ रिकामें झालेलें. हें हृदयाचें विशेषण. हाही शब्द उभयत्र लागू पडतो. ५ मुकेपणाला. ६ विलास करण्यांत कुशल. ७ हस्तगत.

(लज्जित होऊन पुनः खालीं पहाते.)

(कृष्ण, अशा घाबरलेल्या स्थितींतही परम शोभा धारण करणाऱ्या तिच्या मुखकमलाकडे एकसारखी टक लावून पहात असतां प्रेमभरानें तल्लीन होतो, व त्या धांदलींत त्याच्या मांडीवरील मुरली खालीं पडली हें त्याला समजत नाहीं.)

प्रियालाप–(बावरल्याच्यागत पाहून) अरे, या राजश्रींची मुरली अशी खालीं कशी पडली! (बराच वेळ तिच्याकडे न्याहाळून पाहून) हो पडली ती ठीकच. (वितर्क करून मनांत) खरोखरच, त्रैलोक्यांतील साऱ्या रूपवती स्त्रियांना आपल्या लावण्य-विलासांनीं लाजविणारी ही पुतळी प्रत्यक्ष येथें उभी असून तिनें ज्या अर्थीं याला अगदीं वेडें करून टाकिलें आहे, त्या अर्थीं कितीही प्रियतम असलेली ही विचारी मुरळी[1] मांडीवरून खालीं घसरलेली याच्या लक्ष्यांत आली नाहीं यांत नवल तें काय? गरीब बापुडी! लवकरच आपली सवत शिरजोर होऊन आपलें स्थान बळकावून आपल्याला अर्धचंद्र दाखवील[2] या भीतीनें आपण होऊनच बिचारीनें खालीं उडी टाकिली कीं काय नकळे! कसेंही असो. आपल्याला हिला संभाळून ठेवणें भाग आहे. हिच्याच मदतीनें आतां पहा कशी गंमत करितों ती! (असें म्हणून मुरली हळूच उचलून घेतो व चंपकलतेच्या पाठीमागें जाऊन कोणाला कळूं न देतां मोठ्या शिताफीनें ती तिच्या लुगड्याच्या सोग्यांत अडकवून ठेवून माघारा फिरतो, व कृष्णाला मोठ्यानें म्हणतो.) मित्रा, अरे असा बावळ्यासारखा मुखस्तंभ होऊन कां बसला आहेस? आपल्या मुरलीच्या मधुर वादनानें या सुंदरीचे कर्ण तृप्त कां करीत नाहींस?

कृष्ण–(मुरली मांडीवर नाहीं असें पाहून तिचा इकडे तिकडे शोध करितो व कोठें दृष्टीस न पडल्यामुळें खिन्न होत्साता

१ मुरलीला मुरळी असें यद्दृच्छेनें म्हटलें आहे. २ घालवून देईल असा अर्थ.

प्रियालापाला म्हणतो.) गड्या, माझी मुरली कोणी तरी चोरून नेली असावी, पण असें झालें तरी कसें ?

प्रियालाप—अरे, आतां इतक्यांत या चंपकलतेच्या हातांत मीं ती पाहिली होती.

चंपकलता—मेल्या भटुग्या, उगीच वटवट करूं नको. माझें नांव घेशील तर खबरदार. माझ्या हातांत पाहिली होती म्हणून मोठ्या दिमाखानें सांगतोस तर ती का मी गिळून टाकिली ?

प्रियालाप—अग दांडगे पोरी, उगीच बैस, तोंड फार करूं नको. तूं ती गिळलीस का कोठें लपवून ठेविलीस, मला काय ठाऊक? (असें म्हणून तिच्याजवळ जातो आणि सटकन् तिच्या सोग्यांतून ती बाहेर काढून दाखवितो आणि म्हणतो.) पहा कशी चोरटी आहे ती. चोर तर चोर आणि वर शिरजोर ! (असें बोलल्यावर एकीकडे तिला बोटानें धमकावून म्हणतो) खट्याळ पोरी, माझी काय खोडी केली होतीस तिची आठवण आहे का? आतां भोग आपल्या कर्माचें फळ !

(साऱ्या जणींचें हांसतां हांसतां पोट दुखून येतें. चंपकलता मनांत खजील होऊन बळेंच हांसते व राधेला एकटी टाकून जवळच्या लताकुंजांत दुसऱ्या मैत्रिणी जात होत्या त्यांच्यांत मिसळून निघून जाते.)

राधा—(इकडे तिकडे पाहून भयचकित होत्साती मनांत म्हणते.) अग बाई, या साऱ्या सोबतिणी मला एकटीला येथें टाकून निघून कशा गेल्या ? आतां करूं तरी बाई काय ?

कृष्ण—अग वेडे, अशी घाबरतेस कां ? येथें तुला कोणी खातें आहे कीं काय ? मी नाहीं का तुला सोबत ? अग, आजपर्यंत तुझ्यासारख्या कैक कन्यकांचे गांधर्वविवाह झालेले सगळ्या जगाला ठाऊक आहेत. मग तुलाच कसे ते माहीत नाहींत ? हा तुझा दास त्यासाठींच येथें आला आहे, समजलीस ? याला पाहिजे

ती सेवा सांग. ती करण्यास हा तयार आहे. प्रिये, बोलत कां बरें नाहींस ? तुला प्रसन्न करण्यासाठीं असें करून पाहूं का ?

२२. श्लोक (पृथ्वीछंद.)

करूं निजकरें तुझ्या रुचिरपादसंवाहनाँ ॥
सुश्लक्ष्ण अथवा भरूं नयनपंकजीं अंजनाँ ॥
उरोजीं तव शोभवूं रचुनि चित्र पत्रावली ॥
खुशाल पुरवूनि घे सकल हेतु गे या स्थलीं ॥ १ ॥

(असें म्हणून त्या त्या क्रिया करण्याविषयींचें आपलें हस्तकौशल्य दाखवूं लागतो. तें असें—प्रथमतः गोड गोड शब्दांनीं तिचीं आर्जवें करून मोठ्या प्रयासानें तिला त्याणें आपल्यापुढें उभी केली आणि, ज्यांवर मधुर गुंजारव करणारे मधुकर एकामागून एक मोठ्या लगबगीनें जाऊन बसत आहेत अशा सुगंधसुमनांचा एक सुंदर व कौतुकोत्पादक हार गुंफून तो तिच्या गळ्यांत घातला. नंतर तिला स्पर्शसुखाचा अनुभव व्हावा या हेतूनें आपल्या नाजुक करांगुलींनीं तिचे गाल धरून कोंवळ्या लुसलुशीत यवांकुरांची माळ करून तीही तिच्या गळ्यांत घातली. त्यानंतर तिला हस्तालिंगनाचा लोभ उत्पन्न व्हावा म्हणून तिच्या स्तनप्रदेशावर आपल्या हातानें केशरकस्तूरीची सुरेख वेलबुट्टी काढिली, आणि सरतेशेवटीं कोमल पल्लव आंथरून व त्यांवर सुवासिक पुष्पांचा दाट थर पसरून स्वतः तयार केलेल्या शय्येवर तिला बसविलें. याप्रमाणें तिला प्रसन्न करण्याकरितां नानाप्रकारचे सामोपचार केल्यानंतर जवळ बसून मोठ्या लाडीगोडीनें तिला म्हणतो) प्रिये, हे तुझे अस्ताव्यस्त झालेले केश वरचेवर तोंडावर येऊन भुरभुर उडत असल्यामुळें

---

१ सुंदर पायांनें दाबणें. २ स्वच्छ आणि मृदु. हें अंजनाचें विशेषण. ३ काजळ. ४ स्तन. ५ सुरेख वेलबुट्टी. ६ एक प्रकारचें कोमल तृण.

तुझ्या सुंदर मुखकमलाला जरी अप्रतिम शोभा आली आहे, तरी ताज्या सुवासिक पुष्पांचे गजरे घालून हा तुझा केशकलाप सजविण्याची मला फार हौस वाटते. (असें म्हणून जवळच्या पुष्पलतांवरील प्रफुल्लित झालेलीं नानाविध कुसुमें घेऊन येतो व मोठ्या कौशल्यानें तिची वेणी घालून तींत तीं गुंफितो, आणि मोठ्या कौतुकानें बराच वेळ तिच्याकडे पहात उभा राहून म्हणतो)

२३. श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

वेणी ही तव चित्रपुष्परुचिरा पाहूनियां लाजती- ॥
वेंहीं जाणुनि भारभूत अपुल्या पिच्छांस धिक्कारिती ॥
स्वस्थानें त्यजुनी दडूनि बसती दूरस्थ शैलोदरीं ॥
लज्जेनें अलिनी त्यजूनि नलिनी जाती उडोनी वरी ॥ १ ॥

(पडद्यापलीकडून संभाषण ऐकूं येतें.)

कदलिका—अग विहंगिके, राधेची आई आज चित्रशाळेच्या अंगणांत रांगोळी काढीत बसली असतां तुझ्याशीं काय ग बोलत होती ?

विहंगिका—अग हेंच. मला ती म्हणाली, ' आतांशा त्या माझ्या लाडकीचें मन फारच बाई विरस झालेलें दिसतें. नेहमींच्या घरच्या कामधंद्यांकडे देखील तिचें लक्ष्य अगदीं लागत नाहीं; म्हणून जिवाला कांहीं करमणूक करण्याकरितां ती यमुनेवर गेली आहे. तर तूं कदलिकेला बरोबर घेऊन तिच्याकडे जा आणि तिची चित्तवृत्ति कांहीं ठिकाणावर येईल तर पहा. '

कदलिका—खरेंच बाई, अलीकडे ती राधेची आई देखील मनांतल्या मनांत फार दुःखीकष्टी झालेली दिसते. काय बरें याचें कारण असावें ?

---

१ नानाविध पुष्पें गुंफून शोभिवंत केलेली. २ मोर. ३ पर्वताच्या गुहेंत. ४ भ्रमरी. ५ कमलिनी.

विहंगिका—अग, राधेचें मन ठिकाणावर नाहीं हेंच तिच्या दुःखाचें कारण; दुसरें काय असायाचें आहे ?

कदलिका—खरें; पण अशा स्थितींत यमुनेवर तिणें तिला एकटीला पाठविली हें बाई कांहीं चांगलें नाहीं केलें.

विहंगिका—अग, तिणें नाहीं पाठविली आणि ती एकटीही नाहीं गेली. चंपकलता आणि तमालिका ह्या तिच्या अगदीं जिवलग मैत्रिणी आहेत हें तुला ठाऊक आहेना ? त्या दोघीजणी, ' तुला कांहीं बाहेरची बाधा झाली आहे तिचा उपशम करण्याकरितां यमुनेवर चल, ' असें म्हणून तिला घेऊन गेल्या.

कदलिका—काय ? राधेसारख्या सुशील मुलीला देखील बाहेरची बाधा झाली ? हें बाई मला खरें नाहीं वाटत.

विहंगिका—अग वेडे, तसें नव्हे. तिचें मन मोहित करणारा असा कांहीं विलक्षण चमत्कार तिच्या दृष्टीस पडला असावा, व त्याची दृष्ट लागून तिची वृत्ति अशी चंचल झाली असावी असें मला वाटतें.

कदलिका—खरेंच ग खरें. तूं म्हणतेस तेंच खरें. त्या दिवशीं किनई ती कामदेवाची पूजा करण्याकरितां मदनोद्यानांत गेली होती तेथें तो नंदकुमार श्रीकृष्ण तिच्या दृष्टीस पडला, तेव्हांपासून तिच्या हृदयांत कामविकार उत्पन्न होऊन ती अगदीं वेड्यासारखी होऊन गेली आहे असें पुष्कळ लोक बोलतात.

विहंगिका—मीही एकदां गोकुळांत कांहीं कामाकरितां गेलें होतें, तेव्हां तिचें आणि कृष्णाचें एकमेकांवर अत्यंत प्रेम जडलें आहे ही गोष्ट कर्णोपकर्णीं माझ्याही कानावर आली होती खरी.

(इतक्यांत चंपकलता आणि तमालिका प्रवेश करितात.)

चंपक०—अग तमालिके, मला वाटतें या विहंगिका आणि कदलिका कांहीं बोलत आहेत. ओळखलास का तूं त्यांचा शब्द ?

तमा०—हो ओळखला. मग पुढें काय म्हणतेस ?

चंपक०—अग, म्हणायचें काय ! चल आपणही त्यांना जाऊन भेटूं.

(दोघी इतर सख्यांना बरोबर घेऊन त्यांच्याकडे जातात.)

कदलिका आणि हिंगिका—(त्यांना पाहून हसून) अग चंपकलते, आम्ही येथें आहों हें तुम्हाला कसें ग कळलें ? मोठी बाई पाताळयंत्री तूं.

चंपक०—कसें म्हणजे ? तुमचा शब्द आमच्या का ओळखीचा नाहीं ?

(दोघी लाजून उभ्या राहतात.)

चंपक०—अग उठतां का ? अशा लाजूं नका. तम्ही बोलत होतां त्यांत कांहीं वावगें नाहीं. सर्व गुणांनीं एकमेकांस शोभणाऱ्या त्या राधाकृष्णांचा समागम व्हावा अशी इच्छा न करणारा कोणी तरी अधम या दुनियेंत असेल का ! सर्वांची तीच इच्छा आहे. चला तर मग आतां आपण सगळ्याजणी जाऊन ती आपली प्रियसखी राधा कोठें आहे याचा शोध करूं.

(सगळ्या एकत्र जमून प्रवेश करितात.)

चंपक०—(राधेची मुखचर्या पाहून एकीकडे) अग तमालिके, या आपल्या प्रियसखीचा त्या नंदकुमाराबरोबर गांधर्वविवाह खचित झाला असें मला वाटतें. (विनोदानें हांसत हांसत एकीकडे राधेला म्हणते.) अग राधे, तुला आठवतें का त्या दिवशीं मला स्वप्न पडलेलें मीं तुला सांगितलें होतें तें ? आली का त्याची कांहीं प्रचीती ? किती तरी बाई त्या वेळेस तूं मजवर रागावलीस, पण सरतेशेवटीं तसेंच घडून आलें ना ?

(राधा लज्जेनें तोंड खालीं घालिते.)

कृष्ण—प्रिये, फुलांनीं अगदीं गच्च भरून गेलेले ते केसरवृक्ष

पाहिलेस का! तुझ्या हस्तस्पर्शानें आपल्या जन्माचें सार्थक्य व्हावें अशी मोठया प्रेमानें ते इच्छा करीत आहेत. चल तर आपण तीं फुलें तोडून आणूं.

(सर्वजण फुलें तोडूं लागतात.)

कृष्ण—अग विलासिनी, सुवर्णासारखीं हीं फुलें तुझ्या अलंकारांच्या शोभेंत कांहीं वेळ तरी भर घालण्यासारखीं आहेत. (असें म्हणून लव्हाळ्यांनीं वेष्टिलेल्या एका केसरवृक्षाजवळ जातो व स्वतः तोडिलेलीं व कांहीं सख्यांनीं गोळा केलेलीं फुलें एकत्र करून त्यांचे हार, गजरे, तुरे व कटिमेखला इत्यादि भूषणें करून त्यांणीं तिचा देह शृंगारतो.)

(इतक्यांत प्रियालाप प्रवेश करितो.)

प्रियालाप—(मोठ्या डौलानें) मित्रा, पहा पहा मीं वेंचून आणलेलीं हीं फुलें कशीं छान्दार आहेत तीं! (असें म्हणून तीं त्याच्यापुढें ठेवितो.)

कृष्ण—(विचार करून) सुमनालंकारांनीं मीं तर प्रियेला नटवावयाची तितकी नटविली. आतां या फुलांचें काय बरें करावें! असो, यांचाही एक विचित्र हार गुंफून त्याणें तिचा कंठप्रदेश आणि उरोभाग सुशोभित करावा. (असें म्हणून हार गुंफावयास लागतो.)

प्रियालाप—मित्रा, ही तसबीर क्षणभर तुझ्याजवळ असूं दे. मी आणखी फुलें वेंचून आणितों.

(कृष्ण ती तसबीर घेऊन व तिच्याकडे पाहून राधेकरितां तयार केलेल्या पुष्पशय्येखालीं लपवून ठेवितो.)

राधा—(दुरूनच ती पाहून मत्सरभावानें मनांत म्हणते) अरे देवा! कोणत्या तरी दुसऱ्या स्त्रीचें हें चित्र काढिलेलें आहे! (असें म्हणून मौन धारण करिते.)

कृष्ण—(ती मुकाट्यानें हिरमुसलें तोंड करून बसलेली पाहून आपल्या मनांत म्हणतो.)—

२४. श्लोक (स्रग्धरा.)

निस्सीमस्नेहभावें ऋजु[2] मन करुनी क्रीडतां प्रेयसीला[1] ॥
झाला उद्वेग[3] कां हा अवचित नुकले गूढ हें मन्मतीला ॥
पाहूं जातां दिसेना अगळिक घडली कोणती दृष्टिला या ॥
केलें म्यां काय देवा! प्रथमच कवलीं[4] मक्षिकापात व्हाया ॥१॥

(भीत भीत तिच्या चरणांवर वारंवार मस्तक ठेवून मोठ्यानें) प्रिये, कांहीं न बोलतां एकाएकीं अशी उद्विग्न होऊन वसलीस याचें काय बरें कारण ? पुष्पासारखी ही तुझी कोमल तनु अशी एकाएकीं निस्तेज कां बरें झाली ? माझ्या हातून अथवा दुसऱ्या कोणाकडून तुझा कांहीं अपराध घडला कीं काय ? मला कांहींच कळत नाहीं. प्राणवल्लभे, असें करूं नको. मनांतील राग काढून टाकून या दासाकडे एकवेळ कृपादृष्टीनें पहा, व कांहीं विपरीत भावनेनें भलताच संशय मनांत येऊं देऊं नको. आणखी पाहिलास का केसरकुसुमांचा हा हार ? किती सुंदर झाला आहे हा ! हा आपल्या गळ्यांत घाल, आणि त्या ठिकाणीं तो रूळत असतांना कसा शोभतो तें मला पाहूं दे.

(राधा कांहीं न बोलतां तशीच खालीं तोंड करून बसते.)

(कृष्ण मोठ्यानें दुःखोच्छ्वास सोडून चंपकलतेच्या तोंडाकडे पहातो.)

चंपकलता—गडे राधे, हा तुझा हृदयवल्लभ फारच खट्टू झाला आहे. याच्याकडे पाहून तरी राग सोडून दे, आणि अशी एकाएकीं बिथरलीस कां याचें कारण सांग. असें गुपाचिप बसल्यानें माणसांनीं काय बरें समजावें ? तुझ्या प्रियकराचा सोबती हा प्रियालापही जवळ उभा राहून, ' मीं वेंचून आणिलेल्या पुष्पां-

---

१ अत्यंत, अमर्याद. २ सरळ. ३ चित्तक्षोभ. ४ ग्रासांत.

चा हा हार तुझ्या प्राणवल्लभानें मोठ्या कौशल्यानें तयार केला आहे तो, माझ्यावर जर मर्जी खुष असेल तर आपल्या गळ्यांत घालून कशी शोभतेस तें मला पाहूं दे,' असें मोठ्या नम्रतेनें म्हणत आहे. तर त्याच्या विनवणीनें तरी तुला कांहीं दया येऊं दे.

राधा–(रागाच्या फणकाऱ्यानें तोंड एकीकडे फिरवून) मोठी मेली शहाणी आली दुसऱ्याला उपदेश करायाला. लाज नाहीं वाटत असें बोलतांना. याच भटुरग्यानें आणून दिलेला तो चित्रपट पाहिला नाहींस वाटतें ? त्यावर त्याच्या प्रियमित्राच्या कोणी सुंदर प्रियकरणीचें चित्र काढलेलें आहे तें कसें नाहीं तुझ्या दृष्टीस पडलें ? डोळे फुटले होते वाटतें पहायाला. त्याच सवतीच्या गळ्यांत तो पुष्पहार जाऊन पडूं दे पाहिजे तर.

प्रियालाप–(हें रागाचें भाषण ऐकून मोठ्यानें हांसून म्हणतो.) मित्रा, अरे हिला हा इतका संताप आला हें फार चांगलें झालें. या रागाच्या आवेशानें आपला एक कार्यभाग उरकला. नाहीं का तुझ्या लक्ष्यांत आलें मी काय म्हणतों तें ? अरे, हिच्या या भाषणानें ही अशी एकाएकीं बिथरली कां हें समजून चुकलें. शर्थ आहे बुवा या बायकांपुढें. मग आतां पाहतोस काय ? काढ बाहेर ती तसबीर आणि ठेव हिच्या डोळ्यांपुढें. ऊठ लवकर. तीच आतां खऱ्याखोट्याचा निर्णय करील.

(कृष्ण मोठ्या आनंदानें ती तसबीर तिला दाखवितो.)

राधा–(ती आपलीच आहे असें पाहून एकदम चपापते व मनांत म्हणते.) अरे देवा, माझ्या हातून ही मोठीच चूक झाली. किती तरी मूर्ख मी ! विनाकारण या माझ्या प्राणवल्लभाचें मन मीं दुखविलें. (असें म्हणून कृष्णाकडे प्रेमदृष्टीनें पहाते.)

कृष्ण–(तिची प्रसन्न मुद्रा पाहून आपणही मोठ्या सन्मानानें तो पुष्पहार तिच्या गळ्यांत घालतो, आणि शारदेंदुसारख्या[1] तिच्या

---

१ शरदृतूंतील चंद्र.

आल्हादजनक मुखकमलाकडे प्रेमभरित लोचनांनीं पाहून म्हणतो.) प्रिये, तुझें अप्रतिम लावण्य, भाषणमाधुर्य आणि हृदयमार्दव, इत्यादि अत्यंत लोभनीय गुण पाहून खरोखरच मी सर्वस्वीं तुझा दास बनून राहिलों आहें, तर आतां तुझें कोणकोणतें प्रिय मीं करावें तें कृपा करून सांग.

(राधा घोंटाळल्यासारखी होऊन चंपकलतेच्या तोंडाकडे पाहते.)

चंपकलता–(कृष्णाकडे पाहून) आर्या, ती कशाला? मीच सांगतें. तूं जर आम्हां सर्वांवर प्रसन्न झाला आहेस तर यापेक्षां अधिक प्रिय तें काय करावयाचें राहिलें आहे? कांहीं नाहीं. एवढ्यानेंच आम्ही कृतार्थ झालों; तथापि तुझा आग्रहच आहे, म्हणून बोलतें. आमचें एवढेंच मागणें आहे, तें दे म्हणजे सर्व पावलें.–

२५. साक्या.

स्वभावसुंदररूपा, तुजशीं सखी आमुची व्हावी- ॥
सदा संगता, रति मदनाशीं जेविं तशी विलसावी ॥
इच्छा हीच असे ॥ हृदयीं कांहिं न अन्य वसे ॥ १ ॥
पवित्र आणि श्लाघ्य[1] समागम पाहुनि हा दोघांचा ॥
अविरत[2] दृक्सुख[3] लाभुनि यावा अनुभव आनंदाचा ॥
इच्छा हीच असे ॥ हृदयीं कांहिं न अन्य वसे ॥ २ ॥

(असें म्हणून सर्व निघून जातात.)

चवथा अंक समाप्त.

वृषभानुजानाटिका समाप्त.

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु. ॥

---

१ प्रशंसनीय, स्तुति करण्यासारखा. २ सतत. ३ नेत्रसुख.

विद्वज्जनप्रार्थना.

आर्या.

रत्नाकरास यत्नें, मथितांना सुरवरां मिळे कमला ॥
नाट्याब्धि मंथनांतीं, तैसें वृषभानुजाख्य रत्न मला ॥ १ ॥

श्लोक.

याचित्तीं विबुध-सरस्वती-विलास ॥
लीलेनें उपजवितो कुतूहलास ॥
त्यांलागीं रमविल रम्य नाटिका ही ॥
सौंदर्यें सहज न त्यांत चित्र कांहीं ॥ २ ॥

दिव्यालंकृति रम्य कोमलपदा तन्वी सुवर्णांकिता ॥
श्रीमद्विभ्रमशालिनी रमविते ही संस्कृतज्ञां स्वतां ॥
नाहीं येत परंतु संस्कृत जयां त्यांलागिं भाषांतर- ॥
रूपानें कृति तीच अर्पण करीं मी प्राकृतीं सादर ॥ ३ ॥

अभिनव कमलांची कांति भृंगावलीला ॥
तरुणजन-ततीला अंगना-नेत्र-लीला ॥
नवजलधर-वाणी नीलकंठ-श्रुतीला ॥
रमवु तशिच हेही नाटिका सन्मतीला ॥ ४ ॥

आर्या.

मनुजाचें ज्ञान किती, अल्प तयाची असे सदोष कृती ॥
परि अंगिकारिती ती, टाकुन दोषांस जे गुणज्ञ कृती ॥ ५ ॥
या न्यायेंचि प्रकृत, प्राकृत वृषभानुजा बुधांस मता- ॥
होवो, तेणें मजला, होइल आनंद ज्या नसे समता ॥ ६ ॥

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
२	७	ती.	ही.
२	१०	ती.	ही.
१०	२१	ते	तें
११	११	सजविले	सजवीले.
१९	१८	तरूलता	तरुलता
२६	१४	पंकजांचें	पंकजांचे
६८	२३	अल्पून	कल्पून
६६	९	रंगलीं	रंगली.
७९	१२	बरी	वरी.